

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

# संशोधक

तात्यासाहेब भट स्मृती विशेषांक
मार्च–जून १९८४

संपादक
डॉ. प्र. न. देशपांडे
डॉ. मु. ब. शहा

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

# राजवाडे मंडळ प्रकाशनें

## मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या ग्रंथाची यादी

| | | |
|---|---|---|
| १) राजवाडे मराठी धातू कोश | पृष्ठे ३७० | रुपये ३० |
| २) राजवाडे नामादी व्युत्पीत कोश | " ३५० | " ३० |
| ३) समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध (भा. रा. भट) | " १०९ | " ०५ |
| ४) ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रूपांतर ( वि. का. राजवाडे ) | " १८३ | " ०७ |
| ५) राजस्थान महाराष्ट्र संघर्ष ( शु. पु. जोशी ) | " ३०० | " १२ |
| ६) राजवाडे चरित्र (भा. वा. भट) | " ६३२ | " ५० |
| ७) मराठ्यांचा इतिहासाची साधने (मो. रा. जोशी) | " ६६० | " ५० |
| ८) ऋगवेदातील ज्योतिष मूलक कालनिर्णायक गमके | " १०० | " ०७ |
| ९) संस्कृत भाषेचा उलगडा ( वि. का. कुळकर्णी ) | " २१० | " १० |
| १०) जानकी सैंवर (सं. द. रा. भट) | " २८८ | " २० |
| ११) आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित | | " २० |
| १२) अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखीत | | " ४१ |
| १३) योगचिंतामणी (ऑफसेट प्रिंट) | | " ४१ |
| १४) वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शहा) | | " १० |
| १५) छत्रपतींची १०९ कलमी बखर (सं. डॉ. प्र. न. देशपांडे) | | " १० |
| १६) ज्ञानेश्वरी पदकोश (श्री शिवाजीराव भावे) | | " १०० |
| १७) संशोधक, "सुवर्ण महोत्सवी अंक" | पृष्ठे ३०० | " ४० |

## विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १) अहिराणीं भाषा व संस्कृति (भा. रं. कुळकर्णी) | " ६० | " ०२ |
| २) बोधवैभव (गो. का. चांदोरकर) | " ७१ | " ०२ |
| ३) छ. शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ प्र. न. देशपांडे) | " ३०० | " ६५ |

विशेष सवलत:- वरील २० पुस्तकांचा संच किंमत रु. ५५२ चा केवळ रु ४०० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमीशन. काही ग्रंथाच्या प्रती अगदीच मर्यादित- टपाल खर्च वेगळा लागेल.

'संशोधक' त्रैमासिक:- इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५२ वर्षे प्रकाशित होत आहे. वार्षिक वर्गणी फक्त रु. १५।· प्रत्येक अंक किंमत रु. ०५।- ५२ वर्षातील उपलब्ध असलेल्या सर्व अंकाचा संच केवळ रु. ३००।-त उपलब्ध. (त्यात सुवर्णमहोत्सवी अंक-४० योगचिंतामणी रु ४१।- आज्ञापत्र रु. २०।- समाविष्ठ)

चिटणीस,

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

*महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने*
*अनुदान देऊन पुरस्कृत केलेले*
*त्रैमासिक*

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

# संशोधक

**मार्च-जून १९८४**

संपादक
**डॉ. प्र. न. देशपांडे**
**डॉ. मु. ब. शहा**

**वर्ष ५२** **अंक १-२**

**वार्षिक वर्गणी- १५ रु.** **अंकाचे मुल्य- १० रु.**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| आज्ञापत्राचा लेखनकाल | ... | डॉ. प्र. न. देशपांडे, | ... १ |
| ऐतिहासिक नंदनगरी व तिच्या राजाचे धर्मांतर | ... | डॉ. मु. ब. शहा | ... ५ |
| शिवोत्तरकालीन शस्त्रास्त्रे | ... | प्रा. गजानन भिडे | ... ९ |
| श्री रामकथेचे नवोउन्मेषकारी कथन: अभंग रामायण | ... | डॉ. विश्वास पाटील | ... १९ |
| Feudal Elements in Maratha Polity | ... | Dr. K. N. Chitnis | ... 31 |
| प्रतापसिंहाच्या छावणीचा नकाशा | ... | सौ. विजया देशपांडे | ... ४५ |
| किल्ल्यांचा झाडा | ... | कु. सुनंदा अहिरे | ... ४९ |
| प्राचिन भारतातील ग्रामसंस्था | ... | कै. भा. वा. भट | ... ५४ |



प्रकाशक

**डॉ. प्र. न. देशपांडे**

**डॉ. मु. ब. शहा**

चिटणीस, (संशोधक – प्रकाशक)

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

मुद्रक

श्री. हिरालाल शंकर सापे

महाराष्ट्र प्रिंटींग प्रेस,

हेडपोस्ट ऑफिसजवळ, धुळे.

## या अंकाविषयी मनोगत–

'संशोधक' त्रैमासिकचा मार्च–जून १९८४ चा हा कै. तात्यासाहेब भट स्मृती विशेषांक अभ्यासकांच्या आणि वाचकांच्या हाती देतांना कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे.

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे मुख्य चिटणीस श्री. भा. ऊर्फ बाळूकाका भट यांचे २८ डिसेंबर १९८३ रोजी पुणे मुक्कामी निधन झाले. कै. भा. वा. ऊर्फ तात्यासाहेब भट यांच्या नंतर बाळूकाकांनी सुमारे ३० वर्षे राजवाडे संशोधन मंडळाचे मुख्य चिटणीसपद सांभाळले. मंडळाच्या कार्याच्या कक्षा त्यांच्या कारकिर्दीत रुंदावल्या आणि गतीमान झाल्या. राजवाडे वस्तु संग्रहालयाची भव्य इमारत आकारास आली. 'संशोधक' त्रैमासिकाचे स्वरुप बदलले. विविध संशोधन प्रकल्प आम्ही हाती घेतले. ग्रंथालय समृद्ध केले १९८० मध्ये महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अधिवेशन धुळयास भरविले. १९८२ मध्ये 'संशोधक' त्रैमासिकाचा सुवर्ण महोत्सवी अंक प्रसिद्ध केला. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने चर्चासत्रे आयोजित केली. मंडळाची अनेक मौल्यवान प्रकाशने गेल्या पाव शतकात प्रसिद्ध झाली. 'आज्ञापत्रा'ची ऑफसेट मुद्रित आवृती, 'योगचिंतामणी'ची ऑफसेट मुद्रित आवृती, '१०९ कलमी बखर', 'वेडिया नागेश' इत्यादी प्रकाशनांचा उल्लेख या ठिकाणी करावा लागेल. बाळूकाकानी राजवाडे मंडळाच्या संग्रही असलेला हस्तलिखितांचा आणि कागदपत्रांचा खजिना आम्हा अभ्यासकांना मुक्तद्वार करुन दिला. त्यांची प्रेरणा आम्हाला अधिक कार्य करण्यास कारणीभूत ठरली. बाळूकाकांच्या निधनामळे मंडळाच्या कार्याची हानी झाली आहे यात शंका नाही. बाळूकाकानी मंडळासाठी आपल्या पित्याप्रमाणे समर्पित भावनेने कार्य केले.

बाळुकाका आयुष्याच्या अखेरीस पुण्यास आपले पुतणे श्री. र. नी. भट यांचेकडे राहण्यास गेले होते. तरी पण पुण्याहून ते मंडळाच्या कार्याची सतत चौकशी करीत असत. पत्रव्यवहाराने सल्लामसलत करीत असत. 'संशोधक' त्रैमासिकाचे संस्थापक कै. भा. वा. ऊर्फ तात्यासाहेब भट यांचे निवासस्थान धुळे येथे भरवस्तीत ग. नं. ४ मध्ये आहे. भट कुटुंबियांपैकी धुळयास आता कोणीहि नसल्यामुळे उपरोक्त निवासस्थान विकण्याचा निर्णय भट कुटुंबियांनी घेतला. भर वस्तीत असलेल्या या दुमजली भव्य इमारतीची किंमत आज सहज सहा सात लाखापर्यंत होते. नव्हे, तशी मागणीही भट कुटुंबियांकडे आली होतीच. तथापि राजवाडे संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब मुंदडे यांनी राजवाडे संशोधन मंडळाच्या वाढत्या कार्यासाठी कै.

तात्यासाहेब भट यांचे निवासस्थान खरेदी करण्याची कल्पना मांडली. राजवाडे संशोधन मंडळाच्या कार्यकारिणीने ही कल्पना एकमताने उचलून धरली. कै. तात्यासाहेबांचे निवासस्थान प्रत्यक्ष राजवाडे संशोधन मंडळ खरेदी करण्याचा विचार करीत आहे हे ऐकून बाळूकाकांना आणि भट कुटुंबियांना खूप आनंद झाला. मंडळाची आर्थिक परिस्थिती बेताची. ते लक्षात घेऊन भट कुटुंबियांनी तीन लाख साठ हजारामध्ये कै. तात्यासाहेबांचे घर मंडळाला देण्याचे आनंदाने मान्य केले. कै. तात्यासाहेबांनी आपली हयात मंडळाच्या कार्यासाठीच व्यतीत केली होती. त्यांचे स्मारक म्हणून 'कै. तात्यासाहेब भट सभागृह' त्या वास्तूमध्ये उभारण्यात यावे असा विचार मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला. कै तात्यासाहेब भटाचे निवासस्थान आणखी एका ऐतिहासिक घटनेसाठी प्रसिद्ध आहे. इतिहासाचार्य राजवाडे आयुष्याच्या अखेरीस कै. तात्यासाहेबांच्या निवासस्थानामध्येच राहात होते. त्यांचे निधन ३१ डिसेंबर १९२६ रोजी त्याच वास्तूमध्ये झाले. इतिहास संशोधन हे इतिहासाचार्य राजवाड्यांचे जिवित कार्य होते. त्याचे स्मारक म्हणून राजवाडे संशोधन मंडळाची- "संशोधन प्रकाशन इमारत" कै. तात्यासाहेबांच्या निवासस्थानाच्या जागेवर उभारण्याचा निर्णय मंडळाच्या कार्यकारिणीने घेतला.

अशा प्रकारे कै. तात्यासाहेबांचे निवासस्थान मंडळाने खरेदी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही महिन्यांनी बाळूकाकांचें पुणे मुक्कामी दिनांक २८ डिसेंबर १९८३ रोजी निधन झाले. भट कुटुंबियांनी बाळूकाकांचा मंडळावरील लोभ लक्षात घेऊन त्यांचे हिश्श्यास येणारे ९०,००० रू. राजवाडे संशोधन मंडळास देणगी म्हणून देण्याचे ठरविले. मंडळाच्या कार्यकर्त्यांना अनपेक्षित सुखद धक्काच बसला. या उदार देणगीचीं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, मंडळाने वस्तुसंग्रहालयाच्या दालनास 'श्री. भा. उर्फ बाळूकाका भट दालन' हे नांव देण्याचे जाहिर केले. या जून १९८४ च्या अखेरीस कै. तात्यासाहेब भट यांचे निवासस्थानाचा खरेदी व्यवहार पूर्ण होणार आहे. त्यानिमित्ताने हा अंक ***'कै. तात्यासाहेब भट स्मृती विशेषांक'*** म्हणून आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. भट कुटुंबियांनी मंडळाच्या कार्याला जो मोठा हातभार लावला याबद्दल मंडळ भट कुटुंबियांचे सदैव ऋणी राहील.

वास्तु खरेदीचा व्यवहार चालू असतांना कै. बाळूकाकाचे बंधू श्री. यशवंतराव आणि पुतणे श्री. र. नी. भट हे धुळ्याला मार्च १९८४ मध्ये आले होते. त्यांनी कै. तात्यासाहेब भट यांचे संग्रही असलेली मौल्यवान ग्रंथ मंडळाच्या संदर्भ ग्रंथालयास भेट म्हणून दिले. कै. तात्यांची काही दप्तरे होती, तीही मंडळाच्या संशोधन प्रकाशन विभागास दिली. ही दप्तरे चाळत असतांना कै. तात्यांचे काही अप्रकाशित लेख पहाण्यात आले. त्यापैकी " प्राचीन भारतातील ग्रामसंस्था " हा लेख आम्ही या अंकात समाविष्ट करीत आहोत.

भट कुटुंबियापैकी एक, कै. तात्यासाहेबांचे पुतणे श्री. द. रा. भट हे जवळपास

तीस वर्षे मंडळाचे क्युरेटर म्हणून कार्य करीत होते. ते नुकतेच मंडळाच्या कार्यातून सेवानिवृत्त झाले. कै. तात्यासाहेबांचा संशोधन कार्याचा वारसा श्री. दत्तू काकांनी मोठ्या उमेदीने चालविला. श्री. द. रा. भट हे पुरातत्त्वशास्त्रांचे गाढे अभ्यासक असून मंडळाचे संग्रही असलेले ताम्रपट त्यांनी प्रसिद्ध केले आहेत. मंडळाच्या संग्रही असलेल्या ऐतिहासिक हस्तलिखितांची व कागदपत्रांची त्यांना खडान्‌खडा माहिती होती. त्यांनी काही महत्वाची कागदपत्रे प्रकाशित केली असून इतिहास परिषदातून शोध-निबंध वाचले आहेत. 'जानकी सैंवर' हा ग्रंथ संपादित करुन त्यांनी प्रकाशित केला. 'पाताळकांड' हा ग्रंथही संपादित करून त्यांनी 'संशोधक' मधून क्रमशः प्रसिद्ध केला.

संशोधक त्रैमासिकाचे ते संपादकहि होते. श्री. द. रा. भट सेवानिवृत्त जरी झाले असले तरी त्यांचे संशोधन कार्य चालूच आहे. मंडळाच्या संग्रही समर्थ रामदास स्वामींचे एक अकरा प्रकरणात्मक चरित्र उपलब्ध झाले हे चरित्र संपादन करण्याचे काम सध्या ते करीत आहेत. अडीच तप निरलसपणे श्री. दत्तू काकांनी मंडळाचे कार्य केले याबद्दल मंडळ त्यांचे सदैव ऋणीच राहील.

या "तात्यासाहेब भट स्मृती विशेषांकाचे" अभ्यासक व वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**डॉ. प्र. न. देशपांडे**
**डॉ. मु. ब. शहा**
संपादक
संशोधक

# आज्ञापत्राचा लेखनकाल

— प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे

शिवशाहीच्या ऐतिहासिक साधनांमध्ये रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्रा' ला अनन्यसाधारण स्थान आहे. शिवाजी महाराजांची राजनिती मोजक्या शब्दात परंतु अत्यंत प्रभावीपणे विशद करणारा आज्ञापत्रासारखा दुसरा ग्रंथ नाही. या ग्रंथाचे कर्तृत्व रामचंद्रपंताचे आहे हे त्यातील स्पष्ट उल्लेखावरुन सिद्ध होते. परंतु या ग्रंथाचा कर्ता अन्य कोणीतरी आहे असा निष्कर्ष काही संशोधकांनी काढलेला आहे. त्याचप्रमाणे आज्ञापत्राच्या प्रारंभी रचनाकालाचा स्पष्ट निर्देश असतानाही या ग्रंथाची रचना वेगवेगळ्या काळात झाली असावी असा संशयही काही अभ्यासकांनी व्यक्त केलेला दिसून येतो. आज्ञापत्राच्या अनेक आवृत्त्या विविध संपादकांनी आतापर्यंत प्रसिद्ध केलेल्या आहेत. कै. मोरमकर, प्रा. ऊध्वरेषे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, डॉ. व. दि. राव, श्री. ना. बनहट्टी, प्रा. ग. ह. खरे आणि प्रा. श्री. र. भिडे, श्री. शं. ना. जोशी आणि श्री. ल. म. भिंगारे, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. प्र. न. जोशी इत्यादी संपादकांनी आपापल्या आवृत्तीमध्ये आज्ञापत्राच्या कर्त्याविषयी आणि रचनाकालाविषयी सांगोपांग चर्चा कलेली आहे. त्यापैकी श्री. मा. कुळकर्णी संपादित आज्ञापत्राला प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे यांची प्रस्तावना असून ' राजनिती अमात्यांची कशी ? ' हा प्रा. कोलते यांचा लेखही प्रस्तुत आवृत्तीत समाविष्ठ करण्यात आलेला आहे. अनेक मान्यवर संशोधकांनी आणि अभ्यासकांनी आज्ञापत्राच्या कर्त्याविषयी आणि रचनाकालाविषयी विविध मुद्दे उपस्थित करून परस्परांच्या मतांचे खंडन केले आहे. तथापि आज्ञापत्राचा नेमका कर्ता कोण ? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अमात्यांच्या रचनेविषयी संशय व्यक्त करणाऱ्या अभ्यासकांना देता आलेला नाही. आज्ञापत्राच्या प्रारंभी असलेल्या उल्लेखाप्रमाणे रामचंद्रपंत अमात्य हेच या ग्रंथाचे रचनाकार आहेत असेच अनुमान बहुतेक अभ्यासकांनी काढलेले आहे. प्रस्तुत निबंधामध्ये आज्ञापत्रामध्ये लेखनकालासंबंधी माझे मत मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

आज्ञापत्राची रचना वेगवेगळ्या काळात झालेली असून ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे

राज्यभिषेक शके ४२ मध्ये (इ. स. १७१५) हा ग्रंथ पूर्ण झाला असावा असे मानण्यास प्रस्तुत ग्रंथातील काही सूचक उल्लेख पुरावे म्हणून विचारात घेण्यासारखे आहेत. आज्ञापत्रातील काही तपशीलाचा बारकाईने अभ्यास केल्यास या ग्रंथातील बराच भाग छत्रपती राजारामाच्या कारकिर्दीतच रचला गेला असावा असे मला वाटते. या ग्रंथात राजारामाच्या कर्तुत्वाची केलेलीं स्तुती लक्षात घेतल्यास त्याच्याच आज्ञेनुसार रामचंद्रपंत अमात्यांनी राजनिती लिहिण्यास प्रारंभ केला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आज्ञापत्राच्या प्रारंभीचा भाग– विशेषतः औरंगजेबाच्या स्वारीच्या परिणामापर्यन्तचा भाग– ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे इ. स. १७१५ मध्ये पूर्ण करण्यात आला यात शंका नाही. कारण या भागात औरंगजेब यमालयास गेल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे त्याच्या मृत्यूनंतर (इ. स. १७०७) स्वराज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या भीषण परिस्थितीचे वर्णनही ग्रंथकाराने केले आहे. याचाच अर्थ हा भाग इ. स. १७१५ मध्ये लिहिला गेला असे मानण्यास प्रत्यवाय येत नाही. त्यापुढील भाग मात्र राजारामाच्या कारकिर्दीत अमात्यांनी लिहुन तयार केला असावा असे ग्रंथातील काही तपशीलावरून सिद्ध होण्यासारखे आहे.

आज्ञापत्रामध्ये राजारामाच्या उत्तरेकडील स्वारीचे तपशीलवार वर्णन आलेले आहे. वस्तुतः ही स्वारी प्रत्यक्षात घडून आलेली नव्हतीच. अमात्यांनी उत्तरेकडील स्वारीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. 'आपली सलाबत शत्रूवर पडून शत्रूचे आवाई खाल्ली आहे. संपूर्ण मांडलीक द्वैधाभाव पावले आहेत याचमध्ये शत्रूस अवकाश घेऊ न देता आपण सेना समुदायानिशी चालून जाऊन शत्रूचा पराभव करावा हाच स्वामीनी दृढ विचार करून तमाम प्रांताचे रजपूत एकत्र करविले. स्वामी सुमुहूर्ते नर्मदापार जहाले. श्रीकृपे अल्पकालेच मुख्य शत्रूचा पराभव करून दिल्ली, आग्रा, लाहोर, डाका, बंगाल, ठठ्ठा जलचरादि करून संपूर्ण तत्संबंध देशदुर्ग हस्तवश्य करून वाराणशीस जाऊन स्वामी श्री विश्वेश्व स्थापन करितात. तावत्कालपर्यंत दक्षिण प्रांत संरक्षणार्थ श्री मत्सकल तिर्थैकतिर्थं श्री वन्मातोश्री साहेब दक्षिण प्रांतास राहिली आहेत, त्या सन्निध श्रियासह चिरंजीव जीविताधिक प्रियतम राजश्री राजकुमार यास ठेविले आहेत उभयतांच्या सेवेशी तुम्हांस ठेविले आहेत'[1]

वरील उताऱ्याचे काळजीपूर्वक मनन केल्यास एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे स्वामी (राजाराम) नर्मदा पार झाले. ईथ पर्यंतचा भाग प्रत्यक्ष घटनेच्या संदर्भात लिहिला आहे. ही घटना अस्सल पुराव्याअभावी सत्य मानता येत नाही. तथापि राजारामाने जिंजीहुन परत आल्यानंतर जुलै १६९९ मध्ये वसंतगड मुक्कामी उत्तरेच्या स्वारीची महत्वाकांक्षी योजना आखली होती हे निश्चित.[२] या योजनेनुसार ऑक्टोबर १६९९ मध्ये नेमाजी शिंदे, परसोजी भोसले, खंडेराव दाभाडे, इ. सरदारांना बरोबर घेऊन राजारामाने मोहिम हाती घेतली.[3] नेमक्या याच सुमारास

राजारामाने आज्ञापत्राचे लेखनकार्य रामचंद्रपंत आमात्य यांचेकडे सोपवले असले पाहिजे. कारण 'स्वामी नर्मदापार झाले' या वाक्यानंतरचा मजकूर राजारामाने अमात्याला सांगितलेल्या सूचनांच्या संदर्भातील दिसतो. स्वामी म्हणजे राजाराम उत्तरेकडील अनेक स्थळे जिंकून वाराणशीस श्रीविश्वेश्वराची स्थापना करेपर्यंत 'श्रीमत्सकल तीर्थेकतीर्थ श्री मन्मातोश्रीसाहेब व राजश्री राजकुमार' दक्षिणेचे संरक्षण करतील अशी योजना मांडलेली आहे. मातोश्रीसाहेब म्हणजे येसुबाई आणि राजकुमार म्हणजे शाहू याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. येसूबाई व शाहू यांना मुघलांच्या कैदेतून सोडविण्याचे मराठ्यांचे प्रयत्न चालूच होते. त्यामुळे राजाराम उत्तरेकडे गेल्यावर शाहूची व येसूबाईची मुघलांच्या कैदेतून सुटका करण्याची जबाबदारी दक्षिणेतील मातब्बर मराठे सरदारांवर येणार होती. ती जबाबदारी ग्रंथात स्पष्ट शब्दात मांडलेली नाही. तथापि रामचंद्रपंत अमात्यांना उद्देशून राजारामाने दिलेल्या सूचना लक्षात घेण्यासारख्या आहेत. येथे एका गोष्टीचा खुलासा आवश्यक आहे. 'प्रियतम राजश्री राजकुमार यास ठेविले आहे.' येथपर्यंतचा भाग अमात्यांनी आपल्या शब्दात मांडलेला दिसून येतो. त्यापुढील परिच्छेद मात्र राजारामाच्या संभाषणाचा आहे हे स्पष्ट दिसते.

'उभयतांचे सेवेशी तुम्हास ठेविले आहेत. ऐसियासी स्वामी कायावाचामनसा मातोश्री साहेबांचे चरणाविरहित अन्य दैवत जाणत नाहीत, ही स्वामीची अनुपम निष्ठा तुम्हास कळलीच असलो पाहिजे. तदनुरुप तुम्ही हा संपूर्ण अर्थ बरा चित्तांत आणून त्यांचे आज्ञेप्रमाणे वर्तोन श्रीमन्मातोश्री साहेब स्वामीवर दिनप्रतिदिनी संतोष पावत ते करावे. तुम्हास राजकार्य, निती मर्यादा अवगतच आहेत. तथापि चिरंजीव राजश्री राजकुमार राजकार्यी सुशिक्षित व्हावे व वरकड देशोदेशी देशाधिकारी व पारपत्यगार आणि नीतिचे वर्तोन राज्यसंरक्षण करावे, यास्तव स्वामींनी यथाशास्त्र राजनीति या आज्ञापत्रावरुन केली आहे'.[४]

वरील परिच्छेद अतिशय बोलका असून राजारामाने उत्तरेच्या स्वारीची योजना आखल्यानंतर येसूबाई आणि शाहू यांची सुटका करण्याची जबाबदारी आमात्यादि मुत्सद्यांवर सोपवली आणि येसूबाईच्या आज्ञेनुसार कारभार करण्याची सूचना केली. शाहू वयाने लहान असल्यामुळे त्याला राजनीतिचे धडे देण्यासाठी ग्रंथरचना करावी असा आदेश राजारामाने रामचंद्रपंत अमात्याला दिलेला दिसतो. ही वस्तुस्थिती मान्य केल्यास १६९९ च्या अखेरीस रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्राची रचना केली असे म्हणता येते.

राजारामाची उत्तरेकडील मोहिम प्रत्यक्षात घडू शकली नाही. अविश्रांत परिश्रमामुळे राजारामाचा २ मार्च १७०० रोजी सिंहगडावर मृत्यू झाला. त्यामुळे औरंगजेबाने नव्या उमेदीचे मराठ्यांची सत्ता नेस्तनाबूत करण्याचा चंग बांधला.

या अवघड परिस्थितीला तोंड देण्यासाठीं मराठ्यांनी महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखाली प्रतिकार सुरु केला. या धामधूमीच्या काळात आज्ञापत्राचे लेखनकार्य अमात्याकडून पूर्ण झाले नसावे. आज्ञापत्राचे पूर्ण लेखन झाल्यावर अमात्यांनी तो ग्रंथ १७१५ मध्ये कोल्हापूरच्या संभाजीला अर्पण केला, आता आणखी एक प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे आज्ञापत्र किंवा राजनीति शाहूसाठी लिहावयाची असताना अमात्याने कोल्हापूरच्या संभाजीच्या नांवे का लिहिली? ह्याचे उत्तर म्हणजे शाहू मुगलांच्या कैदेतुन परत आल्यावर रामचंद्रपंत अमात्याने ताराबाईचा पक्ष सोडला नाही. शाहू – ताराबाई संघर्ष काळात हा मुत्सद्दी ताराबाईच्या पक्षात राहिला. इ. स. १७१४ मध्ये ताराबाईची सवत राजसबाई हिने क्रांती करुन आपला मुलगा संभाजी याचे नांवे राज्यकारभार हाती घेतला. तेव्हा अमात्यानी राजसबाईचा पक्ष स्वीकारला. आणि शाहूसाठी तयार केलेला राजनितीचा ग्रंथ त्याने १७१५ मध्ये संभाजीला अर्पण केला.

*संदर्भ–*

१) आज्ञापत्र– सं. खरे, भिडे पृ. ३१
२) मराठी रियासत स्थिरबुद्धि राजाराम– पृ. ८८
३) तत्रैव– पृ ८९
४) आज्ञापत्र– सं. खरे, भिडे पृ. ३१

---

प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
चिटणीस
इ. वि. का. राजवाडे मंडळ, धुळे

# ऐतिहासिक नंदनगरी व तिच्या राजाचे धर्मांतर

– प्रा. डॉ. मुरलीधर शहा

---

खानदेशातील सर्वात जुन्या असलेल्या शहरापैकी नंदुरबार हे एक शहर आहे. नंद गवळयाने ते वसविल्याची लोकमान्यता प्रसिद्ध असून लोकांची आजही त्या मान्यतेवर अखंड श्रद्धा आहे. 'नंदीगरा' या नावाने नंदुरबारचा पहिला ऐतिहासिक उल्लेख ३ ऱ्या शतकातील कान्हेरी लेण्याचा लेखात सापडतो.[1] चौदाव्या शतकाच्या मध्यावर इब्नबतुताने नंदुरबारला भेट दिली असून 'मराठ्यांनी वसवलेली नगरी' म्हणून त्याने तिचा उल्लेख केलाय.[2] खानदेशात ज्या फरुखी राजांनी राज्य केले त्या फरुखी राजांपैकी मलिक राजा (१३७०–१३८९) ने नंदुरबार व सुलतानपूर ही दोन्ही गांवे जिंकली होतीं. सुलतान मुजफ्फर चढाई करुन येतोय असे कळल्यावर या दोन्ही गावांवरचा कब्जा सोडून तो थाळनेरला परत गेला.[3] थाळनेर फरूखी राजांची राजधानी होती. सन १४२९ मधे गुजरातेतून पळून आलेल्या गलवाराच्या प्रमुखाने मलिक नसिरच्या एका लहानश्या तुकडीच्या सहाय्याने नंदुरबार शहर लुटले.[4] नंतर खानदेशातील जी शहरे वारंवार लुटली गेली त्यात नंदुरबारचा अग्रक्रम लागतो. सुलतानपूर हे तर काळाच्या ओघात जवळ जवळ नामशेष झाले आज तेथे २०–२५ झोपड्या आहेत व एके काळच्या समृद्ध नगरीचे काही भग्नावशेष. थाळनेर पुन्हा कधीही समृद्ध होवू शकले नाही.

१५३६ मधे अशिरगड येथे अटकेत असतांना दिलेल्या वचनाप्रमाणे महंमदखान तिसरा याने गुजरातचा राजा झाल्यावर नंदुरबार व सुलतानपूर ही मुबारकखानाच्या स्वाधीन केली.[5] नंतरच्या धामधुमींच्या काळात महंमद शहाच्या मृत्यूनंतर ही शहरे गुजरातच्या चंगेजखानाने लुटली.[6] अकबराने केलेल्या व्यवस्थेनुसार नंदुरबार व सुलतानपूर हे जिल्हे काही काळ खानदेशातून काढून, माळव्याला जोडण्यांत आले होते.

'आयने अकबरी'त नंदुरबारचा उल्लेख 'सरकार ऑफ नंदुरबार' असा येतो. त्याचे क्षेत्रफळ त्यावेळी ६ लाख ४४ हजार ७८० एकर होते. व दरवर्षी शेतसारा १ लाख २५ हजार ४०६ रु. भरला जात होता. नंदुरबार त्यावेळी द्राक्ष व केसरा-सारखा सुवास येणाऱ्या तांदुळाकरता सर्वदूर प्रसिद्ध होते.[7] ट्रॅवेनियरने नंदुरबारच्या

समृद्धीचे वर्णन 'enjoying considarable prosperity' असे केले होतेच.

इसवी सनाच्या १७ व्या शतकात सगळा खानदेशच भरभराटीच्या अत्युच्च शिखरावर होता. १६९७ त निंबा सिंधीया याने ८००० स्वारानिशी येवून खानदेशचा तत्कालीन मुसलमान सुभेदार हुसैन अलीखान यांचा पराभव केला. थाळनेर व त्याच्या आसपासच्या गावातून जवळ जवळ १८ लाख रु. त्याने वसूल केले. केवळ नंदुरबारच्या शेट-सावकारांकडून त्याने १ लाख ४० हजार रू. लुटून नेले.[८] नंदुरबारची समृद्धी अनेक अंगांनी सतत वर्धमान होती. कापूस, तांदूळ, मीठ, डाळ, साखर, व द्राक्षांचे हा परगणा आगर समजला जाई. सतराव्या शतकात तर ते व्यापाराचे प्रमुख केन्द्र होते. वारंवार होणाऱ्या हल्लचांनी ते उजाड होत राहिले व पुन्हःपुन्हा वसत राहिले.

शिलालेखात नंदुरबारचा असलेला पुरातन उल्लेख सेंद्रक निकुम्भल्ल शक्ति यांचा नागंद ताम्रपट शके ५७६ यात आहे. यांच शीर्षकाने श्री. ग. ह. खरे यांनी १९३९ च्या 'संशोधना'त हा लेख लिहिला होता. या लेखात ते म्हणतात "नांदी पुरद्वारी या स्थळाचा उल्लेख राष्ट्रकूट राणी शीलमहादेवी हिच्या शके ७०८ च्या जेठवई दानपत्रात आला आहे त्या ताम्रपटाचे संपादक डॉक्टर भांडारकर यांनी ताम्रपटातील कोणतीच गांवे निश्चित करण्याचा प्रयत्न केला नाही. पण मला स्वतःला नांदीपुरद्वारी म्हणजे नंदुरबारचे जुने नांव असावे असे वाटते."[९]

अश्या समृद्ध ऐतिहासिक नगरीत जवळ जवळ ४०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेले कानुगो देसाई यांचे घराणे आजही नांदत आहे. देसाई घराण्याची कागदपत्रें राजवाडे मंडळाने महद् प्रयासाने मिळवली. ही कागदपत्रें अनेक अज्ञात कथा प्रकाशात आणीत आहेत.

इ. स. १५८४ त या घराण्याच्या नारायण मेहतास अकबर बादशहाच्या सनदा मिळाल्या. या नारायण मेहतापासून चौथ्या पिढीत झालेल्या शंभूदास मेहताने दिगंत कीर्ति मिळवली होती. गुजरातेतील दोन प्रसिद्ध कवी प्रेमानंद व हरिकवि यांनी नंदुरबार व शंभूराजे यांच्या वैभवाची विषद वर्णने आपल्या काव्यातून केली आहेत. भानुभट उर्फ हरिकवीच्या ग्रंथावरुनच श्री. पी. के. गोडे व देसाई घराण्याचे श्री. शिवलाल देसाई यांचा वाद निर्माण झाला होता. हरिकवीचे 'शंभूराज चरित' 'हैहयेंद्र चरित काव्य', 'शंभू विलासिका', 'हैहयेंद्र चरित काव्य टीका' इत्यादि ग्रंथ संभाजी महाराजांशी संबंधित आहेत हा श्री. गोडेंचा सिद्धांत, श्री. शिवलाल देसाई यांनी आपल्या घराण्याची मूळ कागदपत्रें दाखवून खोडून काढला होता.[१०]

हरिकवी व प्रेमानंद महाकवी दोघेही राजा शंभूदास देसाई यांच्याकडे काही काळ राहिले होते. 'शंभूराज चरित' हे महाकाव्य शंभूराजा देसाई यांचे गुरु कृष्णपंडित यांच्या सांगण्यावरुन हरिकवीने लिहिले. नंदनगरीचे वर्णन करतांना 'हैहयेंद्र चरित' काव्यातील पहिल्या सर्गात तो लिहितो–

" पुरं नंदिव्दारं निखिल गुणसारं त्रिजगती
सुखानामाधारं भुवनवलये संविलसती
यदस्मिज्जायन्ते सकल संतुष्ट मनसां
जनानामानन्दाः किल सुमन सा मोहन करा "

या सर्गाचे श्लोक २२ ते २७ नंदनगरीची समृद्धि व शंभू राजाचे श्रेष्ठत्व स्पष्टपणे प्रतिपादित करतात. जर्मन पंडित Ph. Von Schtscher-bastskoi याने जर्मन भाषेत लिहिलेल्या टीकेंचे इंग्रजी भाषांतर असे -

The City of Nandurbar Shines on earth circles essence of goods of three world. the seat of plesere Because in it there appeac for all satisfied people, Pleasures which indeed will infatuate even gods "

हरिकवी व प्रेमानंद यांच्या काव्यात वर्णिलेले शंभूराज देसाई त्या परगण्याचे राजेच मानले जात. केवळ या दोघांनीच नव्हे तर अन्य अनेक विव्दान ब्राम्हणांनी शंभूनृपाची मुक्त कंठाने स्तुती केलीय. प्रेमानंद कवीने आपल्या ' रणयज्ञ ' काव्यात ' राजे, राष्ट्र, आज्ञा श्रीमुखे भारवी ' ' नृप ये कहयू ' इत्यादि कथनांनी शंभूराज देसाई यांचा सतत उल्लेख केलाय.

शंभूराज विद्वान होते. ब्राम्हणांची परिक्षा ते स्वतः घेत. कलाविज्ञ व राज्यकार-भार कुशल होते. देसाई घराण्याच्या कागदपत्रात या शंभूराजा विषयी एक आश्चर्य-कारक नोंद आढळते.

शंभूदासाच्या कीर्तिमुळे त्यांचे वैरी ही पुष्कळ होते. अब्दुल्लामिया पीरजादे याने बादशहा आलमगिराकडे याच वैरापायी चुगली केली. येवढया मोठ्या नंदुरबार पर-गण्याची देशमुखी एका अविदास चालवायला देणे योग्य नाही म्हणून त्याने त्याचे कान भरले. औरंगजेबास ही गोष्ट पटली त्याने शंभूदासांना तातडीने दिल्ली दरबारी बोलाविले. दरबारात शंभुदासांना सांगण्यात आले की जर त्यांनी इस्लाम धर्माचा अंगिकार केला तरच त्यांच्याकडे वंश परंपरेने चालत असलेली कानुगोई व अन्य वतने पुढे चालू राहातील अन्यथा ती सर्वच्यासर्व तात्काळ खालसा करण्यात येतील. शंभू राजांनी विचार करण्यासाठी बादशहाकडून एका दिवसाची मुदत मागितली. पण ती नामंजूर करून बादशहाने 'अर्ध घटिकात' नेमके काय ते सांगावे असे बजावले. शेवटी खूप विचार करून शंभूदासांनी असे ठरविले की मी 'दुजात' झालो तर एकटच्या माझे पतन होईल, पण वंशाची जागिर सुरक्षित राहील. त्यांनी बादशहाला सांगितले की, माझ्या वंशातील दुसरा कुणीही यापुढें अशा प्रकारे दुजात होणार नाही, ही अट मान्य असेल तर मी धर्मांतर करतो.

बादशहाने शंभूदासांची ही अट मान्य केली. याच शंभूराजांनी नंतर अब्दुल्ला

मोमींन या नावाने शेष आयुष्य दिल्लीत काढले. पुढे त्यांना अब्दुल्ला पिरजादा याने विष देवून ठार मारले. नंदुरबारला निलकंठ महादेवाजवळील स्मशानभूमी समोर 'हजिरा' म्हणून एक कबर आहे. देसायांच्या वंशजांचे मत असे की ही कबर म्हणजे राजा शिवदासांचीच कबर होय. दिल्लींत त्यांचा मृत्यू झाल्यानंतर दोन चार वर्षांनी त्यांच्या अस्थी आणून येथे पुरण्यात आल्या असाव्यात.

शंभू या एकाच नावाच्या दोन राजांच्या आयुष्यात एकाच बादशहाने घडवून आणलेल्या शोकांतिकेचे हे साम्य थक्क करणारे आहे. फरक इतकाच की एकाची कथा ज्ञात होती, दुसऱ्याची सर्वथा अज्ञात.

*संदर्भ–*


1) Lassen Ind All. IV 83
2) Yule's Calthay II 413
3) Brigg's Ferrista IV 283
4) Brigg's Ferrista IV 293
5) Brigg's Ferrista II 315
6) Brigg's Ferrista II 315
7) Gladwin's Ain I Akabari II 228
8) Elliot's History VII 465
९) संशोधक, वर्ष ८, अंक ३, आक्टोबर १८३९ पृ. १–७
१०) ऐतिहासिक लेख चर्चा भाग ४ १९५४ पृ. ६४
श्री. शिवलाल देसाई यांचा लेख


---


प्रा. डॉ. मु. ब. शहा
चिटणीस
इ. वि. का. राजवाडे मंडळ, धुळे

# शिवोत्तरकालीन शस्त्रास्त्रे

– प्रा. गजानन भिडे

शिवकाल हा महाराष्ट्राच्या इतिहासात अभ्युदयाचा कालखंड मानला जातो. सभोवतालच्या बलवान मुस्लीम सत्तेशो प्रखर संघर्ष करून शिवाजीने स्वसामर्थ्यावर महाराष्ट्रात स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले. चैतन्यहिन बनलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला. समाजाला स्वराष्ट्र, स्वधर्म रक्षणाची प्रेरणा दिली. या यशस्वी राष्ट्रनिर्मितीसाठी व त्याचे दिर्घकाळ अस्तित्व टिकविण्यासाठी शिवाजीने राज्यकारभार, युद्धपद्धती, सैन्य व शस्त्रास्त्रे इत्यादींच्या क्षेत्रात काही मूलभूत तत्वांचा स्विकार केला. संभाजी व रामराजाच्या काळात या तत्वांवर आधारलेल्या साम्राज्याच्या रक्षणाचे कार्य केले गेले.

### *मराठा सत्तेचे विकसीत स्वरूप –*

छत्रपती शाहूच्या काळापासून मराठा सत्तेच्या इतिहासातील दुसऱ्या टप्प्याची व विकसीत अवस्थेची सुरुवात होते. पेशवा बाजीराव पहिला याने स्विकारलेल्या धोरणामुळे शिवकालापेक्षा मराठ्यांचे साम्राज्य विस्तारीत बनले. या विस्तिर्ण साम्राज्याचे रक्षण करणे मराठ्यांना भावीकाळात अपरिहार्य ठरले, याकाळात दक्षिणेतील स्वतंत्र मुस्लिम सत्ता नष्ट झाल्या असल्या तरी मुघलांचा प्रतिनिधी म्हणविणाऱ्या निजामाची संघर्षात्मक सत्ता येथे उदयास आली. शिवकालात नाममात्र असलेल्या ब्रिटीश, पोर्तुगीज या अभारतीय सत्तांनी आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यास शिवोत्तर काळातच सुरुवात केली. वैज्ञानिक दृष्ट्या प्रगतिशील असलेल्या या शत्रूंची प्रगत शस्त्रास्त्रे, शिस्तबद्ध सैन्यरचना या बरोबर खंबीरपणे संघर्ष करणे मराठ्यांना आवश्यक ठरले. बदलती परिस्थिती व काही प्रमाणात दूरदृष्टीचा अभाव यामुळे याकाळातील राज्यकर्त्यांनी शिवकालातील साम्राज्याची मूलभूत तत्त्वे सोडून दिली. वतनदारी पद्धतीचा स्विकार करून सरदारमंडळ निर्माण केले. गनिमीयुद्धापेक्षा मैदानावरील समोरासमोरची युद्धपद्धती स्विका-

रली गेली. युद्धमोहिमांना सुटसुटीतपणापेक्षा, डामडौलाचे, नबाबी स्वरुप दिले गेले. प्रशासकीय यंत्रणेत असंख्य बदल झाले. या स्थित्यंतराचा प्रभाव शस्त्रास्त्रांच्या बाबतीतही पडलेला दिसतो. शत्रूच्या सामर्थ्यानुसार आपल्या सामर्थ्या व युद्धपद्धतीत बदल घडविणे कोणत्याही सत्ताधिशांच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळेच शिवोत्तर काळात तोफखाना' या विभागाला सैन्याचा एक अविभाज्य भाग म्हणून स्थान मिळाले. संरक्षणात्मक किंवा नजिक आलेल्या शत्रूवर आक्रमण करण्यासाठी असलेल्या शस्त्रांपेक्षा, दूर पल्यावर असलेल्या शत्रूवर मारा करण्यासाठी उपयोगी ठरणारी शस्त्रास्त्रे याकाळात महत्वाची ठरली. या शस्त्रास्त्रांसाठी केवळ परकीय सत्ता किंवा व्यापाऱ्यांवर अवलंबून न रहाता राज्यकर्त्यांनी त्यांचे उत्पादन करण्यास सुरवात केली. शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचे तंत्र जाणून घेण्यात आले. शिवोत्तरकाळातील राज्यकर्त्यांनी स्विकारलेला हा वेगळा, स्वतंत्र व अभिमानास्पद पवित्रा होता. तोफा, बंदुका, जेंजाला, होके, गर्नाला व धनुष्यबाण ही या काळातील प्रमुख शस्त्रास्त्रे होती.

*तोफा–*

शिवाजीला या अभारतीय शत्रूच्या सामर्थ्यांची जाणीव झालेली होती असे त्याच्या आरमार दलाच्या निर्मितीवरुन जाणवते. तथापि मर्यादित सामर्थ्य, दैनंदिन शत्रूसंघर्ष व अल्प आयुष्य यामुळे त्याला तोफखान्याच्या क्षेत्रात फारशी प्रगत करता आली नाही. मर्यादित लष्करी सामर्थ्याच्या जोरावर मोठा विजय किंवा फायदा मिळविणे हे त्याचे मूलभूत ध्येय होते.त्यामुळे या काळात सैन्याच्या जलद हालचालींना अडथळा आणणारे हत्तींदळ, तोफखाना यांचा त्याने सैन्य विभागात स्विकार केला नाही. किल्ल्याच्या रक्षणासाठी त्याने तोफा ठेवलेल्या होत्या. या तोफा व दारूगोळा तो परकीयांकडून मिळवित असे. दारुगोळा व ही शस्त्रास्त्रे मिळविण्याच्या अपेक्षेनीच त्याने या परकियांच्या वखारींना आपल्या साम्राज्यात जागा दिली होती असे फॅक्टरी रेकॉर्डस्वरुन दिसुन येते.[1] १६७३ साली फ्रेंचाकडून ८८ बंदुका व २००० मण दारुगोळा शिवाजीने विकत घेतला होता.[2] पोर्तुगीजांकडून मोठ्या प्रमाणावर शिवाजीला दारुगोळा व शस्त्रास्त्रे मिळत असत. ब्रिटीशांकडेही तो वारंवार या शस्त्रास्त्रांची व दारुगोळ्यांची मागणी करीत असल्याचे व काही वेळा ब्रिटीशांनी पोर्तुगीज एजंटांमार्फत शस्त्रास्त्रे शिवाजीला विकल्याची तर काही वेळा शत्रूत्व टाळण्यासाठी नकार दिल्याची माहिती फॅक्टरी रेकॉर्डस्वरून मिळते.[3] संभाजी व राजारामाच्या काळात या अवस्थेत फारसा फरक पडला नाही. तथापि इंग्रज व पोर्तुगीज संभाजीला मदत करण्यास उत्सुक असत असे दिसते [४]

छत्रपती शाहूच्या काळापासून मराठा सत्तेचे स्वरुप बदलले पहिल्या बाजीरावने

आपल्या सैन्याचे स्वरुप बदलण्यास, त्याचे आधुनिकीकरण करण्यास सुरवात केली. किल्याच्या संरक्षणार्थ व सैन्यातही तोफखान्याला महत्वाचे स्थान आल्यामुळे तोफा तयार करण्याचे तंत्र आत्मसात करण्यास सुरुवात याकाळात झाली. पुणे, रेवदंडा, जैनाबाद, सातारा, ग्वाल्हेर, इंदोर इत्यादि ठिकाणी तोफा बनविण्याचे कारखाने सुरु करण्यात आले. महादजी अबाजी पुरंदरे याने पेशवा बाजीराव व चिमाजी आप्पाला लिहिलेल्या पत्रात तोफा निर्मितीचे तंत्र स्पष्ट केले आहे.[५] त्यात साचा कसा बनवितात. कलभूल मेणवूल त्यावर मातीचा थर कसा देतात, तांबे, पितळ, लोखंड इ. पंचधातूंचा किंवा केवळ लोखंडाचा रस एकाच वेळी कसा तयार केला जातो याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. माधवराव पेशव्यांनी नाना फडणीसास लिहिलेल्या पत्रात[६] तोफा बनविताना घ्यावयाच्या काळजीची व सैन्याच्या उपयुक्ततेसाठी सरासरी साडेतीन तसू दळाच्या तोफा बनविण्याचीं सूचना केली आहे. यशवंतराव होळकरांनी तर या क्षेत्रात प्राविण्य मिळविल्याची माहिती मिळते. यावरुन याकाळात तोफाच्या बनविण्याचे तंत्रज्ञान राज्यकर्त्यांनी आत्मसात केलेले दिसते. पेशवा बाजीरावाच्या तोफा व दारुगोळा बनविण्याच्या कारखान्याला कॅप्टन विल्यम गार्डननें भेट दिली होती. त्याने तेथील प्रगतीविषयी अभिप्रायही दिला आहे तो म्हणतो.[७] " I visited the foundry, where I saw many coehorns and bomb shells said to have been cast there and a form of a thirteen inch mortar. I was told they make such with great ease and have learned the art of running iron for making shot." याकाळात सामान्यतः पंचधातूच्या किंवा ब्रिडाच्या तोफा बनविल्या जात असत. या तोफांना चांद, लक्ष्मी, गुलाब, यशवंती, मार्तंड, व्याघ्रमुखी भवानीप्रसाद, कालपहाड, राजहंस, दिलदार, दिलपसंत, जयवंती, गरूड, मकरध्वज, ही नांवे दिलेली दिसतात.[८] पेशवे काळातील सर्व प्रमुख युद्धातून या तोफांचा उपयोग केला गेला. इब्राहिमखान गारदी, सरदार पानसे, यशवंतराव होळकर यांच्या नेतृत्वाखाली या तोफखान्याने उत्तम कामगिरी केल्याची माहिती मिळते.

## रणगाडे-

प्रत्यक्ष युद्धाच्यावेळी उपयोगी पडणारे व एका ठिकाणाहून तोफा दुसरीकडे नेण्यासाठी गाडें तयार करीत. हे गाडे लाकडी असून आख व पट्ट्यासाठी लोखंडाचा उपयोग केला जात होता. हे गाडे स्थानिक किंवा शासकीय वतनदार असलेल्या सुतार व लोहाराकडून तयार करून घेतले जात असे. विसाजी कृष्ण याने नाना फडणीसास लिहिलेल्या पत्रावरून दिसते.[९]

*तोफगोळे-*

तोफेसाठी आवश्यक असणारे गोळे शिसे किंवा लोखंडाचे बनविले जात. तोफांच्या गोळ्यांचे वजन सामान्यतः २ किलो पासून १२ किलो पर्यंत असे.[10] माधवराव पेशव्यांनी १७६५-६६ साली तोफेचे गोळे बनविण्याचा कारखाना जुन्नर प्रांतातील आंबेगांव येथे व १७७० साली पुणे येथे सुरु केल्याची माहिती मिळते.[11] तोफेचे गोळे तयार करण्याचा एक कारखाना नागोठाण्यास असून १७६७ ला रघुनाथ-रावांनी आनंदवल्ली येथे अशाच प्रकारचा एक कारखाना सुरु केल्याचे उल्लेख मिळतात.[12] तोफेचे गोळे तयार करण्यासाठी लागणारे शिसे, सल्फर इत्यादी वस्तू पेशवे त्यांचे सरदार, इंग्रज व पोर्तुगीजांकडून मिळवित असल्याचे उल्लेख फॅक्टरी रेकॉर्डस्‌मध्ये आढळतात. मोठ्या आकाराच्या तोफा किल्याच्या संरक्षणार्थ ठेवल्या जात तर युद्ध काळात सैन्यांच्या हालचालींना सोईस्कर म्हणून सेनाधिकारी लहान आका-राच्या तोफा व तोफगोळ्याची मागणी करीत असत.[13]

*बंदुका-*

शस्त्रांच्या क्षेत्रात तोफांच्या खालोखाल बंदुकांना महत्वाचे स्थान होते. शिवकाळात महाराष्ट्रात बंदुका तयार करण्याचा कारखाना असल्याचे उल्लेख मिळत नाही. शिवाजी, इंग्रज, पोर्तुगीज किंवा फ्रेंचांकडून बंदुका व दारुगोळा मिळ-विण्याचा प्रयत्न करीत असे व मिळवितही होता असे फॅक्टरी रेकॉर्डवरुन आढळते.[14]

शिवोत्तर काळात तोफखान्यात बंदुकांना महत्वाचे स्थान मिळत गेल्याने या काळातील राज्यकर्त्यांनी बंदुका निर्मितीचे तंत्रही आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. जुन्या व खराब झालेल्या बंदुका मराठ्यांना विकून त्यांना या शस्त्रांच्या बाबतीत अप्रगत ठेवण्याच्या ब्रिटीशांच्या धोरणाला[15] मराठा राज्यकर्त्यांनी दिलेला धक्का होता. मराठे स्वतंत्रपणे बंदुका निर्माण करू लागल्यास ब्रिटीशांना ते त्रासदायक ठरेल याची ब्रिटीशांना जाणीव झालेली होती.[16]

१७५६ साली पेशवा बाळाजी बाजीरावने जैनाबादचा कमाविसदार रामाजी केशव याला लिहिलेल्या पत्रात.[17] लहान आकाराच्या बंदुका तयार करून पाठ-विण्यास कळविले आहे. यावरुन या काळात जैनाबाद व महाराष्ट्रातील इतर प्रमुख ठिकाणी बंदुका तयार करण्याचे कारखाने सुरु झालेले दिसतात. त्यांनाच 'कडाबिनी म्हणत असावेत. युद्धात त्यांचा उपयोग करण्यासही सुरुवात झालेली दिसते. तथापि पुढील काळात हे तंत्र मोठ्या प्रमाणावर विकसित करण्याचे प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

बंदुका तयार करण्याबरोबरच परकीय सत्ता किंवा व्यापाऱ्यांकडून बंदुका व दारुगोळा मिळविण्याचे प्रयत्न केले जात. ९ जानेवारी १७२२ रोजी पेशवा बाजीरावनी पोर्तुगीजांबरोबर केलेल्या करारातील ५ व्या कलमानुसार पोर्तुगीजांकडून बंदुका, तोफा, दारुगोळा योग्य किंमतीत मिळावा असे बंधन होते.[१८] १० फेब्रुवारी १७३१ रोजी कल्याणाचा सुभेदार कृष्णराव महादेव याने पोर्तुगीज कॅप्टन बरोबर केलेल्या तहातील दहाव्या कलमानुसार मराठ्यांना पोर्तुगीजांकडून दारुगोळा, बंदुका, शिसे व सल्फर योग्य किंमतीत मिळावे अशी अट घातलेली दिसते [१९] कान्होजी आंग्रे आपल्या ताब्यात आलेले परकीय जहाज परत करण्यास तयार असला तरी त्या जहाजावरील बंदुका परत करण्यास तो फारसा उत्सुक नसे.[२०] १७८६ साली पुणे दरबारने आपल्या पोर्तुगीज एजंटला काही बंदुका व दारुगोळा मिळवून देण्याविषयी लिहिलेले होते.[२१] छत्रपती शाहू कान्होजी आंग्रे, आनंदराव धूळप, परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे इंग्रजांकडून बंदुका व दारूगोळा मिळविण्याचे प्रयत्न करीत असल्याचे उल्लेख मिळतात.[२२]

मराठी सैन्यात महाराष्ट्रातील कारखान्यात तयार झालेल्या व इंग्रज, पोर्तुगीज यांच्याकडून मिळविलेल्या बंदुका प्रचलित होत्या. या बंदुकांचे फरमासी बंदुका, लाहुरी बंदुका, नखरीं बंदुका चापाच्या बंदुका, तोडयाच्या बंदुका व तोडयाच्या गजासुद्धा बंदुका, इत्यादी प्रकार होते.[२३] या बंदुकातून उडविण्यासाठी दारुचे लहान लहान गोळे शिसे, कथील किंवा लोखंड घालून तयार करीत असावेत. चापाच्या बंदुकातून दारुच्या तोटयाच्या सहाय्याने लहान लहान मारा उडविल्या जात[२४]

तोफाप्रमाणे बंदुकांची निर्मिती करण्याचे तंत्र शिवोत्तरकाळातील राज्यकर्त्यांनी आत्मसात करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या कारखान्यातून तयार होणाऱ्या बंदुका फारशा प्रगतीशील नसल्या तरी तत्कालीन शत्रूंच्या बरोबरीच्या होत्या. कप्टन टोन या बंदुकांविषयी म्हणतो की,[२५] 'The guns of the Maratha armies were tolerably well Cast' निरनिराळ्या युद्धातून या बंदुकांनी उत्तम कामगिरी बजावून मराठ्यांना यश मिळवून दिलेले दिसते. शिवोत्तरकाळात बंदुक निर्मितीचे ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला गेला. पण भावी काळात त्या तंत्रात आवश्यक ते बदल करण्याचा पाठपुरावा केलेला दिसत नाही.

### *जेजाला, होके, गनाळि –*

शस्त्रात तोफा बंदुकाबरोबरच इतर शस्त्रास्त्रांचाही समावेश होता. मागच्या बाजूस दास्तान व पुढे नळी असलेले सुमारे ५ मी. पासून ६ मी. पर्यन्त लांब असलेले जेजाले हे शस्त्र उंटावरून वापरले जाई. उंटाच्या पाठीवर बसलेला स्वार या शस्त्रा-

स्राच्या आधारे अचूक नेमबाजी करू शके. दारू गोळ्यात तयार केलेले लहान लहान छर्‍रे यातून उडविले जात. गर्नाळा हे शस्त्र कित्येकदा युद्धाच्या वेळी तोफेच्या गाड्याप्रमाणे लहान गाड्यावर ठेवून उडविले जाई. किल्याच्या तटबंदीच्या उतरत्या लांब भोकांमधूनही गर्नाळच्याच्या सहाय्याने शत्रूवर आक्रमण केले जाई. हात गर्नाळा हे बंदुकीप्रमाणे हातात धरून उडविण्याचे शस्त्र असावे, सैन्यात हात गर्नाळा उडविणारे स्वतंत्र सैनिक होते. या विविध शस्त्रांसाठी आवश्यक असणारा दारुगोळा तयार करण्यास या काळात सुरवात झाली. निरनिराळ्या युद्धातून या शस्त्रास्त्रांचा वापर करून शत्रूवर अग्निचा पर्जन्याप्रमाणे वर्षाव केल्याची वर्णने वाचावयास मिळतात.[२६]

शिवोत्तर काळात या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचे तंत्र आत्मसात करण्याबरोबरच त्या शस्त्रास्त्रांच्या कार्यक्षमतेवर लक्ष दिले जात असे. वर्षातून एकदा दसऱ्याच्या वेळी ही सर्व आयुधे घासून दुरुस्त करुन सुसज्ज बनविली जात त्याबरोबरच बदुका, काही तोफा जेंजाला यांची महिन्यातून एकदा तपासणी व दुरूस्ती केली जात होती. पेशव्यांकडे तोफेला लावण्यासाठी ताडी[२७] व जेंजाल्यासाठी टंकणखार[२८] मागणी केल्याचे सेनाधिकाऱ्याच्या पत्रावरून आढळते. यावरून याकाळात शस्त्रास्त्रांच्या देखभाल व दुरुस्तीकडे लक्ष दिले जात होते असे दिसते. तथापि या शस्त्रास्त्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न मात्र झालेले नाहीत. त्यामुळेच इंग्रजाजवळ असलेल्या सुधारित नवनवीन शस्त्रास्त्रांपुढे मराठ्यांचा भावी काळात टिकाव लागू शकला नाही असे असले तरी शिवोत्तर काळातील राज्यकर्त्यांनी बदलत्या काळास आवश्यक असणाऱ्या व शत्रूला यशस्वीपणे तोंड देऊ शकणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचे तंत्रज्ञान जाणून घेतले व काही काळ प्रगत शस्त्रास्त्रे निर्माण करण्यात यश मिळविले असे मात्र निश्चितपणे मानता येते व हा एक त्यांचा अभिमानास्पद उपक्रम होता असे म्हणता येते.

## *तलवारी –*

तलवारीच्या बाबतीत प्रांताप्रातांत काही फरक दिसतो. शिवकालीन तलवारी सामान्यतः वाकदार असत. पेशवे काळात मोठ्या प्रमाणावर सरळ तलवारी बनविण्यास सुरवात झाली हा बदल का करण्यात आला याविषयी निश्चित माहिती मिळत नाही बहुदा समोरासमोर व मोकळ्या मैदानातील युद्धे या काळात सुरू झाल्याने हा बदल केला असावा. या काळात भिन्नभिन्न आकाराच्या तलवारी प्रचलित होत्या त्यात बाकदार तलवारी, सरळ पट्ट्यासारख्या तलवारी, पुढील बाजूस पसरट गोलाकार आकाराच्या तलवारी, समोरच्या बाजूस टोक असलेल्या करवती पात्याच्या तलवारी, धावत्या नागिणीच्या आकाराच्या नागमोडी दुधारी किंवा

करवती तलवारी आढळतात. तलवारींच्या मुठींमध्येही या काळात बदल झाला. साधी मूठ, गोलाकार मूठ, घोडमुखी मूठ, राघुच्या तोंडाच्या आकाराची मूठ, दास्तान लावलेली मूठ असे विविध प्रकार प्रचलित होते. तलवारीप्रमाणेच दाणपट्ट्याला या काळात महत्वाचे स्थान मिळाले. या तलवारी बुहुदा पोलादाच्या, क्वचित लोखंडाच्या करीत, हे काम बहुदा स्थानिक किंवा वतनदार लोहाराकडून करून घेतले जात असावे. याशिवाय तलवारीत इतरही भिन्न भिन्न आकर्षक प्रकार आढळतात. उदा. वितोडी, नबाबवियाझी.

*ढाल –*

घोडेस्वार व पायदळ सैनिकाच्या दृष्टीने उपयुक्त असे हे शस्त्र होय. सामान्यत: बचावासाठी याचा उपयोग केला जात असे. क्वचित प्रसंगी ढालीला अणकुचिदार खिळे लावून हल्ला करण्यासाठीही त्याचा उपयोग करीत. ढाल बहुधा कासवाची पाठ, गेंडयाचे कातडे, लोखंड किंवा पोलाद यापासून बनवित. ढाल बनविणारे कारागीर स्थानिक असत. ढालीचे रोझडी ढाल, बुदल्याची ढाल, गेंडयाची ढाल असे प्रकार आढळतात.

*भाला –*

घोडेस्वाराला उपयुक्त असणारे शस्त्र म्हणजे भाला. भाल्याची काठी लांब व मजबूत असे. ही काठी १॥ मी. ते ३ मी. लांब असून त्याचा परिघ दहा से. मी. असे. या दांडयाच्या निमुळत्या टोकाच्या भाल्याचे पाते आठ ते दहा से. मी. खोल रुत-विलेले असे. पात्याची बाहेर लांबी ६० से. मी. पासून १ मी. ते १॥ मी. पर्यंत असे. भाल्याच्या पात्याला दोन्ही बाजूने धार असून समोर त्याचे टोक निमुळते होत गेलेले होते. कित्येकदा या पात्याला विषही लावले जाई.

*धनुष्य बाण –*

मराठा काळात भाल्याप्रमाणेच धनुष्य बाणाचाही उपयोग होता. बाणांच्या सहाय्याने शत्रूची मुंडकी उडविली जात. धनुष्य ९० से मी. ते १॥ मी. लांबीचे व धनुष्याची पट्टी ४ से. मी. रुंदीची व पोलादाची असे. टोकाला वाकलेल्या या पट्टीच्या कडेला खाचा असून त्यात बकऱ्याची तात अडकविलेली असे. तातेच्याभोबती रेशीम गुंडाळून त्याची धनुष्य दोरी बनविली जाई. बाण लाकडाचे व पुढे पोलादी टोक असलेले किंवा संपूर्ण पोलादी पुढे निमुळते टोक आलेले असत. धनुष्य व बाण येथेच

तयार केले जात. पेशवेकाळात रघुनाथरावानी बाण तयार करण्याच्या कारखान्यासाठी नाशिक येथे एक इमारत बांधल्याचे उल्लेख मिळतात.[२८] १७७३-७४ साली पुरंदर किल्यावरील शस्रास्रांच्या यादीत[२९] व १७९५ च्या युद्धात वापरल्या गेलेल्या शस्रास्रात[३०] धनुष्य व बाणांचा समावेश होता. यावरुन धनुष्य बाणांचा उपयुक्त शस्र म्हणून पेशवेकाळाच्या अखेरीपर्यंत उपयोग केलेला दिसतो.

याशिवाय कमरेच्या पट्टचात किंवा कमरेला गुंडाळलेल्या रुमालात अडकवायचे एक ते दीड मी. लांबीचे पाते असलेले पेषकवच, दोन कांबीची मूठ व २५ ते ३० से. मी. लांबीचे पाते असलेली कटचार, २० ते २५ से.मी. लांबीची व निरनिराळ्या आकाराची पाती असलेले जंबिये, मध्यभागी साधी मूठ व दोन्ही बाजूस पाते असलेले, शत्रूच्या गराड्यातून बाहेर पडण्यास उपयोगी पडणारे 'माडू' नावाचे शस्र १ मी. ते १।। मी लांब व ३ ते ४ से मी. रुंद लवचिक पाते असलेला पट्टा, ९० से मी. लांब व १० से मी रुंद पुढील टोकास व दोन्ही बाजूस धार असलेला कमरेला लटकावयाचा 'खांडा' शत्रूला जायबंदी करण्यासाठीं ६ मी. लांबीचे व समोरच्या बाजूस निमूळते टोक होत गेलेले 'सांगा' नावाचे लोखंडी शस्त्र, शत्रूवर प्रहार करण्यासाठी अंडाकृती टोक व रविप्रमाणे करवतीच्या आकाराची पाने असलेले 'गुरगुज' नावाचे शस्त्र, घोडेस्वाराने शत्रूवर फेकून मारुन बुमरॅगप्रमाणे परत आपल्या हातात घ्यावयाचे 'चक्र' नावाचे शस्र, वाघनखे, विविध आकाराची चिलखते, शिरस्ताणे, वगैरे शस्रे व अस्त्रे या काळात प्रचलित होती. यातील काही शस्त्रे आक्रमणासाठी तर काही संरक्षणात्मक, बचावासाठी वापरली जात असत.

शिवोत्तर काळात पारंपारिक शस्त्रास्त्रांमध्ये फारसा बदल केला गेला नाही. उदा. तलवारी ढाल इ. या काळात बदललेल्या राजकीय स्थितीच्या अनुरोधाने बाकीच्या शस्त्रास्त्रांच्या बाबतील या काळात प्रगती झालेली दिसते. लांब पल्ल्याच्या शस्त्रास्त्रांसाठी केवळ परकीय सत्तेवरच अवलंबून न राहता त्याचे स्वतंत्रपणे उत्पादन करण्यास या काळात सुरुवात झाली. शस्त्र निर्मितीचे तंत्र आत्मसात केले गेले. त्यातील बारीक सारीक फरकावरही विशेषत्वाने लक्ष दिलें गेले. ब्रिटीश सेनाधिकाऱ्यांनी या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीविषयी प्रशंसोद्गार काढलेले आहेत. केवळ तोफा व बंदुकाच्या निर्मितीवर लक्ष न देता दारुगोळा, तोफेचे गोळे, धनुष्यबाण, जेंजाळे, गर्नाळा बनविण्याचे यशस्वी प्रयत्नही झालेले दिसून येतात. मराठ्यांनी अशा प्रकारे उत्पादन चालू ठेवल्यास ब्रिटीशांना ते त्रासदायक ठरेल याची ब्रिटीशांना जाणीव झालेली दिसून येते.

तथापि असे प्रयत्न एकसंधीमत्व किंवा, सांधिक प्रयत्न आढळत नाहीत. शस्त्रास्त्र निर्मितीचे हे प्रयत्न छत्रपतिपासून सरदारांपर्यंत प्रत्येकजण स्वतंत्रपणे करीत असतांना

दिसतो. त्यात एकसूत्रता दिसत नाही. शस्त्रास्त्रांच्या देखरेखीसाठी स्वतंत्र वर्ग निर्माण केलेला नाही, किंवा आवश्यक त्या गरजेनुसार शस्त्रास्त्रांमध्ये दुर्दैवाने बदल सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्नही केले गेलेले नाहीत.

असे असले तरी निदान शस्त्रास्त्र निर्मितीच्या बाबतीत याकाळातील राज्यकर्ते व सरदारांनी द्रष्टेपणाचे धोरण स्विकारलें होते, त्यादिशेने प्रयत्न केले होते हे मात्र निश्चितपणे सांगता येते. हे धोरण म्हणजे काहीशा प्रमाणात अभिमानास्पद धोरण होते यात शंका नाही.

*संदर्भ–*


1) Surendranath Sen– The Military system of the Marathas P. 96
2) Factory Records Surat letter dated 12 January 1673–74 P. II
3) Surendranath Sen– The Military system of the Marathas P. 98
4) Factory Records Surat vol. 90 Part III Fol. 51
५) पेशवा दप्तर १७ पत्रक्रमांक ३२ व ४५ पृष्ठ २७ व ३६
६) पेशवा दप्तर ३९ पत्रक्रमांक १२७ पृष्ठ १२६–२७
7) Forrest Selection from state papers Maratha series vol I P. 79
8) सवाई माधवराव रोजनिशी भाग– २ पृष्ठ १८९
९) पेशवा दप्तर ३५ पत्रक्रमांक १७९ पृष्ठ १५१ व Tone Illustrations of some Institutions of the Maratha people P. 54–55
१०) पेशवा दप्तर १ पत्रक्रमांक ३० पृष्ठ २२
११) पेशवा रोजनिशी भाग – ९ पृष्ठ ३३३ व ३३५
१२) पेशवा दप्तर २२ पत्र क्र, २०२ पृष्ठ ११८
१३) पेशवा दप्तर १ पत्र क्रमांक २६ पृष्ठ २०
14) Surendranath Sen– Military system of the Marathas P. 56
15) Factory Records Surat vol. 87 Fol. 90
16) Tone Illustrations of some Institutions of the Maratha people Page 54–55
१७) पेशवा दप्तर २३ पत्रक्रमांक ७१ पृष्ठ ५५
18) Biker Tratados do India vol. VI P. 11
19) Ibid P. 177
20) Surendranath Sen– The Military system of the Marathas P. 101
21) Biker– Tratados do India vol. VIII P. 236

22) Surendranath Sen-The Military system of the Maratha P. 102
२३) पेशवा दप्तर ४५ पृष्ठ ९० व १४३
२४) पेशवा दप्तर ३५ पत्रक्रमांक १८१ पृष्ठ १५३
25) Tone Illustrations of some institutions of the Maratha people P. 54-55
२६) पेशवा दप्तर ३५ पत्रक्रमांक ९६ पृष्ठ ८२
२७) पेशवा दप्तर २२ पत्रक्रमांक १४८ पृष्ठ ९१
२८) पेशवा दप्तर २२ पत्रक्रमांक ७० पृष्ठ ४९
२९) पेशवा दप्तर ३९ पत्रक्रमांक ५३ पृष्ठ ४०
३०) पेशवा दप्तर ४५ पृष्ठ ७०
३१) पेशवा दप्तर ४५ पत्रक्रमांक ५१ पृष्ठ १४७

---

प्रा. गजानन भिडे
दयानंद कला व शास्त्र
महाविद्यालय, सोलापूर,

# श्री रामकथेचे नवउन्मेषकारी कथन : अभंग रामायण

– प्रा. डॉ. विश्वास पाटील

---

रामकथा भारतीय मनाला मोहिनी घालणारी अद्‌भुत संजीवनी आहे. विभिन्न भाषेत, संप्रदायात, विचार–प्रवाहात रामरायाची कथा विविध रुपे घेऊन भारतीय मनाला भेंटत रहाते. एकटा राम आणि एकटा कृष्ण भारतीय मनाचे मानबिंदू बनतात. राम उत्तर आणि दक्षिण सांधतो तर कृष्ण पूर्व – पश्चिम जोडून टाकतो. आंतर भारतीचे काम इतक्या यशस्वीपणे करणारी ही सांस्कृतिक जोडी भारतीयांच्या अभिव्यक्तीच्या नाना दालनात मूर्त होत रहाते.

‘ रामायण सत कोटि अपारा ।’ असे गोस्वामी तुळसीदास म्हणतात– त्याला मग निश्चित अर्थ प्राप्त होतो. चाळीसगाव तालुक्यात शिरसगाव टाकळी येथे सन १९०५ साली जन्माला आलेले आदिवासी संत सारस्वत श्री. शंकर महाराज यांच्या ‘ अभंग रामायण ’ ग्रंथाची हस्तलिखित पोथी नुकतीच बघायला मिळाली. प्रस्तुत पोथी शहाद्याचे श्री. तुकाराम नागो शिंपी– सेवानिवृत्त शिक्षक– यांनी मूळ पोथीवरुन उतरवून घेतली आहे. पोथीतील अक्षर सुवाच्य, वाटोळे व वळणदार आहे. पोथी श्री. तुकाराम शिंपी गुरुजींच्याच घरी सुरक्षित आहे.

श्री. शंकर महाराजांचे जीवन अवघे ३० वर्षाचे आहे. वयाच्या ३० व्या वर्षी सन १९४५ साली महाराजांनी इहलोकीचा निरोप घेतला. त्यांची रामभक्ती, त्यांना झालेले श्री दत्त गुरुंचे साक्षात् दर्शन, आजानुबाहू गौरवर्ण काया– ही भक्त मंडळींची श्रद्धास्थाने होत. त्यांचे काव्य, कथाप्रियता, अलंकार - रस - योजना बघून पंडित साहित्य रसिकालाही भुरळ पडते. प्रसाद हा तर संतसाहित्याचा अंगभूत गुण ! महाराजांचे काव्य या गुणाने ओथंबलेले आहे.

रामकथेसाठी महाराजांनी मुख्यत: गोस्वामी तुळसीदासजींच्या ‘रामचरितमानस’ या महाकाव्याला प्रमाण मानले आहे. त्यांचे अनेक अभंग तुळसी रामायणाचा उत्कट कलात्मक अनुवाद वाटण्याइतपत सुरम्य आहेत. या कथेच्या निमित्ताने महाराजांनी आपले जीवन व भक्ति विषयक तत्वज्ञान ही रेखीवपणे मांडले आहे आपल्या सद्‌गुरुला वंदन करतांना महाराज म्हणतात–

* तीन शिरे सहा हात तथा माझा दंडवत ।
मोठा उपकार केला मज उपदेश केला ।
गुरू होऊनीं प्रसन्न सांगितले आत्मज्ञान ।
शंकर म्हणे धन्य झालो दत्तकृपे मी तरलो ।।

(अभंग रामायण / बालकांड अभंग ४०६)

आपल्या काव्यग्रंथाचा आरंभ करतांना तुळसीदासांप्रमाणेच महाराज मंगलाचरण लिहितात-

* नमन माझे देवराया बुद्धि देई तव गुण गाया ।
आदि मध्य अंती तूचि एक जगत्पती ।
ऐसे जाणोनिया मना शंकर घेतो लोटांगणा ।

(बालकांड - अभंग १)

मंगलाचरणाचे प्रारंभिक अभंग लिहिल्यानंतर महाराजांनी एकूण ४२५ अभंग लिहिले आहेत. यात ते मानव - जन्माचे रहस्य उलगडवून दाखवतात. शिकवण देतात. संतांचे गुणवर्णन करतांना त्यांची लेखणी कमलिणीप्रमाणे प्रफुल्लित होते तर असंतांना झोडपून काढतांना कमालीची क्रुद्ध होते. गरजते. आपल्या पूर्ववर्ती संतांनी सातत्याने सांगितलेल्या शिव्यांची लाखोली तर ते वहातातच पण त्यात पराकोटीची तिक्तता ही येते. क्वचित अभद्रजनांसाठी अभद्र शब्द ही येतात. ती लेखणी मग नागिणीसारखी फुत्कारते. तिला खडगाची शक्ती लाभते. दैन्य असो की अमंगल असो, कुथाव असो की परदु:खशीतलता असो, ढोंग असो किंवा सज्जननिंदा असो - या तमाम गोष्टींवर महाराजांच्या लेखणीचा आसूड बरसत रहातो. गरजत रहातो. झोडपून काढतो. तर्काने फटके लगावतो. कर्कक्ष्य होतो. -

* साधूसंत ऐसा पाहे जैसा वेडा पिसा राहे ।
ज्याला करिता नमन त्याला वाटेचि मरण ।

(बालकांड अभंग ५६)

पुढे जाऊन ते म्हणतात-

* जप तप सर्व जाणावे गा भ्रम जंव आत्माराम मनी नाही.
जिवाचे जीवन भक्तांचे चिंतन तेथे नाही मन तरी ते व्यर्थ ।

(बालकांड अभंग ८०)

संत लक्ष्मण सांगतांना संतश्रेष्ठ तुकोबारायांप्रमाणे महाराज म्हणतात. (कंसातील आकडे अभंगांचे क्रमांक सुचित करतात. सारे संदर्भ बालकांडातील आहेत)

* नको करू त्याग कोणत्या कर्माचा
फक्त वासनांचा त्याग करा । (१४१)

* ज्याचे विरले भाव तेथे अखंडित देव । (१५९)
* नको बहुतांचे मन खरा हेत विठ्ठली । (१९५)
* जेथे दया क्षमा शांती तोचि भगवंताची मूर्ती । (२००)

शंकर महाराज नेहमीच संत तुकाराम व नामदेवरायांचे अभंग गात असत. त्यांच्या लेखनावर तुकोबांच्या लेखणीचा प्रत्ययकारी प्रभाव अभंगाअभंगांतून ठळक-पणे वाचता येतो. महाराज अनेकदा संतापून क्रुद्ध होतात. असंतांची संभावना करतांना म्हणूनच महाराज लिहितात–

* संत असोनिया उच्चनीच भेद घेई मादर x x सोंग वाया ।
काय करावा तो ऐसा सोंगी ढोंगी नाही ज्याचे अंगी एकात्मता ।
शंकर म्हणे तोचि संत नव्हे लुच्चा वरी वरी सच्चा गाठवीचा ॥
(बालकांड – अभंग २४७)

याच सदर्भात २७६ वा अभंग बघण्यायोग्य आहे. या क्रुद्धपणात जेव्हा स्वत: महाराजांचा कटु स्वानुभव मिसळतो तेव्हा तर त्यांचे शब्द तळपते आगीचे लोळ बनून जातात. ते ठणकावून बजावतात–

* संत जरी घरा येती तयांची विचारिती जाती ।
लोक लज्जेस्तव नमस्कारिती संत जाणती वर्गं ते ॥
(बालकांड – अभंग २३३)

महाराजांनी भावभक्तीचा आग्रह धरलेला आहे. प्रपंच
या ४२'१ अभंगामधून महाराजांनी भावभक्तीचा आग्रह धरलेला आहे हे प्रतिपादन
सांभाळून स्व-स्वरुपाची नेमकी ओळख करुन घेणे आवश्यक आहे हे प्रतिपादन
करुन माणसाच्या आयुष्याचे नेमके लक्ष्य, कर्तव्य व अंतिम ध्येय या अभंगांमधून
रेखांकित केलेले आहे. गृहस्थ धर्माच्या आनंद यात्रेचा उल्लेख महाराज अनेक
अभंगांमधून करतात, पण भोगवंतांना, कामासक्तांना पशूहून नीच मानतात.
त्यांच्यापेक्षा श्वान बरे असे म्हणतात. स्वहित साधन हे माणसाच्या आयुष्याचे खरे
इंगित आहे असे परखडपणे सांगतात. या अभंगांमध्ये संत महिमा, असंत- निखंदन,
शुद्ध भगवद् भक्ति, आचार धर्मावर नैष्ठिक जोर, गीतेचे तत्वज्ञान, ज्ञानयोग,
कर्मयोग, भक्तियोग, मनाची स्थिती, मातृ–पितृ सेवा, देवभक्त संबंध, प्रभुगुण स्तवन
पतिव्रता स्त्री–लक्षण, देहाची नश्वरता, आत्म्याचे अमरत्व आदि नानाविध विषयांची
चर्चा सविस्तर येते.

बालकांडाचा आरंभिक भाग आणखी एका दृष्टीने महत्वाचा आहे - तो भाग
म्हणजे अंत:साक्ष्य ! अंत:साक्ष्य दृष्टचा विचार करु जाता या ग्रंथात अनुपम अशी
सामग्री आढळते. महाराजांच्या जीवनाचे संदर्भ बालकांडातील पुढील अभंगांमधून
ठळकपणे वाचता येतात. अभंग क्रमांक १००, १०४, १०५, २२३, २६७, ३१४,
३३१ ते ३३४, ३४९, ३५०; ३५१, ३८१, ३८९, ४०३, ४०६ व ४०६ व ४१५.

आपल्या जन्माचे रहस्य महाराजांनी एकूण ३ अभंगांमधून विस्तारपूर्वक मांडलय. ४०३ व्या अभंगात ते म्हणतात- की हे विठाबाई ! मला तुजवाचून करमत नाही. तू जेव्हा जेव्हा अवतार घेशील तेव्हा तेव्हा मीं तुझा किंकर तुजसोबत असेन. तुझ्या कायात माझा उपयोग करुन घे रे दयाळा !! आपण एकमेका साह्य करुन हा भू-भार हरु या ! तुम्ही युगेयुगे जन्म घ्या, हा शंकर तुमच्या सोबत आहेच. आपल्या जन्म परम्परेची हकीकत महाराज पुढील अभंगात मांडतात-

* तुजसाठी जन्म हाचि अकरावा घेवोनिया देवा आलो दूही ।
येथोनिया पुढे चौदा गर्भवास भोगीन मी खास तुजसाठी ।
सर्वपरी दास तुझाचि होईन पडोनी राहीन चरणी तुझ्या ।
अमरपणाचा करोनी बा त्याग आलो तुझा संग करावया ।
शंकर म्हणे एक जन्म तुजवीण घेता नयें जाण मज देवा ।

(बालकांड - अभंग ३४९)

आपल्या साक्षात्काराचा अनुभव महाराज पुढील काव्यपंक्तीत उत्कटतेने सांगतात —

* वीस दिवसामाजी साक्षात्कार झाला दत्तरुपे आला भेटावया ।
विसाव्या दिवशी घडीं साडेतीन निरोधिले मन म्हणोनिया ।
शंकर म्हणे व्हाया ईश्वराची प्राप्ती आता तुम्हा युक्ती सांगितली ।

(बालकांड – अभंग ३८१)

शंकर महाराज रामकथेला आरंभ ४२५ व्या अभंगापासून करतात. खऱ्या अर्थाने रामायणाला सुरुवात होते ती इथून !! गणपती वंदना करतांना नारदाच्या सल्ल्याने पृथ्वीवर रामनाम लिहून गणपतीने त्याभोवती प्रदक्षिणा घातली व प्रदक्षिणेचे पुण्य मिळविले असा कथाभाग सांगून रामनाम महात्म्यामुळे गणपती वंदनाचे पहिले मानकरी ठरतात असे आपले मत मांडले आहे. रामनाम हे विष्णुसहस्रनामापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे ठासून सांगितलेले आहे. रामनामाचे महात्म्य वर्णितांना महाराजांनी एका समर्थ रुपकाची मांडणी करतांना म्हटलय की–

* बाहेर भीतरी प्रकाश पडावा लावोनिया ठेवा दीप द्वारी
तेलवानी याचा दीप नच राहे विझोनिया जाये वायुस्पर्शे
मणिदीप जरी ठेविलिया द्वारी बाहेर भीतरी प्रकाशाचे
ऐशापरी चाड जयाचिये मनी शहाणा तो धनी निवडेल
रामनामरुपी मणिदीप भारी जिव्हा खोली द्वारी ठेवील तो
शंकर म्हणे आत बाहेरी प्रकाश अंधकार नाश होय तेथे ।

(बालकांड - अभंग ४३१)

महाराजांच्या या अभंगावर गोस्वामी तुळसीदासांच्या पुढील दोहयाचा विलक्षण

प्रभाव आहे. आणि अशी अनेक साम्यस्थळ निवडून दाखविता येतील-

* रामनाम मनिदीप धरु जीव्ह देहरी द्वार ।
तुळसी भीतर बाहेर हु जौं चाहसि उजियार ॥
(रामचरितमानस - बालकांड - दोहा क्रमांक २१)

रामकथा आई आहे, माऊली आहे, माय आहे. तीच बापमाय !! कलिरुपी सर्पासाठी ती भरणी आहे. ती कामधेनु - कामगाय आहे. रामकथेमुळे यमदूतांच्या मुखांना शाई फासली जाईल. रामकथा दुःखमुक्तीचे अमोघ साधन आहे. क्षीरसागरी शयन करणारा भगवान विष्णू रामकथेमुळे भक्तांच्या मनमंदिरात – हृदयात शयन करतो. रामकथा अमृताची सरिता आहे. रामकथा मंदाकिनी आहे. रामनाम विवेक राजाचा मंत्री आहे. तो प्रेमयुक्त मनाने न्याय नीतीचे धडे देतो. तो लोभरुपी सागरासाठी अगस्तिरुप घेतो. कलियुगातील पापांच्या कळपांसाठी- काम - क्रोधाच्या हनींसाठी रामप्रभु प्रतापवान केसरी – सिंह आहेत दारिद्र्यरुपी दावानळात राम केवळ कृपाळू मेघ आहेत. विषय सर्वविषासाठी रामनाम गारुडमंत्र आहे. मोहांधकार घालविणारा तेजस्वी भास्कर आहे हा राम ! राम कल्पतरु, भक्ताच्या जनमानसात राम परमहंस. कुमार्ग, कलह, कपट, वितंडा, अनीती, पाखंड यास जाळण्यासाठी एकमात्र सुगम साधन आहे रामनाम. रामनाम चंद्रकिरणे आहेत.

रामकथा ऐकण्यासाठी साक्षात् जगदंबा भवानी शिवाला वंदन करते व तीच कथा महाराज अभंग रुपाने लिहितात. रामाचे गुण अनंत व कथा ही अनंत. तुलसी-दासांप्रमाणेच महाराजांनी या कथेला रामचरितमानस नांव दिले. अभंग रामायणातही रामचरितमानस प्रमाणेच चार वक्ता व चार श्रोता आहेत.

बालकांडात रामजन्मोत्सवाचा उत्सव शिव पार्वती विवाह वर्णन रामगुणवर्णना-तर्गत बालरुप अर्चना अत्यंत मनोहारी रुपात स्पष्ट केली आहे. एकूण १५०८ अभं-गात रचलेला बालकांड तुलसीरामायणाप्रमाणेच राम-जानकी-विवाह कथा सांगून विराम पावते.

बालकांड नव्या कथांच्या दृष्टीने आश्चर्यकारक परिवर्तीत कांड आहे. रामजन्मा-प्रमाणेच रावणाच्या जन्माची पारंपारिक नोंद करतांना महाराज अशी कथा सांगतात- हरिचे द्वारपाल जय-विजय होते. विप्रशापाने ते हिरण्यकश्यप व हिरण्याक्ष बनले. तेच पुढे रावण–कुंभकर्ण बनले. वृन्दा जालंदर किंवा जालंदर कथेतील जालंदरच पुढे रावण बनला. तुलसी रामायणात येणारा भानुप्रताप पुढे रावण, त्याचा धाकटा बंधू अरिमर्दन कुंभकर्ण व त्याचा धर्मरुची नावाचा मंत्री विभीषण बनला.

उन्मत्त रावणाने ऋषि- मुनींकडूनही दंड–कर मागायला मागे-पुढे बघितले नाही. ऋषिंनी आपल्या रक्ताचा घट भरुन देत असे सांगितले की हा घट उघडल्या-बरोबर रावणाचा विध्वंस होईल. रावणाच्या आज्ञेने त्याचे दूत तो घट उत्तरेकडे

जनकपुरीत पुरुन येतात. यातूनच पुढे सीता जन्मते.

दशरथ राजा जवळही ह्याने दंड–कर मागितला. दशरथाने आपल्या राज्यांत येऊन कर मागण्यास सांगितले. रावण तिथे गेला पण प्रयत्न पूर्वकही तो राजा दशरथाचे दार काही उघडू शकला नाही. या घटनेमुळे रावण संतापला व तपासाठी निघून गेला. रावणाच्या तपाने ब्रम्हदेव प्रसन्न झाले. प्रसन्न झालेल्या ब्रम्हदेवाकडून 'दशरथाला पुत्र देऊ नकोस!' हे वरदान त्याने मागितले. (दशरथालागि पुत्र नच व्हावा । हाचि वर द्यावा मजलागी. बालकांड ९८६)

रावणाने कौसल्येचेही हरण करून तिला लंकेत आणली. समुद्रात एका मत्स्याला सोपवून तो घरी परत आला. ब्रम्हदेवाने रावणाचा वेष घेऊन मत्स्याकडून कौसल्या सोडविली. तिला पेटीत ठेऊन कौशल्यापुरात ती पेटी टेऊन दिली. योगायोगाने त्या मार्गाने दशरथाचा मंत्री सुमंत गमन करीत होता. पेटीत रडणाऱ्या मुलीचा आवाज ऐकूण तो दचकला. मुलीला तिच्या वडिलांकडे सुखरुप पोहोचविले राजाला आपला परिचय करून दिला तेव्हा राजाने आपली कन्या कौसल्या सुमंताच्या राजाला दशरथाला – देऊन टाकली.

या कथा रामचरित मानसात येत नांहीत. या नवाव्या कथा शंकर महाराज तन्मयतेने नोंदवतात.

अयोध्याकांडाचा आरंभ तुलसीदांसाप्रमाणेच महाराज करतात. अयोध्याकांडात कथेच्या दृष्टीने एक वेगळा विशेष जाणवतो तो असा की निशादराज गुह शंकर महाराजांच्या कथेत लंकाकांडाच्या अखेरीस येतो. तो अयोध्याकांडात कुठेच न आल्यामुळे तुलसी–रामायणाच्या संदर्भात व अभंग रामायणाच्या तपशिलात फरक पडतो. रामचरितमानसच्या कथेत सुमंत मंत्र्याला अयोध्येपर्यंत पोहोचवायला गुह जातो प्रभु रामाला भेटायला निघालेल्या भरताला गुह थांबवितो. युद्धाचे आव्हान देतो. अभंग रामायणात गुह भेटतच नाही, तेव्हा या कथांचो वर्णने नसणेच स्वाभाविक आहे. तुलसीरामायणात येणारा तेजःपूंज तेजस्वी भाग अभंग रामायणात येतो. काही विद्वान हा भाग प्रक्षिप्त मानतात, या संदर्भातील एक मत असे–

' इस तापसके प्रसंगको कुछ टीकाकार क्षेपक मानते है और कुछ लोगोंके देखनेमे यह अप्रासंगीक और उपरसे जोडा हुआ सा जान भी पडता है। परंतु यह सभी प्राचीन प्रतियोंमे है । गुसाईजी अलौकिक अनुभवी पुरुष थे। पता नही, इस प्रसंगके रखनेमें क्या रहस्य है ? परतु यह क्षेपक तो नही है । इस तापसको जब कवि 'अलखित गती' कहते है, तब निश्चयपूर्वक कौन क्या कह सकता है ? हमारी समझसे ये तापस या तो श्री हनुमानजी थे अथवा ध्यानस्थ तुलसीदासजी ! "

(रामचरितमानस टीकाकार हनुमानप्रसाद पोद्दार

बालकांड, पृष्ठ ४२१, ४२२

संवत् २०३१/ अठारहवाँ संस्करण

प्रकाशक– गीताप्रेस, गोरखपूर, उत्तरप्रदेश

अयोध्याकांडाची समाप्ती तुलसीदास आणि शंकर महाराज एकाच ठिकाणी करतात. भरत-भक्ती महात्म वर्णनाच्या बिंदूपाशी कथा थांबते.

अरण्यकांडात शबरीची महत्वपूर्ण कथा येते. तुळसीदासांची शबरी आपली संपूर्ण कथा प्रेमपूर्वक प्रभु रामाला ऐकवते. रामाच्या मुखाचे दर्शन करून अंतःकरणात प्रभुचे समचरण दृढ धरते आणि योगाग्निने देह त्यागून देते. तिथून मग ती दुर्लभ अशा हरिपदात सामावून जाते. तिथून परतणं होतच नसते मुळी! शंकर महाराजांची शबरी आपली कथा सांगत नाही तर अशी इच्छा प्रदर्शित करते की प्रभुने तिच्या उदरी बाळरुपाने जन्मावे. रामाने "आपण कलियुगात तुझ्या उदरी जन्म घेऊ !" अशी ग्वाही दिली. ते शुभ्ररुप असेल अशी खूण सांगितली. (ही स्वतः महाराजांच्याच जन्माची कथा आहे ) मग शबरीला आपल्या धामी निवास करण्याची विनती केली. सीतेचा शोध घेण्याचे काम सुरूच होते. शबरीने प्रभु रामचद्राला पंपा नामक सरोवरी जाण्यास सांगितले तिथे सुग्रीवाशी मैत्री होईल व तोच आपणास पुढील समाचार सांगील असा कार्यभाव सांगितला. पुन्हा पुन्हा रामरायाचे चरण वंदून योगाग्निने शरीराचा शबरीने त्याग केला व निजधामी सुखा-समाधानाने पोहोचली.

किष्किंधाकांडात कथा – प्रसंगांच्या दृष्टीने नाविन्य किंवा मतांतराचा भाग नाही. सुंदरकांडात मात्र असे एक स्थळ आहे. रामचरित मानसच्या सुंदरकांडात येणारी हनुमानाची कथा अशी आहे- रावणाच्या दरबारात हनुमंताचं बुद्धि– वैभव बघून रावण दिपून जातो. हनुमंताचं वक्रोक्तिपूर्ण वक्तव्य ऐकून क्रुद्ध झालेला लंकापती हनुमंतांचे प्राण घेण्याची आज्ञा आपल्या दूतांना करतो. राक्षसगण हनुमंताला मारायला धावतात तोच बिभीषण दरबारात येऊन मध्यस्ती करतो. 'दूताचा वध करणे' हा राजनितीच्या दृष्टीने गुन्हा आहे अशी तो शिष्टाई करतो रावण शिष्टाई मान्य करतो. माकडाची ममता आपल्या शेपटीवर असते असा विचार करून 'शेपटीला तेल-चिंध्यांनी गुंडाळून पेटवून द्या' असा आदेश रावण देतो.

अभंग रामायणात हा प्रसंग अधिक नाटयमय रित्या चित्रित केला गेला आहे. हनुमंताची बुद्धिगम्य वाणी ऐकूण रावण चिडला व असूरांना आज्ञा केली आज्ञांकित असूर मारायला धावले तोच चमत्कार घडला व असूरांची शस्त्रे खंडित होऊन बुमरँग प्रमाणे त्यांच्यावरच उलटली. तेव्हा कपटी रावणाने हनुमंताला त्याचे (मर्मस्थळ) मृत्युस्थान विचारले. धूर्त रावणाला धूर्तपणेच उत्तर देत हनुमंताने 'माझे मरण माझ्या शेपटीत आहे' असे सांगितले. त्यावर रावणाने शेपटीला आग लावून दिली. शेपूट नीट पेटले नाही म्हणून असूरांसोबत रावणही फुंकर मारायला लागतो या प्रयत्नात त्याची दाढी जळून जाते. इथे ही कथा संपते.

कथेच्या नाविन्याच्या दृष्टीने लंकाकांड महत्त्वपूर्ण आहे. लक्ष्मणाला मूर्च्छा आली असता रावणाच्या आज्ञेने सीतामाईला विमानात बसवून युद्धभूमिवर नेले जाते. उद्देश असा की ते दृश्य बघून तरी सीता रावणाला वश होईल. पण त्याचवेळी सीतेला बिभीषण पत्नी समरा येऊन भेटते व सारी सत्य हकीकत सांगते.

मेघनादाच्या नागपाशात राम-लक्ष्मण दोन्ही धारातीर्थी पडले असतांना सुग्रीव असे म्हणतो की, तुम्ही सारे राम-लक्ष्मणाला सुखरूप घेऊन किष्किंधेत परत जा मी रावण वधून सीतामाईला सोडवून आणतो. सख्या बिभीषणाला राज्यपद देऊन मी बंदिवान देवतांना मुक्त करतो तोच 'आता रघुनाथ उठेल !' अशी आकाशवाणी होते. चापपाणी रघुनंदन उठतात व सुग्रीवाला आपला दळभार घेऊन किष्किंधेला जायचे सांगतात अर्थातच सुग्रीव ते ऐकत नाही. तेव्हा रामप्रभु कृपादृष्टीने गरूड निर्मितात व सर्पाचा संहार होऊन ते नागपाशातून मुक्त होतात.

लक्ष्मण एकदा रावणाच्या बाणानेही मूर्च्छित होतो. लगेच सावध होऊन रावणाच्या छातीत बाण मारतो.

मेघनाद लक्ष्मणावर शक्ती सोडतो. हनुमंत ती शक्ती वरचेवर झेलतो तेव्हा ती शक्ती स्त्री-रूप घेऊन हनुमंताला बजावून सांगते की, मी नग्न स्त्री आहे. तू स्वतःला रामदास म्हणवतोस तेव्हा माझी वाट अडवू नकोस. मी युद्धात लक्ष्मणाला वरीन.

द्रोणागिरीवर हनुमंत जाऊन रामरायाचे काम सांगून औषध मागतो. द्रोण तुच्छतेने हनुमंताला धिक्कारतो मग संतापून हनुमंत सबंध पर्वतच उचलतो. हा मनोरम संवाद शंकर महाराजांनी अधिक सार्थक शब्दातून मांडलाय.

मेघनादाचा वध झाला त्याचे शिर प्रभु रामाजवळ आले. त्यांनी ते सुरक्षित ठेवायला सांगितले. इकडे मेघनादाचा हात सुलोचनेच्या ( मेघनादाची पत्नी ) अंगणात जाऊन पडला. तिने एकच आंकात मांडला. 'तुमचा वध कुणी केला ते लिहून द्या !' अशी विनंती भुजेलाच केली. भुजेने लिहून दिलेले पत्र वाचून तिने रावणाला सारी हकीकत सांगितली. रावण क्रुद्ध झाला. मंदोदरीने स्वतः सुलोचनेनेच जाऊन स्वपति- शिरकमळ आणावे अशी सुचना मांडली. सुलोचना त्याप्रमाणे निघून रामाप्रत पोहोचली. सुलोचनेने पतिमुख मिळविले. आपल्याला ही वार्ता पतिभूजेने लिहिलेल्या पत्राद्वारे समजली हे तिचे म्हणणे मात्र वानर सैन्याने कबूल करून घेतले नाही 'हे मृत शिर जर हसऊन दाखविले तरच आम्ही सती सुलोचनेचे कथन सत्य मानू !' हे वानर सेनेचे कथन आव्हान सुलोचनेने स्वीकारले. अनेक प्रयत्नांती शिर हसले नाही, तेव्हा सुलोचना असे म्हणाली की माझा पिता जर युद्धभूमित असता तर मला वैधव्य प्राप्त झाले नसते. हे ऐकून मात्र शिर हसू लागले कारण तिच्या पित्याने शेषाने – लक्ष्मणानेच मेघनादाचा वध केला होता.

पाताळात वसणाऱ्या अहिरावण-महिरावण या राक्षस भावंडांची कथा विस्ता-

रपूर्वक अभंग रामायणात येते.यात अहिरावण–महिरावण जन्मकथा, तपाची हकीकत मकरध्वज प्रसंग, महिरावणाची पत्नी चंद्रसेनेचे रामावर लुब्ध होणे यासारखे कथा प्रसंग अत्यंत विस्तारपूर्वक शंभर अभंगामधून र्चाचिले आहेत.

उत्तरकांडात मात्र कथा दृष्टचा कुठलेही नाविन्य आढळत नाही. ते रामचरित मानसाधारेच चालते.

लंकाकांडांतील युद्धवर्णनात शंकर महाराजांनी प्रसंग जरी तुलसीरामायणातीलच घेतले असले तरी अनेक नवनवे संदर्भ व घटनांच्या क्रमात फेरबदल केले आहेत. नव्या पद्धतीने युद्धवर्णने रंगविली आहेत.

प्रस्तुत पोथी विना आखलेल्या वहीवर लिहिलेली आहे. मूळ पोथीवरून लिप्यं-तर करून घेतांना काही शब्द चुकीचे लिहिले गेले आहेत. त्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. (कंसातील आकडे अभंग क्रमांकाचे आहेत.)

* माझा क्रोध अति घोर तो कृज्ञान । (बालकांड १२९६)
'कृज्ञान' ऐवजी 'कृशान' शब्द हवा कृशान म्हणजे अग्नि

* सकळ सुपारी कर्दळी रसाळ । (बालकांड १४६५)
'सकळ' ऐवजी 'सफळ' शब्द हवा

* गेली मूर्च्छा भूप म्हणे रामराम । आला आहे राम सांगे मैत्री (अयोध्या ११०)
'मैत्री' ऐवजी 'मंत्री' शब्द हवा

* देखोनिया गेगा खाली उतरला । (अयोध्या २१८)
'गेगा' ऐवजी 'गंगा' शब्द हवा

* कल्पवृक्ष झाड सिंधु जळ सारे । (अयोध्या २८१)
'सारे' ऐवजी 'खारे' शब्द हवा.

* राम दर्शनाच्या वशे नरावला । (अयोध्या ४३६)
'नरावला' ऐवजी 'नराबला' शब्द हवा. नराबला म्हणजे नर + अबला म्हणजे स्त्री–पुरुष.

* शंकर म्हणे दिसेंदिन । कृश होय ते दारुण । (अयोध्या ४५३)
'दिसेंदिन' ऐवजी 'दिसेंदिस' शब्द हवा

* स्वप्न हे वाईट सौमित्रा येऊनी । कुषातमी कोणी ऐकवील. (अयोध्या ५२२)
'कुषातमी' ऐवजी 'कुबातमी' शब्द हवा. कुबातमी म्हणजे कुसमाचार वाईट बातमी.

* सर्वज्ञ तू प्रभो सकळ जाणसी । देई वचनासी वित्त आता । (अयोध्या ५२६)
'वित्त' ऐवजी 'चित्त' शब्द हवा.

* शंकर म्हणे गाळ तळी अल्व जळी । (अयोध्या ५९१)
'अल्व' ऐवजो 'अल्प' शब्द हवा.

* गुरुचिया चरण कमळी नसून । (अयोध्या ५९४)
'नसून' ऐवजी 'नमून' शब्द हवा
* वाकुडी झाला का ब्रम्हा वृद्धि । (अयोध्या ६७३)
'वृद्धि' ऐवजी 'बुद्धि' शब्द हवा
* देव नाग नर राम वाहु जोरे । (अयोध्या ६८४)
'वाहु' ऐवजी 'बाहु' शब्द हवा.
* सर्वासम आला बनी देवा । (अयोध्या ७७७)
'सर्वासम' ऐवजी 'सर्वासह' शब्द हवा.
* स्पटिक शिळेवरी बैसुनि सादरे । (अरण्यकांड ५)
'स्पटिक' ऐवजी 'स्फटिक' शब्द हवा
* 'बह्ा' वश झाला म्हणे सीतामन । (सुंदरकांड ४१)
बह्ा ऐवजी ब्रम्हा शब्द हवा
* मय जे तैं ऐसे फार शिकविले । (लंकाकांड २२७)
'मय जे' ऐवजी 'मयने' शब्द हवा. मयजा म्हणजे मय राजाची कन्या मंदोदरी.
* रुई फळे मारग जा जैसा । (लंकाकांड, २६२)
'मारग जा' ऐवजी 'मार गजा' शब्द हवा. म्हणजे रुई फळांचा मार हत्तीला लागेल त्याप्रमाणे असा अर्थ होतो.
* गणीन गर्विष्ट स्वबळ तैं । (लंकाकांड ५५१)
'गणीन' ऐवजी 'गणी न' शब्द हवा. गणी न म्हणजे मोजत नाही., जुमानत नाही असा अर्थ.

पोथीतल्या काही शब्दांचे अर्थ सांगणे आवश्यक आहे.

* शत आणा । (अयोध्याकांड १५३)
शत आणा म्हणजे शंभर शपथा.
* काल वनी - काल्यांच्या शेतात (अयोध्याकांड १५७)
* पुले वर्षं – फुलांचा वर्षाव झाला. (अयोध्याकांड ३२१)
* माजा – पहिल्या पावसाळ्याचे पाणी, यात मासे मरतात. (अयोध्याकांड ३५६)
* इतिनेत्र - इतिचे भय – अधिक वर्षा होणे, वर्षा अजिबात न होणे, उंदरांचा उत्पात, टोळधाडी पोपट वा अन्य पक्ष्यांचे आक्रमण- शेती कामात अडसर बनणाऱ्या या सहा उपद्रवांना 'इति' असे संबोधिले जाते. (अयोध्याकांड ५४६)
* तृण तांते - तलाव वा सरोवरात उगवणाऱ्या एका विशिष्ठ प्रकारच्या गवताला हिंदीत मांडर म्हणतात. यापासून बनविलेले वाद्य कसे सु-राग आलापील? (अयोध्याकांड ५५९)
* नदीधनी – नद्यांचा स्वामी - समुद्र (अयोध्याकांड ६५६)

* तमारी – तम+अरी - अंधाराचा शत्रू सूर्य (अयोध्याकांड ६६२)
* धन - धन्य, कृतार्थ (अयोध्या ६८८)
* अफल – बिना टोकाचा बाण. (अरण्यकांड १२१)
* दुंदुभी अस्थि - दुंदभिनामक राक्षसाच्या अस्थि. (किष्किधा, २४)
* कुळोळी – कंदरा (किष्किधा ७३)
* नदीपती – समुद्र (सुंदरकाड २०)
* दर्शनी– सुरवात (सुंदरकाड २६)
* बिचारी – बिचारी (जीभ) (सुंदर कांड – २६)
* पाले – पाने, पत्र (सुंदरकाड ४२ )
* भ्यारी – भेरी, रणवाद्य (लंकाकांड १५२)
* प्रहस्त – रावणाच्या प्रधानाचे नाव (लंकाकांड २०८)
* मानली – इंद्राचा सारथी (लंकाकांड ६४०)
* पक्षीपती – गरुड पक्षांचा राजा (लंकाकांड ६५८)

काव्याच्या दृष्टीने विचार करता रुपक, उपमा उत्प्रेक्षादि अलंकारांची लयलूट या महाकाव्यात आढळते. काही सुभाषिते उद्धृत करण्याचा मोह होतोच !

* शंकर म्हणे जेसा हेत । तथा राम तैसा होत । (बालकांड ५३५)
* समजोनी जे का मूढ न बोलती । सुधा तयाप्रती विष होय ।(बालकांड १०९०)
* शंकर म्हणे नारि प्राणप्रिय जया । मुकला तो कार्यां स्वहिताच्या ॥ (अयोध्या ६७)
* शंकर म्हणे आले देवाजीच्या मना । कोणाचे चालेना तेथे काही । (अयोध्या ४६३)

अभंग रामायण अशा प्रकारे महाकाव्याच्या वृहदाकारात समादृत झालेले काव्य आहे. लंकाकांडात स्तुती स्तोत्रांची मुक्त उधळण आहे. सुलोचनेनें केलेली रांमप्रभुची स्तुती अतिशय अर्थवाही, उत्कट व सर्वांग सुंदर अशीच आहे. (३५० ते ३६०), याच कांडात ब्रह्मदेवकृत रामस्तुती (६४३–६४८). इंद्रकृत रामस्तुती (६५२–६५६), कवि श्री शंकर महाराजकृत रामस्तुती (६६१ ६६२) या मुळातूनच वाचनीय आहेत.

गोस्वामी तुलसीदासांच्या रामचरितमानसाचे इतके ठळक प्रभावबिंदू बालकांडात आढळतात की अनेक टिकाणी अवधी दोहा–चौपाईचा तो मनोज्ञ मराठी आविष्कार वाटतो. तसे पाहिले तर संतांची प्रभावशक्ती व्यापक अन् तलस्पर्शी असते. सत्याचा साक्षात्कार, प्रभूचा साक्षात्कार, एकाच भावोर्मीतून होत असल्यामुळे स्थानाचे व काळाचे कमालीचे अन्तर असूनही दोन भक्त कवींमध्ये आश्चर्यकारक साम्य आढळते. तुकाराम आणि कबीर काय किंवा रामदास आणि तुलसीदास काय यांची कविता या बिंदूवर अनेकशः तपासून बघण्यायोग्य आहे. काही ठिकाणी महाराजांनी तुलसीकथेचा विस्तार नोंदवलाय तर काही ठिकाणी धावता आढावा घेतला आहे

रामकथेचे आकर्षण भारतीय मनाला आहेच. शंकर महाराजांच्या बाबतीत एक अतिशय कोवळा संदर्भ या निमित्ताने व्यक्तवावासा वाटतो. रामजन्मातील आपल्या अवतार कार्यात शबरीला- 'तुझ्या पोटी कलियुगात जन्म घेईन!' हे दिलेले आश्वासन महाराजांनी पूर्ण केले आणि रामकथेची भक्तीयुक्त अंजलि प्रभुचरणी समर्पित केली. या कथेच्या निमित्ताने अनेक प्रश्नांची चर्चा ते करतात. रामकथेत अधिक नाटयमयता नोंदवतात, कमालीची संवादधन आशयाभिव्यक्ति सांगतात. शुद्ध आचार धर्माची जपणूक करतात व रामनाम समस्त आजारावरचे एकमात्र औषध म्हणून सांगतात.

अप्रतिहत प्रज्ञा, मर्मज्ञ रसविचार, कथा वाचकाची अप्रतिम शैली व प्रासादिक लय यामुळे हे रामायण मराठी सारस्वत दरबारातील एक अक्षय लेणं ठरावं अशीच याची योग्यता आहे. महाराजांच्या यापूर्वीच तीन रचना क्रमशः १) महाराजांचे गद्य- आत्मवृत्त २) हरिपाठाचे अभंग ३) शुद्धात्मज्ञानबोध- ग्रंथ प्रसिद्धी पावले आहेत. आकाराने, विषयाने व अर्थाने बृहतकाय असा हा काव्यग्रंथ महाकाव्याच्या तमाम कसोटयांना पुरुन उरतो. सप्तकांडात चालणारी ही रामकथा एकूण चार हजार अभंगात समादृत आहे.

---

प्रा. डॉ. विश्वास पाटील
सरस्वती को-ऑ. हा. सोसायटी
शहादा

# Feudal Elements In Maratha Polity

**Prof. K. N. Chitnis**
University of Poona

The rise of the feudal society marked a definite stage in the development of productive forces and production relations. The feudal society was generally preceded by a slave society and followed by a capitalist society. In each of these stages in the evolution of the society there was a different mode of production. The mode of production was constituted by (i) the productive forces comprising the instruments of labour and the people skilled in the use of these instruments, and (ii) the production relations, which were essentially economic relations between men engaged in material production, which were affected by the distribution of output.

In the feudal society the productive forces were more developed than in the slave society. The men skilled in the use of the instruments of labour were not slaves, as in the previous stage, but serfs, whose services were enslaved, but whose lives were free. The serf was a free man bound to the soil. In feudalism the relations of production were essentially based on land. The feudal society was characterised by private relations between men and lords, and even the land, on which the (private) contract between them was based, was considered to be the private property of the landlord, be he a king or a noble or a chieftain. The law that governed the relations between them was private law.

There were essentially two aspects of feudalism, political and economic. In political feudalism the administration of the state was run by the landholders or by the officials whose services were

remunerated by grants of lands. The relations between the higher & lower officers were regulated by grants of lands. In economic feudalism, the state or the ruler got the bulk of the revenue from lands Again each one of the landlords got revenue from his men in return for the landlords. Thus in both these aspects there was a contract between the landlords (ruler, higher, officer, etc) and the men (lower officials) based on grants of land.

Kosambi speaks of two other types of feudalism, viz., feudalism from above and feudalism from below. The relations between the king and his immediate big officers such as governers of provinces, or chieftains of principalities, are covered by the first type where as the emergence of a class of revenue officials at the lower levels, who actually collected the taxes from the people and appropriated the surplus produce, could constitute the second. The headmen of villages, village accountants, Deshmukhs & Deshpandes were included in such a class. The gradual expansion of such a class either supplanted the upper feudal aristocracy or was organically linked with it, thus completing the growth of a fairly developed feudal structure.

The feudal economy was localised and the feudal administration decentralised. The instruments of labour were at a low level. The technology was not much advanced As the division of labour was not developed, the industrial skill of the artisans was was also in its infancy. In such a situation the lack of mears of communication and the relatively small number of towns and cities became its feudal concomitants. Hence in such a society where the land was the basis of administrative services, of military organisation. of economic and social conditions the production relations also came to be based on the ownership of land as the chief means of production, and on its concomitant, the feudal exploitation of the serfs.

One finds a number of feudal tendencies in the Maratha polity. The economy in medievel Maharashtra was largely based on land,

the money-economy playing a lesser role on the whole. The great barons of the state such as the Shindes, Holkars, Pawars, Rastes, Patwardhans, Nimbalkars. Bhosles, etc. were the fief holders. They owned allegiance to the Chhatrapati. They had regard for their head. In the great days of the Maratha confederacy it was the memory of the great Shivaji and the regard for his descendant that held, among other things, the different membes of the Confederacy together. They were aware that they were eating the 'salt' of the Chhatrapati. They were in a sense doing "homage" to their lord. Receiving the 'robes of authority' by these feudal, lords from their overlord, the Chhatrapati, was a solemn rituai, comparable to the ritual of doing homage. The Chhatrapati was a weak overlord as was usually the case with any feudal king. Each of these Maratha feudal barons had his own administrative officials, his own sources of income, and his own judiciary. we have examples of such Sardars issuing judicial decrees to the litigants. The administration of justice by the feudal lord in his own domain was one of the important features of feudalism.

Maratha source materials enable us to assert that these Sardars received both militatary and civil fiefs. In 1762–63 Malharji Holkar received the pargana of Khargon as a militaty saranjam. (Diaries, IX, 157). He also received in the same year the parganas of Raver, Sawer, Sironj, Vaijapur Galna Tarf Depur, Sarkar Bijyagad, and the villages of Pande and Koregaon as a military saranjam. (Ibid, 158).

Some of the burdens associated with the military fief or the military tenure, also known as the incidents of military tenure are discernible in the Maratha polity. A nazar of 16 lakhs of rupees was required to be paid by Tukoji Holkar (to his overlord) on account of his succession to Malrao Holker (Diaries, IX, 176)

When the Raja of Satara conferred the office of Senasaheb Subha on Ragbuji Bhosale in 1779-80, he did so on condition that the grantee should maintain a good army, administer his area

properly and served the overlord with devotion. (IV, 231). This brings out clearly the feudal nature of the contract.

In 1778-79 the portion of the Gadhemandale Sansthan to the north of the river Rewa was given in military saranjam to Khandoji Bhosle, Sena Bahadur. The conditions attached to the Saranjam were that the grantee should maintain a good army,and should be loyal to the overlord. (IV, 239)

Similarly lands or revenue from the lands were granted to men by way of remuneration of their services as civil officers such as Kamavisdars and mamlatdars.

In January 1755 we have an example of a baron granting part of his jagir (a chief feudal feature) to a subordinate civil officer for remunerating his services. In that year Jayaji Shinde granted by ijara to Balaji Yeshawant Gosavi the mamlat or kamavis of pargane Paran in Prant Bundi for Rs. 2,10,001 for a period of 4 years. (A. B. Phalke, ed., Shindeshahi Itihasachi Sadhane, I, 120) Here the sum of Rs. 2,10,001 was the contribution to be made by the man to his lord. The administrative work of the grantee was mainly the collection of the taxes. the tendency with such men was to avoid the payment of the contribution. This we find in a number of later letters written about the recovery of the contribution.

From a list [ferist] of mahals (including Prants, Parganas, Thanas, forts, etc.) and their officers in Hindusthan dated 1755-56 one can get on idea of the feudalising process going on in the administration of provinces. (SPD, XXI, 78) For example, Govind Ballal was the feudal officer of Prant Bundelkhand, Vithal Shivdev was the office of Pargana, Shahabaj and Gopalrao Ganesh was in charge of Kille Gwalior. These land grants were either hereditary or for short periods. The Saranjam grants were generally hereditary grants while the kamavis grants were for specific periods. We find many kamavisdars being transferred from place to place. This we do not find in the case of Saranjamdars. The Saranjamdars seem to resemble the tenants by knight's service rather than the

kamavisdars. Although we do not have the feudal 'aids' in the Maratha state, we do find presents and contributions offered by the Saranjamdars, Kamavisdars and other Sardars to their overlord on all important occasions. Hence one finds some feudal tendencies in the relations between the Chhatrapati and his immediate great barons. This can be called, as Kosambi has pointed out, feudalism from above.

The saranjam system led to the rise of feudal military tenure comparable to the tenure by kinght's service of medieval Europe, while the kamavis system introduced the feudal economic tenure comparable to the socage tenure of Europe in medieval times. In some cases, as in the grant of some mamlats, both the tenures were mixed up.

The services of the administrative officers were remunerated by the grant of land revenue as well. Such a practice was widespread under the Marathas. This was also apparently a feudal practice.

An example of a saranjamdar or military fief – holder holding his fief on condition of granting a stipulated number of cavalrymen is provided by a sanad of the year 1762-63 granting a saranjam of Rs. 16,85,000 to Vitthal Shivdev Vinchurkar, the chief condition of the contract being that the Saranjamdar should supply a contingent of 5000 good horses. ( Diaries, IX 190) Similarly, a saranjam of Rs. 6,25,000 was granted to Mahipatrao Kavde in 1762-63 for maintaining a contingent of 2500 horses. Mahipatrao had his own independent establishment iucluding such officials as the Khasnis, Phadnis, Sabnis, Parasnis, Daftardar and the like. ( Diaries, IX, 341). This Clearly shows that the big feudal officers were like small independent princes having their own establishments They even administered justice to their men as can be made out from a mahzar issued by Mahadji Shinde, (This mahzar which I found at Srigonda in 1969 has the seat of Mahadji Shinde at the top. more information about this could be found in my book Secio- economic Aspects of Medieval India.) a feudal lord, from

Srigonda, one of his capitals. The administration of justice to their own men by these subordinate officers, was, as noted already. a distinguishing feudal element.

Again the officials serving under these feudal lords were sometimes remunerated for their services by the grants of a portion of land revenue, though not of the lands themselves. Sadashiv Naik Godse, the Potdar of Prant Junnar, for example, was enjoying the right of levying from the ryots oue epercent of their revenue as his perquisite.

While the remuneration of services by grants of lands or land revenue, the administration of his province or jagir by the feudal, lord, the exercise of judicial powers also by the Saranjamdar the maintenance of his own independent establish ment. the grant of land revenue for remunerating the service of his own petty officials, the condition of making a contribution to his overlord and similar other practices introduced feudal elements in this system, the system of controlling these jagirdars either by their occasional transfers, or through some officers employed in the feudal lord's service, but responsible to the overlord, checked the further development of these feudal tendencies, making the system party feudal and partly bureaucratic.

Some of the methods by which the Central Government exercised control over the feudal lords may be noted. The feudal lords ( Saranjamdars ) were required to submit detailed accounts of the revenues to the Government every year, which were evidenty audited by the auditing officers. They had to include in their staff a Muzumdar and a Phaduis who were always appointed Peashwa and responsible to him. The Kamavis was not inherited by them, but was farmed out to them for a fixed term of years.

The production relations in the village communities as between the Mirasdars on the one hand and Uparis and landless labourers on the other, solely determined by the ownership of the means of production or the enjoyment of the proprietary rights in land

exclusively by the Mirasdar class led to the exploitation of the working class. Some of the Uparis who were merely tenants in the early stages of the development of the village communities came to acquire proprietary rights in lands themselves thus becoming petty feudal lords.

The village community as a whole contained a dichotemy in the dual ownership of the means of production by its property-holders, viz., the individual ownership of lands for individual cultivation and the common ownership of waste lands, pasture lands and such other lands for common use.

The Mirasdars, who were genereally the original settlers of the village, were always engaged in self aggrardizement at the cost of others who were either landless labourers or tenants–at-will. The Uparies tilled the lands without owning them. They had the lands as long as they paid the rent to their landlords the mirasdar. Beside such lands for which they got the rent, the Mirasdars had their own lands cultivated by landless labourers. The headman, the village accountant and other important village officials were from among this class of the feudal elite. They exploited the peasants in a number of ways. In addition to receiving the rent from them, they got many kinds of perquisites from them, and also the free labour services [veth begar].

The method of assessing the land revenue on the basis of the number of ploughs or pairs of bullocks (instruments of labour) was yet another feudal practice which did not take into account the fertility of the lands, its proximity or otherwise to the rivers, the source of water supply or the type of foodgrains grown on the lands. This undoubtedly gave importance to the land-holders who had to have some means, like the plough and a pair of bullocks, of cultivation of lands. The poor land holders became victims of money-lenders and finally lost their proprietary rights in lands. Thus the feudal exploitation of the peasants resulted in the concentration of landed property in the feudal elite.

The discontent against the feudal elite was sometimes expressed by landless and harassed peasants migrating to other regions. We have in Maratha history a number of cases of peasants migrating (paraganda) to other areas because of the feudal exploitation.

The village community was economically self-sufficient, and the economy of the village community a closed one. The peasants produced goods for immediate consumpation in the village itself. They also had to give a portion of their produce to the village artisans annually in return for their services rendered to the community as a whole The village artisans known as the barabalute produced goods for meeting the economic needs of the peasants and other members of the village community. For the peasants, the carpenter, the black-smith, the potter and the mason were very important. The barter system was generally widespread in the villages.

In such village communities based on the principles of economic self-sufficiency, barter-system and interdependence of services, there were also elements that gradually broke up this system leading to their final disintegration. There was really speaking on division of labour.Many peasants were also engaged in some handicrafts besides their main occupation of agriculture. The handicrafts were practised as a sideline business, generally in spare time. Spinning, weaving etc. were done in many peasant families. They wery peasant industries. At the same time some of the artisans had their own plots of land, which they got cultivated by landless labourers. Some of the goods produced in the villages were taken to the weekly markets held nearby by the local merchants for sale. These merchants were also, in most cases shopkeepers and money-lenders. These were the fourunners of the bourgeois class. This practice gradually led to the production of commodities for sale. With the increasing production of money commodities, the division of labour in the villages increased with the spread of the division of labour, the property inequalities became more

marked. With the increase in property inequalities the exploitation of the peasants was intensified. All this led to the contradictions on the village community involving an awareness of class separation. The consequences of such deep changes were the gradual separation of agriculture form crafts, of towns from the countryside, the gradual spread of trade and commerce, and the rise of the bourgeoisie(For more details,see A.I.chicherov,India:Economic Development in the 16th-18th centuries: Outline History of crafts & Trade,(2nd ed Moscow, 1971) But the eoexistence of these mutuaily contradictory factors such as agriculture and crafts in the peasant families, the practice of some handicraft and the ownership of a plot of land by some members of the barabalute, the barter systeem and the money economy operating at the same time, the production of some crops for consumption and of some other crops for marketing definitely brought into relief the feudal character of the village community

In the peasant family there was no real division of labour, as both agriculture and industry were mixed up. In the domestic industry the raw materials such as cotton or wood produced by the family itself were processed by its own members. The household industry and agriculture were not two separate independent professions but two parts of one single whole. The next stage may be found in a village having the barabalute system. Here we find deeper division of labour which developed the productive forces. The village artisans were collectively maintained by the village community in such a system. It is significant that the artisans were generally from lower classes and occupied a lesser position in society than the landholders and landlords. Even the village priest had to have some piece of land for gaining some status in society. A landless priest was generally ignored.

The goldsmith who generally fashioned consumer goods gradually assumed greater importace and became an influential representative of the community feudal elite with the changes in his duties in the feudal organisation of the village economic structure

With the increasing exploitation of the peasant through more taxes, more land revenue,etc. the goldsmith began to act as an assayer of the coins when the taxes, revenue etc. were paid in cash, as the money-changer when different kinds of monetary units were in circulation and as the money–lender, when the peasants had no money to pay the revenue to the feudal elite. Naturally the social status of the goldsmith and the silversmith was gradually raised.

In some villages the balutedars were classified into three categories depending upon their usefulness to the village communtiy, The first category included the carpenter, the cobbler, the Mang (rope-maker) and Mahar (wood-cutter). In the second were included the potter, the barber, the washerman and the blacksmith and the third category included the astrologer, the Hindu priest (Gurav), the Muslim priest (Mulana) and the goldsmith. (R. V. Oturkar, ed, Peshwekalina Samajika va arthika Patra-vyavahara, 75 p. 55)

It should be remembered that two forms of handicraft labour in the village community, the form of domestic industry in the peasant household and the form of collective maintenance in kind of the barabalute or the village community artisans characterised the feudal mode of production.

The production of articles to the consumer's orders, the payment to the artisans for his services by such consumers either in kind or in case, and the supply of raw materials either by the consumer himself or by the artisan which he himself owned these features also were feudal in character. (In contrast to this, in the capitalist mode of production, the raw materials ars supplied by the capitalist or merchant, the production is for profit, and the payment to the artisan is in cash).

Another typically feudal practice was groups of artisans in urban or rural areas, but not connected with the village artisans, producing and supplying articles to consumer's orders. ( By contrast these artisans produced and supplied goods on merchant's

orders in a non–feudal system) .

Karl Marx has said in his Capital that peasant agriculture on a small scale and the practice of independent handicrafts together form the basis of the feudal mode of production.

The feudal lords appropriated not only the surplus produce of the peasants, but even a big share of the profit of the traders. This they did by taxing them through the goverment, the instrument of feudal exploitation, by monopolising the trade of certain commodities, and by running some kharkhanas themselves throught the state. The officials of the feudal state exploited the artisans as well, Often the taxes were farmed out to the bidders who were also the lesser feudal lords and the feudal intermediaroes such as the Deshmukhas and Deshpandes The continuance of such an intermediary feudal class for the collection of the taxes and feudal dues from the peasants, artisans and traders can be called, with Kosmbi, feudalism from below.

The insistence on the payment of taxes in cash threw the poor and artisans in to the hands of money–lenders, who were among the village community feudal 'elite

As the feudal class including the Sardeshmukhs, Deshmukhs, Deshpandes, Kamavisdars, Saranjamdars, and the like, appropriated the surplus produce of the lands and also a big share of the trading profit, it became well-to-do and was approached for payments in trade transactions. As the foreign trade in medieval times was generally a favourable one to the Indian merchants, and as the value of exports increased that of the imports, the payment made by the foreign merchants in the form of precious metals again swelled the pockets of these feudal lords. In the towns, which were relatively small in number, the kotwals who also belonged to the feudal class exercised control over the artisans, traders and also, the judicial machinery.

The merchants and bankers joined hands with the feudal class in the feudal exploitation of the bankers helped the Kama–

visdars and the Peshwas by encashing the varats issued by them in the name of the Kamavisdars for their rasads. The Kamavisdars also often asked the bankers to pay the required amounts for securing them the mamlat or the kamavisi of the mahals. Govind Samraj asked the Vaidya bankers Balambhat and Vishwanathabhat to pay Rs. 9, 158 by way of rasad for his mamlat, which was probably under Vithal Shivdev Vinchurkar. The bankers were probably expected to collect the revenue dues of such feudal officers from their jagirs or feudal fiefs and keep the amount with themselves as a deposit or to spend it as instructed, or take it as repayment of the rasad amount. (SVD, II, 68) The financing of feudal wars was also done in many cases by such bankers. We have innumerable examples of the Peshwas and other feudal lords borrowing large sums of money from the bankers such as the Dikshit-Patwardhans and the Vaidyas.

In all these phenomena, the significant fact was that all political and economic power whether in the rural or urban areas, remained firmly in the hands of the feudal class.

In the feudal system, the middleman merchant purchases commodities from the artisans for selling them in a wider market at a profit. In the capitalist system, beginning with the purchase of articles, the middlemen merchant gradually reduced the price of the commodities, makes the artisan produce the commodities according to the demands of the market, supplies raw materials to the artisan, lends him money before-hand, and thus buys in effect the labour power of artisan. Thus the independent artisan of the feudal society becomes a mere wage-earner, legally independent but economically dependent, in a capitalist system. In the Maratha period, however we have the independent artisans having his own raw materials and exercising choice in the production and sale of commodities. although subject to feudal taxation and exactions.

The advancing of money to the artisans by the middleman merchant, however, marked the beginning of the process of trans-

formation of the feudal artisan into a wage-earner, of the transition from feudal relations to capitalist relations.

The feudal economic structure was characterised by the purpose for which the goods were produced and by the non-economic methods or devices employed for extracting work from the labourers. The non-economic devices were based not on the free contract between a merchant or an industrialist and a free wage-earner but on the relations of domination and subordination.

The distinguishing features of the feudal mode of production were 1) compulsory labour, 2) regimentation of the remuneration of labour, 3) the supply of raw materials through monopoly, and not through purchases on the free market, 4) the goods produced for satisfying the state requirements or the feudal elite. In the state and private feudal karkhanas these features were promenently expressed. The state karkhanas were feudal manufactories.

In the private mints licensed by the Government in Maharashtra to mint money, one could find the faint beginnings of the capitalist system, for in these mints, unlike in tha karkhanas the workers were hired by private mint owners, and were not subjected to non-economic feudal coercion. Yet they were bound by the regulations laid down by the feudal Government. Such a phenomenon where feudal coercion is expressed in fixing the wages of the workers, in ordering the production for fulfiling the state or feudal requirments and the employment of free workers seems to have marked the next stage in the development economic forces. Such a mixed feature was found in the construction of forts or buildings, shipyards, salt manufacturies, weaving industries, diamond mining works and the like. In the shipbuilding industry we see the gradual emergence of capitalist relations, for here the contractor employed a large number of free people for the work. In 1766-67 a goldsmith (Lakshman) was licensed by the Goverment to run a mint at Nasik employing in his mint one scribe, two peons and ten workers such as a blacksmith, goldsmiths, hammerers and the like. (Diaries, I, pp 297-98)

This was more of the nature of a capitalist manufactury than of the nature of feudal manufactury. And yet it was not a complete capitalist enterprise.

# प्रतापसिंहाच्या छावणीचा नकाशा

सौ. विजया देशपांडे

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही असलेल्या कागद पत्रांमध्ये साताऱ्याच्या छत्रपतींच्या राजवटी संबंधी काही कागद पत्रे आहेत. त्यापैकी काही पत्रे व आलेख महत्वाचे असून मराठ्यांच्या इतिहासांच्या शेवटच्या कालखंडावर प्रकाश टाकणारे आहेत. १९ व्या शतकांच्या प्रारंभी इंग्रजांनी मराठ्यांच्या सत्तेचा शेवट केला आणि भारतावर वर्चस्व प्रस्थापित केले. १८१८ मध्ये इंग्रजांनी प्रथम दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव करुन त्याचे राज्य खालसा केले. त्यानंतर १८१९ मध्ये साताऱ्याच्या छत्रपतीवर वर्चस्व प्रस्थापित करुन इंग्रजांनी मराठ्यांच्या राज्याची इतश्री केली. या संत्तांत्तरावर प्रकाश टाकणारी काही कागदपत्रे राजवाडे मंडळाच्या संग्रही असून त्यापैकी एक आलेख प्रस्तुत लेखात प्रसिद्ध करावयाचे योजले आहे

राजवाडे मंडळाच्या संग्रही असलेल्या उपरोक्त कागद पत्रामध्ये काही आलेख विशिष्ट कारणासाठी मुद्दाम तयार करून घेतलेले होते असे वाटते. विशेषत अष्ट-प्रधानाचे कार्य व हक्क किल्ल्याची देवाण-घेवाण किल्लेदारांच्या याद्या, तह इ. संबंधीचे आलेख तयार करुन घेतले असावेत असे दिसून येते. त्यापैकी ज्याच्या विचार या लेखांत करावयाचा आहे. तो आलेख १८१९ मध्ये इंग्रज आणि साताऱ्याचा छत्र-पती प्रतापसिंह यांच्यामध्ये झालेल्या तहाच्या संदर्भात तयार केलेला असावा.

हा आलेख बदामी रंगाच्या हँडमेड कागदावर तयार केलेला असून उभट आका-राचा आहे. कागदाची लांबी ६४.५ से. मी. असून रुंदी ५१ से.मी. आहे. आलेखामध्ये उभे १२ चौकोन असून आडवे ८ चौकोन आहेत. प्रत्येक चौकोन साधारण ६ × ६ सें. मी. आकाराचा आहे. फक्त लांबी मध्ये पहिल्या व शेवटच्या रांगेतील चौकोन ४.५० सें. मी. उंचीचे आहेत. मध्यभागी असलेले चार उभे आणि दोन आडवे चौकोनाभोवती बॉर्डर करण्यात आलेली आहे.

या आलेखाला एक स्लीप जोडलेली असून तीवर १९३९ मधील निळ्या शाई-मध्ये मोडी लिपित केलेली नोंद पुढील प्रमाणे आहे, "हा छावणीचा नकाशा आहे. यात माईसाहेब, भाऊसाहेब अशी नावे आहेत. माईसाहेब, प्रतापसिंह महाराजांचे मातुश्रीचे नाव. भाऊसाहेब, आप्पासाहेब प्रतापसिंह महाराज यांचे धाकटेबंधू. रामचंद्र राजे उर्फ भाऊसाहेब इ. स. १८२१ मध्ये जत येथे मरण पावले.

— वासुदेव विष्णू जोशी

सातारा जून ता. १६ शुक्रवार १९३९ या नोंदीवरून १९३९ मध्ये साताऱ्याने एक प्रयत्न केलेला दिसून येतो. जोशी यांनी या आलेखाला "छावणीचा नकाशा" असे म्हटलेले आहे. ते सत्कृत् दर्शनी बरोबर वाटते.

## आलेखाचा उलगडा–

आलेखाच्या डाव्या बाजूस 'उत्तर' उजव्या बाजूस 'दक्षिण' आणि वरील बाजूस 'पूर्व' व खालच्या बाजूस 'पश्चिम' अशी दिशांची नावे लिहीली आहेत. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, भारतामध्ये आलेख किंवा नकाशे तयार करतांना उर्ध्वभागी पूर्व दिशेचे स्थान ठरविलेले असले पाहिजे. आलेखाच्या मध्यभागी आठ चौकोनांच्या बॉर्डरमध्ये असलेल्या भागाला 'सरकार डेरे' असे म्हटले आहे. याचा अर्थ खुद्द प्रतापसिंह महाराज आणि त्यांची तैनात यांच्यासाठी सुरक्षित ठेवलेला भाग. सरकार डेऱ्याच्या पूर्वेस नगारखाना दोन चौकात दर्शविलेली असून तो पारंपारिक पद्धती-प्रमाणेच आहे. मध्ययुगीन राजवाड्यांना जोडून 'नगारखाने' बांधण्याची पद्धत होती. नगारखान्याच्या पूर्वेस 'पायदळ' व 'तोफखाना' हा भाग दोन चौकात दाखविलेला आहे. महाराजांच्या बालेकिल्ल्याच्या (सरकारी डेरे) संरक्षणासाठीही व्यवस्था आवश्यक ठरते. या विभागाच्या उत्तरेस एका चौकोनात 'पागाखासगी' असे लिहिले असून दक्षिण बाजूस एका चौकोनात 'पागास्वार' असे म्हटलेले आहे.

नगारखानाच्या दक्षिणेस एक चौंकोन सोडून दुसऱ्या चौकोनात "हाती" असे लिहिले आहे. याचा अर्थ लष्करातील हत्तीसाठीं हे स्थान निश्चित केले असावे. सरकार डेऱ्याच्या उत्तरेस वरुन सहाव्या चौकोनात डफळे व सेकमीरा अशी दोन नावे आहेत. याचा अर्थ हा भाग उपरोक्त सरदारांसाठी नेमून दिलेला होता. या चौकोनाच्या दक्षिणेकडील चौकोनात 'माईसाहेब, भाऊसाहेब, आप्पासाहेब याज-कडील कारकून मंडळी' असा निर्देश केलेला असून त्याच्या खालील चौकोनात खासगी

कारकून मंडळी असा उल्लेख आहे. पुन्हा त्या खालील चौकोनात 'पंडीतराव व उपाध्ये' मंडळी असा निर्देश आहे. वास्तविक पाहता शिवकालामध्ये अष्टप्रधानपैकी पंडीतराव हे युद्ध मोहिमावर जात नसत प्रस्तुत तक्त्यामध्ये पंडीतरावाचा हा उल्लेख मननीय वाटतो. या चौकोनाच्या उजवीकडील चौकोनात 'फरासखाना' ही जागा दर्शविली आहे. शिवकालीन १८ कारखान्यापैकी फरासखाना हा एक असून याचा अर्थ राहुटचा, डेरे, इ. ठेवण्याची जागा असा होतो. सरकार डेऱ्याच्या दक्षिणेस वरुन सहाव्या चौकोनात 'बलवंतराव भोसले' याचा निर्देश आहे म्हणजें उत्तरेकडे ज्याप्रमाणे डफळे व सेकमीरा त्याप्रमाणे दक्षिणेकडे बलवंतराव भोसले हे आघाडीचे सरदार होते. दक्षिणेकडील वरुन आठव्या चौकोनात निंबाळकर असे नांव असून बलवंतराव भोसले प्रमाणे या सरकारकडे ही दक्षिणेची आघाडी सोपविलेली होती. बलवंतराव भोसले या नावाच्या उत्तरेकडील चौकोनात दिवाण असा निर्देश असून त्या खालील चौकोनातून अनुक्रमे चिटणीस, फडणीस, दप्तर न्यायाधिश, सरकारचे मानकरी व बक्षी या अधिकाऱ्यांचे निर्देश आहेत.' याचा अर्थ मुलकी प्रशासनातील अधिकाऱ्यांसाठी या जागा राखून ठेवल्या होत्या.

सरकारी डेऱ्याला लागून पश्चिमेकडे दोन चौकोनात 'सिविका' महाल असा निर्देश आहे. याचा अर्थ ही जागा पालखी किंवा मेणा यासाठी राखून ठेवली होती. सिविका महालाच्या पश्चिमेस असलेल्या दोन-दोन चौकोनातून अनुक्रमे 'उष्टरखाना' 'गजाचा बाजार' आणि 'मोगलाई स्वार' याचे निर्देश आहेत. विशिष्ठ ठिकाणी आलेल्या या निर्देशावरून असे दिसते की, प्रतापसिंह महाराजाच्या तैनातीचे उंट, हत्ती, आणि घोडे, यांच्यासाठी या जागा ठेवल्या असाव्यात. 'उष्टरखानाच्या' डावीकडील चौकोनात 'कोठी' असा निर्देश असून हे ठिकाण भांडारगृह म्हणून योजले असावे.

## आलेखाचा हेतू –

दुसऱ्या बाजीरावने इंग्रजाबरोबर जेव्हा शेवटी लढा सुरु केला तेव्हा प्रतापसिंहासही बरोबर घेतले होते. २० फेब्रुवारी १८१८ रोजी अष्टीच्या लढाईत मराठ्यांचा दारूण पराभव झाला. या पराभवाबरोबर मराठ्यांच्या राज्यांची इतिश्री झाली. या लढाईनंतर प्रतापसिंह इंग्रजांच्या स्वाधीन झाला. त्यानंतर इंग्रजांनी ११ एप्रील १८१८ रोजी प्रतापसिंहास साताऱ्यास आणले व गादीवर बसविले. कॅप्टन ग्रेट प्रतापसिंहाच्या दरबारात राहीला. राज्याचे स्थिरस्थावर झाल्यानंतर २५-९-१८१९ रोजी प्रतापसिंहाबरोबर इंग्रजांनी तह केला. 'निरेपासून वारणेपर्यन्तचा प्रदेश प्रतापसिंहाच्या मालकीचा ठरविण्यात आला. या प्रदेशातील जहागीरदार प्रतिनिधी, सचिव


फलटणचे निंबाळकर, आक्कलकोटचे भोसले, जतचे डफळे आणि वाईचे शेखमिरे' हे सहा सरदार साताराचे मांडलिक समजून छत्रपतीच्या ताब्यात देण्यात आले.

(मराठी-रियासत-सरदेसाई उत्तर विभाग- ३ पृ. ५९१)

या आलेखातील निर्देशांचा विचार केल्यास १८१९ च्या तहाच्या सुमारास हा आलेख तयार केला असावा असे दिसून येते. जानेवारी १८२१ मध्यें प्रतापसिंहाचे भाऊ रामचंद्रभाऊ साहेब, आणि जानेवारी १८२३ मध्ये मातोश्री माईसाहेब यांचा मृत्यु झाला. या घटना लक्षात घेतल्यास प्रस्तुत आलेख निश्चितपणे १८२१ च्या अगोदर तयार केलेला असावा असे अनुमान निघते. म्हणजे १८१९ मध्ये इंग्रजांबरोबर तह करतांना प्रतापसिंहाच्या छावणीचा हा नकाशा तयार केला असे मानण्यास हरकत नाही.

---

सौ. विजया देशपांडे
संशोधक-सहाय्यक
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.


(पूर्व)
आकल कोटकर
हजार व ढाल
पागाखासगी
पायदल व तोफखाना
पागास्वार
नगार खाना
हाती
डफले व सेकमीरा
(उत्तर)
आईसाहेब व भाऊ साहेब व आप्पा साहेब याज कडील कारकून मंडळी
सरकार डेरे
सरकारी कारखाने
दीवाण
बळवंतराव भो
(दक्षिण)
खासगी कारकून मंडळी
चीटणीस
पंडीतराव व उपाधे मंडळी
फरसखाना
फडणीसीदप्तर
नींबालकर
सीवीका माहाल
न्यायाधीष
सरकारचे मानकरी व बक्षी
कोठी
उष्टरखाना
गजाचा बाजार
भोगलाईस्वार
(पश्चिम)

# किल्ल्यांचा झाडा

कु. सुनंदा अहिरे

---

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही असलेल्या कागदपत्रांमध्ये एक नमुनेदार तक्ता आहे. साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह यांच्या कागदपत्रांचे एक दफ्तर मंडळाचे संग्रही असून त्या दफ्तरात हा तक्ता उपलब्ध झाला. हा तक्ता अद्याप पावेतो अप्रकाशित असून तो या लेखाद्वारे प्रकाशित करण्याचे योजिले आहे. हा तक्ता सातारा इलाख्याकडील किल्ल्यांचा 'झाडा' संबंधी आहे. हा तक्ता ३९.४ x ३१.८ सें. मी आकाराचा असून त्यामध्ये एकूण १० उभे कॉलम आहेत तक्त्यासाठीं चिवट हॅन्डमेड कागद वापरलेला असून रंगाने किंचित पिवळसर आहे. तक्त्यातील मजकूर काळ्या शाईमध्ये मोडी लिपीत लिहिलेला असून सुवाच्य आहे. कॉलमची लांबी रूंदी मजकूराप्रमाणे घेतलेली आहे. उदा. पहिला कॉलम १.७ सें. मी. आहे. तर सातवा कॉलम ७.८ सें. मी. आहे. दुसरा कॉलम ५ सें. मी. असून पुढील ३ ते ६ कॉलम ३ से. मी. आहेत. आठवा कॉलम ३ सें. मी. एवढाच आहे. नंतर नववा व दहावा कॉलम प्रत्येकी $1\frac{1}{2}$ से. मी. आहे. तक्त्याच्या दोन्ही बाजूला किंचित समास सोडलेला आहे.

यातील १० कॉलम पुढील प्रमाणे–

१) नंबर
२) किल्ल्यांचे नाव
३) पाौ पाडलेत
४) कायम आहेत ते
५) पाौ इंग्रजी सरकारात
६) राजमंडळाकडे आहेत ते
७) कारकुनाची नावे
८) तैनात दरमहा
९) हरकामी
१०) दरमहा

तक्त्याच्या शिरोभागी 'श्री' लिहिले असून त्याखाली 'सातारा इलाख्याकडील किल्याचा झाडा सुमा ।। इहीदे अशरीन मयातैन व अलफ' हा मजकूर लिहिला आहे. याचा अर्थ हा तक्ता सुहूर सन १२२१ म्हणजेच इ. स. १८२१ मध्ये तयार केला असावा.

## तक्त्याची वैशिष्ठ्यें–

प्रस्तुत तक्त्यामध्ये एकूण २५ किल्ल्यांची नावे देऊन 'पाडलेल्या किल्ल्यांची संख्या', 'कायम असणाऱ्या किल्ल्यांची संख्या','इंग्रज सरकारकडे असणाऱ्या किल्ल्यांची संख्या', 'राजमंडळाकडे असणाऱ्या किल्ल्यांची संख्या', २ ते ६ कॉलम मध्ये दिलेली आहे. शिवाय विशिष्ठ किल्ल्यांवर व्यवस्था पाहाणाऱ्या कारकुनांची नावे, त्यांना दरमहा मिळणारी तैनात, हरकामी मिळणारे व दरमहा मिळणारे वेतन दिलेले आहे. अशा प्रकारचा तपशील देणारा हा कागद अपूर्व असून ऐतिहासिक साधनांमध्ये भर घालणारा आहे.

## तक्त्यातील विशेष–

किल्ले नंबर २ परली उर्फ सज्जनगड या गडावरील कारकून विनायक सदाशिव हा असून त्याची दरमहा तैनात २० (?) एवढी आहे व किल्ले नं. ३ कल्याणगड उर्फ नांदगिरी या किल्ल्यावरील कारकून माहादाजी बलाल हा असून त्याची तैनात दरमहा ३० (?) एवढी आहे. पुढे किल्ले नंबर १९ ते २३ या किल्ल्यावरील कार–कुनाची नांवे अनुक्रमे परशराम माहादेव, गणेश बलाल, त्रींबक सदाशिव, बाबाजी दत्तात्रय, अंताजी ज्यनार्दन अशी दिली असून त्यांची दरमहा तैनात अनुक्रमे २५, २५, २५, ३०, २० ? अशी दिलेली आहे. किल्ले नंबर १ आणि ४ ते १८ या किल्ल्या–वरील कारकुनाची नांवे तैनात वगैरे दिलेली नाही.

पाडलेले किल्ले, कायम किल्ले, इंग्रज सरकार
१ ते २५ किल्ल्यांपैकी १२ किल्ले पाडलेले आहेत.
१ ते २५ किल्ल्यांपैकी १३ किल्ले कायम आहेत.
१ ते २५ किल्ल्यांपैकी ३ किल्ले इंग्रजी सरकारकडे
१ ते २५ किल्ल्यांपैकी १० किल्ले राजमंडळाकडे

चंदन, वंदन, संतोषगड उर्फ ताथवडा, केळंजा, कमलगड, वैराटगड, मलानगड, गह्विमंडण, जंगली जयगड, मोरगीरी, मचींद्रगड व दातेगड हे सर्व किल्ले पाो पाडलेले

तर किल्ले नंबर १, २, ३, ७, ११, १२, १७, १९, ते २३ व २५ हे किल्ले कायम असून किल्ले नंबर ११, १२, १७ हे इंग्रज सरकारकडे कायम होते. त्यांची नांवे अनुक्रमे व्याघ्रगड, वासोटा, प्रतापगड, प्रचीनगड.

राजमंडळाकडे किल्ले नंबर १ ते ३, ७ नंतर १९ ते २३ व शेवटी २५ म्हणजे सत्परूषी उर्फ सातारा, परली उर्फ सज्जनगड, कल्याण उर्फ नांदगिरी, पांडवगड (१९ ते २५) वर्धनगड, महिमानगड, वारूगड, वसंतगड, सदासीव गड व भूषणगड हे सर्व किल्ले राजमंडळाकडे कायम.

कॉ. १ नंबर समास – १.३ सें. मी.
कॉ. २ नंबर – २.३ सें. मी.
कॉ. ३ किल्याचे नांव – ४.८ सें. मीं.
कॉ. ४ पाडलेत – ४ सें. मी.
कॉ. ५ कायम – ३ सें मी.
कॉ. ६ इंग्रज – ३ सें. मी.
कॉ. ७ राजमंडळ – ३ सें. मी.
कॉ. ८ कारकून – ७.५ सें. मी.
कॉ. ९ तैनात – ३ सें. मी.
कॉ. १० हरकामी – १.३ सें. मी.
कॉ. ११ दरमाहा – १.६ सें मी.

## तक्त्याविषयी खुलासा –

प्रस्तुत तक्त्या मध्ये २५ किल्ल्यांची नावे दिलेली असून हे किल्ले सातारा राज्याच्या परिसरातील आहेत. मराठयांच्या राज्याचा शेवट झाल्यावर इंग्रजांनी २५ सप्टेंबर १८१९ रोजी सातारच्या प्रतापसिंहा बरोबर तह केला. निरे पासून वारणे-पर्यंतच्या प्रदेशाची मालकी प्रतापसिंहाकडे देण्यात आली. हा तह महत्वपूर्ण असून इंग्रजांनी सातार्‍याच्या राज्यावर म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा सांगणार्‍या राज्यावर या तहाप्रमाणे प्रभुत्व निर्माण केले. या तहाप्रमाणे निरा ते वारणा या दरम्यान असलेल्या किल्ल्यांची मालकी प्रतापसिंह महाराजांकडे आली. १८२१ मध्ये तयार केलेल्या प्रस्तुत तक्त्यात १२ किल्ले पडीक अवस्थेत, १३ किल्ले चांगल्या अवस्थेत असे एकूण २५ किल्ले दर्शविले आहेत. चांगल्या अवस्थेतील १३ किल्ल्यांपैकी ३ किल्ले इंग्रज सरकारकडे दर्शविले आहेत.

इंग्रज सरकारकडे दर्शविलेले ३ किल्ले म्हणजे व्याघ्रगड (वासोटा), प्रतापगड आणि प्रचितगड ! इतर १० किल्ले राजमंडळाकडे दर्शविलेले असून त्यापैकी सात किल्ल्यातील कारकूनांची नावे व त्यांची तैनात दिलेली आहे. ७ कारकून पुढीलप्रमाणे

१) विनायक सदाशिव - परली उर्फ सज्जनगड
२) माहादाजी बलाल - कल्याणगड उर्फ नांदगीरी
३) परशराम महादेव - वरवन गड (?)
४) गणेश बलाल - महिमान गड
५) त्रींबक सदासीव - वारूगड
६) बाबाजी दत्तात्रय - वसंत गड
७) अंताजी ज्यनार्दन - सदासीव गड

राजमंडळाकडे असलेल्या १० किल्यांपैकी सात किल्ल्यांचे कारकून व तैनात दिलेली असून उरलेल्या ३ किल्ल्यांची दिलेली नाही. १) सातारा, २) पांडवगड ३) भूषणगड.

## निष्कर्ष

या तक्त्यावरून असे दिसते की, १८२१ मध्ये सातारा राज्यातील एकूण २५ किल्ल्यांपैकी १२ किल्ले निकामी झाले होते. इंग्रजांचे राज्य प्रस्थापित झाल्यावर किल्ल्यांचे महत्व किती ओसरले ते यावरून स्पष्ट होते. १३ किल्ल्यांपैकी ७ किल्ल्यावरच तैनात होती. आणि या तैनातीचे स्वरुप लक्षात घेतल्यास अतिशय जुजबी अशी व्यवस्था किल्ल्यावर ठेवलेली होती असे स्पष्ट होते. इंग्रजांनी जे ३ किल्ले ताब्यात घेतले ते लष्करी दृष्टया मोक्याच्या ठिकाणी होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

शिवकालातील किल्ल्यांचे महत्व पेशवे काळात ओसरले होते. यात शंका नाही. तथापि पेशवे कालातही महत्वाच्या किल्ल्यांची व्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवली जात असे. पेशवे कालातील कागदपत्रावरून किल्ल्यांच्या व्यवस्थेवर किती खर्च केला जात असे याची आकडेवारी मिळते. किल्यांचा उपयोग राजकीय हालचालीसाठ पेशवे काळातही केला जात होता- उदा निजामाने पुण्यावर स्वारी केली (१७६३) तेव्हा पेशवे कुटुंबातील मंडळींनी सिंहगडाचा आश्रय घेतला व तेथून हालचाली केल्या. दुसऱ्या बाजीरावला शेवटच्या लढाच्या वेळी रायगडाचा फार मोठा आधार वाटत होता, हे त्याच्या काही पत्रांवरून स्पष्ट होते.

श्री

## सातारा ईलाख्या कडील कील्याचा झाडा सुमाईहीदे आशरीन मयातैन व अलफ

| नंबर | कील्याचे नाव | पा पाडले ते | कायम आहेत ते | पा इंग्रज सरकारात | राजमंडळाकडे आहेत ते | कारकुनाची नावे | तैनात दरमहा | हरकामी | दरमाहा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सत्परुसी उर्फ सातारा | ० | १ | ० | १ | ० | ० | | |
| २ | कीले पग्ली उर्फ सज्यनगड | ० | १ | ० | १ | विनायक सदासीव | २० | १ | ५ |
| ३ | कल्याणगड उर्फ नांदगीरी | ० | १ | ० | १ | माहादाजी बलाल | ३० | १ | ५ |
| ४ | च्यंदन | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | कीले वंदन | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | संतोषगड ऊर्फ ताथवडा | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | कीले पांडवगड | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ८ | कीले केलंजा | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | कोले मलानगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | कीले वैराटगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | कीले व्याघ्रगड वासोटा | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | कीले प्रतापगड | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| १३ | कीले मक्रनगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | कीले महीमडण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १५ | कीले जंगलीजयगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १६ | कीले मोरगीर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १७ | कीले प्रचीतगड | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| १८ | कीले मचीद्रगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | कीले वखनगड | ० | १ | ० | १ | परशराम माहादेव | २५ | १ | ५ |
| २० | कीले महीमानगड | ० | १ | ० | १ | गणेश बलाल | २५ | १ | ५ |
| २१ | कीले वारुगड | ० | १ | ० | १ | त्रीबक सदासीव | २५ | १ | ५ |
| २२ | कीले वसंतगड | ० | १ | ० | १ | बाबाजी दतात्रय | ३० | १ | ४ |
| २६ | कीले सदासीवगड | ० | १ | ० | १ | अंताजी ज्यनार्दन | २० | १ | ४ |
| २४ | कीले दातेगड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २५ | कीले भुषणगड | ० | १ | ० | १ | | | | |
| | | १२ | १३ | ३ | १० | | १७५ | ७ | ३३ |

मराठ्यांच्या राजकीय हालचाली प्रायः किल्ल्यांवरून होत असतात यांचे निरिक्षण इंग्रजांनी केलेले होते. म्हणूनच मराठ्यांचे राज्य ताब्यात आल्यावर किल्ल्यांची व्यवस्था नष्टप्राय करण्याचे धोरण त्यांनीं स्विकारले. मराठ्यांचे राज्य जिंकतांना १८१८-१९ मध्ये इंग्रजांनी मराठ्यांचे अनेक किल्ले तोफांचा भडीमार करून पाडले. त्यावरून किल्ल्यांविषयी इंग्रजांना किती भय वाटले होते याची कल्पना येते. प्रस्तुत तक्त्यात २५ पैकी १२ किल्ले 'पडित' दर्शविले आहेत. चौथ्या कॉलममध्ये 'पाडलेले' असा उल्लेख आहे, इंग्रजांनी हे किल्ले पाडले असावेत हे उघड आहे. उरलेल्या १३ किल्ल्याविषयीही इंग्रज सावधच आहेत. 'झाडा' त्यासाठीच केला असावा. शिवाय तीन किल्ले आपल्याकडे ठेवून इंग्रजांनी सातारा भागावर आपली 'टेहळणी' ठेवली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

---

कु. सुनंदा ल. अहिरे
संशोधन-सहाय्यक
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

# प्राचीन भारतातील ग्रामसंस्था

कै. भा. वा. भट
संस्थापक
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ
व 'संशोधक' त्रैमासिक

---

भरतखंडात ७५ ते ८० टक्के लोक खेडेगावात राहाणारे आहेत. खेडीं मूळ कशी निर्माण झाली, त्यांत राहाणारा लोकसमाज कोणत्या रितीने बनला गेला, त्यांतील जमिनीची लागवड कशारितीने केलीं जात असे, राजसत्ताधिकाऱ्यांचा आणि खेड्यातील लोकसमाजाचा संबंध कशा प्रकारचा असे, खेडगांवांतील लोकांचे व्यवसाय कोणत्या स्वरुपाचे असत इत्यादि बाबी विषयी प्राचीन काळापासूनची माहती संकलित करुन प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

अशा या महत्वाच्या संस्थेविषयी माहिती देणारे काही ग्रंथ इंग्रजी भाषेत प्रसिद्ध झाले आहेत व त्यांतील माहिती उपयुक्त अशा प्रकारची आहे. खेडेगावा-संबंधीं थोडी बहुत माहितीं देणारा मराठीतील एकच ग्रंथ १९१५ साली प्रसिद्ध झाला आहे व तो म्हटला म्हणजे श्रीयुत अत्रे यांचा 'गांवगाडा' हा होय. मराठी वाङमयांत ग्रामसस्थेसारख्या महत्वाच्या विषयासंबंधी ग्रंथाचा जेथे पूर्ण अभाव होता, तेथे रा. अत्रे यांचे ग्रंथामुळे थोडी भर पडली ही गोष्ट निर्विवाद आहे. गाव गाड्यांत रा. अत्रे यांनी महाराष्ट्र देशातील खेड्यांत राहणाऱ्या लोकसमाजाविषयीची आधुनिक काळची बरीच माहिती दिली आहे व ती निःसंशय उपयुक्त आहे. परंतु फार पुरातन काळी ग्रामसंस्था भरतखंडात कशा रितीने अस्तित्वात आली, खेडेगावातील लोक समाजाची रचना कोणत्या पद्धतीने बनली गेली. हा लोकसमाज आपला सामुदायिक कारभार कोणत्या पद्धतीने चालवीत असे या व इतर अनेक बाबीसंबंधी रा. अत्रे यांनी गावगाड्यात कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही ग्रामसंस्थे-संबंधी सर्वांगीण विचार करावयाचा म्हणजे या संबंधाची फार प्राचीन काळापासूनची सर्व प्रकारची माहिती गोळा करुन ती प्रसिद्ध करणे जरुर आहे.

गांवगाडा हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंत्तर त्या ग्रंथातील वरील उणीव आमचे लक्षांत येऊन ती दूर करण्याचे आमचे मनांत आले त्या नंतर मनू, याज्ञवल्क्य इत्यादि स्मृति-ग्रंथ व कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादि ग्रंथांत ग्रामसंस्थेसबंधी आढळण्यात आलेली माहिती आम्ही एकत्र गोळा केली. ही माहिती गोळा केल्यानंतर त्या माहितीचे वर्गीकरण निरनिराळचा सदराखाली करता येण्यासारखे आहे असे आमच्या निदर्शनास आले. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण निरनिराळचा १८ सदरात आम्ही केले आहे. मराठी रियासतीचे काळांत स्मृतिवचनास अनुसरून ग्रामसंस्थेसंबंधी काही बाबतीत अंमल केला जात असे याचे ही थोडे दिग्दर्शन आम्ही या लेखात केले आहे.

## ग्राम वसाहतकरण

१) परदेशातील लोकांचे मन वळवून त्यांना अगर स्वराष्ट्रातील दाट लोक-वस्तीचे भागातील लोकांना स्थलांतर करण्यास लावून नवीन ठिकाणावर अगर उजाड झालेल्या पुरातन खेडचाचे ठिकाणावर राजाने नवीन खेडी वसवावी.

( कौ अर्थशास्त्र पूर्वार्ध पान २३ (करंदीकरकृत) अधि२, अध्या २२ )

२) १०० ते ५०० पावेतो कृषिकर्म करणाऱ्या शूद्र कुटुंबांच्या कोणत्याही संख्येची खेडी वसवावी अशा खेडचांचे क्षेत्र एक अगर दोन कोसांपेक्षा अधिक असू नये. परस्परांचे रक्षण करता येईल अशा बेताने ही खेडी वसविण्यात यावी. नद्या, डोंगर, झाडी, मोठे वृक्ष, दऱ्या, बंधारे इत्यादिकांच्या साधनांनी या खेडचांच्या हद्दी निश्चित करण्यात याव्या.

( अर्थशास्त्र पूर्वार्ध पान २३ (करंदीकरकृत) अधि २, अध्या २२ )

३) प्रत्येक खेडचाचे भोवती ८०० अंगुले अंतरावर लाकडी खांब रोवून सभोवार कुंपण करावे.

(अर्थशास्त्र)

४) ८०० खेडचाचे मध्यभागी स्थानीय. ४०० खेडचाचे मध्यभागी द्रोणमुख. २०० खेडचांचे मध्यभागी खरवाटिका, आणि १० खेडचांचे मध्यभागी संग्रहण या संज्ञेचे किल्ले राजाने बांधावे.

(अर्थशास्त्र अधि२ अंध्या २२)

५) ग्रामाभोवती चोहोबाजूस ग्राम आणि ग्राम जमिनी यांचे मध्ये १०० धनु अंतर सोडावे. काटेरी झाडांनी व्यापलेल्या ग्रामाभोवती २०० धनू ग्राम आणि ग्राम जमिनी यांत अंतर सोडावे.

(अर्थशास्त्र)

ग्रामांचे वसाहतीकरण कोणत्या रितीने करावयाचे याबद्दल अर्थशास्त्र व याज्ञवल्क्य स्मृती यांत आढळलेले उल्लेख वर दिले आहेत. ओसाड प्रदेशांत नवीन वसा-

हत कोणत्या रितीने करण्यात यावी या संबंधी अर्थशास्त्राच्या अधिकरण ७ अध्या १०९ पा. ५७ उत्तरार्धात विवेचन केलेले आढळते. ओसाड प्रदेशात ग्रामे वसविण्याचा हा एक दुसरा प्रकार त्याकाळी अस्तित्वात असल्याचे दिसते. काही व्यक्तीमध्ये ओसाड प्रदेशात वसाहत करण्याचे करार प्रथम ठरवून नंतर त्या प्रदेशात वसाहत करण्यात येत असे, असे वरील खंडातील विवेचनावरून दिसून येते. हे विवेचन उपयुक्त असल्याकारणा नेत्याचा साग्र उल्लेख खाली केला आहे.

" ओसाड पडलेल्या प्रदेशात आपण वसाहत करूं या" असा जो करार ठरत असे त्या करारास 'बिनमुदतीचा' ही संज्ञा असे. अशा प्रकारचा करार ठरल्यानंतर करार करणारांपैकी जो इसम सुपिक प्रदेशात ग्रामांची वसाहत करून प्रथम पीक उत्पन्न करितो त्यास वरील स्वरूपाचा करार करणाऱ्या दुसऱ्या इसमापेक्षा वसाहत केलेल्या जमिनीवर श्रेष्ठ हक्क प्राप्त होत असे.

## वसाहतकर्म ज्या प्रदेशांत करावयाचे त्याच्या योग्यायोग्यतेबद्दल विचार

पाण्याच्या अगर बिन पाण्याचा या दोहोंपैकीं वसाहत करण्यास चांगला प्रदेश कोणता ? पाण्याचा आटोपशिर प्रदेश विस्तीर्ण बिनपाण्याच्या सपाट मैदानापेक्षा वसाहत करण्यास अधिक योग्य असतो. कारण पाण्याच्या प्रदेशांत पीक व फळे वर्षभर तयार करता येतात.

ज्या सपाट प्रदेशांत थोडा पाऊस व थोडी मेहनत यांचे योगाने खरीप आणि रब्बीची पिके उत्पन्न करिता येतात तो प्रदेश वसाहत करण्यास योग्य होय. पाणी विपुल असणाऱ्या ज्या जमिनीत धान्य जास्त उत्पन्न करिता येते ती जमीन धान्या-खेरीज इतर पदार्थ उत्पन्न होणाऱ्या पाण्याच्या जमिनीपेक्षा श्रेष्ठ होय.

पाणी असणाऱ्या जमिनींपैकी जी जमीन विस्तृत असून जीमध्ये धान्याखेरीज इतर पदार्थ पिकतात ती जमीन आटोपशीर आणि जीमध्ये धान्य उत्पन्न होते अशा जमिनी पेक्षा अधिक श्रेष्ट होय. कारण विस्तृत पाण्याच्या जमिनीत निरनिराळ्या मसाल्यांची व औषधींची झाडे तयार होतात एवढेच नाही तर किल्ले आणि बचावाची साधने निर्माण करण्यास त्या प्रदेशाचा फार उपयोग होतो.

दोन प्रदेशांपैकी ज्या एकामध्ये धान्य होते व ज्या एकामध्ये खाणी असतात त्यापैकी दुसऱ्या प्रदेशापासून खजिन्यांत भर पडते. परंतु ज्या मध्ये धान्य होते त्या पासून खजिना व कोठारे या दोहोंमध्ये ही भर पडते. किल्ले व सार्वजनिक इमारतीच्या बांधकामास धान्याची फार जरूर असते. तथापि ज्या प्रदेशात मोठमोठाल्या

जमिनी विकत घेण्यास लागणाऱ्या मौल्यवान धातूंच्या खाणी असतात तो प्रदेश सर्वात श्रेष्ठ होय.

कोणत्याही नवीन प्रदेशांत चतुर्वणिकांचीं वसाहत करावयाची असल्यास कनिष्ट वर्णाच्या लोकांची वसाहत करणे श्रेयस्कर असते. कारण तसे केल्याने अनेक विपुल आणि कायमचे फायदे होतात.

पडीत आणि वहिती जमिनीपैकीं पडित जमीन वसाहत करण्यास अधिक योग्य असते. कारण ती मध्ये शेतीची अनेक प्रकारची कामे करिता येतात. अशा प्रकारची जमीन वहिती केली असता ती फार उत्तम ठरते. कारण त्या जमिनीत व्यापारी जिन्नस उत्पन्न होऊन त्या ठिकाणी व्यापारी लोकांचे दळणवळण सुरू होऊन व्यापारी देवघेव सुरू होते.

## ग्रामांचे प्रकार

कौटिल्याचे काळी ग्रामांचे कोणकोणते प्रकार होते याची कल्पना खालील उताऱ्यावरुन होण्यासारखी आहे. अर्थशास्त्राच्या दुसऱ्या खंडाच्या ३५ व्या अध्यायांत खालील उल्लेख आढळतो.

राजाने आपले राज्याचे चार भाग केल्यावर आणि राज्यांतील ग्रामांचे वरिष्ठ मध्यम आणि कनिष्ठ अशा तीन प्रकारचे भाग केल्यानंतर ग्रामांचे वर्गीकरण खाली दर्शविल्याप्रमाणे करावे.

१) ज्या ग्रामास कर माफ आहे अशी ग्रामे (परिहारक)
२) ज्या ग्रामातून योध्यांचा राजास पुरवठा केला जातो ती ग्रामे (औद्धीय)
३) जी ग्रामे धान्य, जनावरे, सोने अगर कच्चा माल (कुप्ये) यांच्या रूपाने राजास द्यावा लागणारा कर देतात ती.
४) जी ग्रामे फुकट मजुरांचा पुरवठा करितात व दुध लोणी इत्यादि पदार्थांचे रुपाने राजास कर देतात ती ग्रामे.

वरील उताऱ्यावरून कौटिल्याचे काळी ग्रामांचे प्रकार किती होते हे दिसून येते.

## ग्रामांतील जमिनीवरील मालकी संपादन करण्याचा प्रकार

शिकार करतांना हरणास प्रथम जखम करणारा जसा त्या हरणाचा मालक समजतात त्या न्यायाने जमिनीवरील झाडें तोडून ती साफ करणारा तिचा मालक ठरतो,
(मनू अ. ९ श्लो. ४४)

पोषाक, वाहान, दागिनें, शिजविलेले अन्न, पाणी, दासी धर्मादायाकरिता अगर

यज्ञाकरिता ठेविलेली मिळकत आणि गुरे चरण्याचे कुरण ही मिळकत अविभाज्य होय.
मनू. अ. ९ श्लो. २१९

गृहस्थाश्रमी मनुष्याचें घर आणि त्याची जमीन या दोन गोष्टीवर त्याचे अस्तित्व अवलंबून आहे. यास्तव राजाने त्यांचा कधीही नाश करू नये कारण गृहस्थाश्रमाचा उगम या दोन गोष्टींपासून होतो.

महाभारतामध्ये ग्रामाच्या जमिनीचा मालकी व मोजणी संबंधी जे उल्लेख आले आहेत त्या उल्लेखाचे आधारे रा. चिंतामणराव वैद्य यांनी महाभारत चा उपसंहार पान ३०३ मध्ये खालीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे. 'गावांतील हद्द निश्चित असुन त्या हद्दीतील लागण होणाऱ्या सर्व जमिनीवर गाववाल्यांची मालकी असली पाहीजे. ही मालकी समाईक किंवा विभागलेली असेल हे सांगता येत नाही.' . . . 'यापूर्वी निवर्तन हे माप असावे असे महाभारताचे टीपवरून दिसते.'

" यो वै किनाश: शत निवर्तांनी भूमेः कर्षति तेन विष्ठिरूपेण राजकिय मपि निवर्तन दशकं कर्षणीयं स्वीयव द्रक्षणीयंच "

जो शेतकरी घरची शंभर निवर्तन जमीन नांगरील त्याने राजाची १० निवर्तन जमीन फुकट नांगरावी व लावणी करावी.

निवर्तन हा शब्द चाणक्याचे अर्थशास्त्रांत आलेला आहे त्याचा अर्थ २० हात असा आहे. तेव्हा निवर्तन म्हणजे चौरस ४०० हात होत.

## ग्रामांतील जमिनी व त्यातील पिकांचे रक्षण

राखलेल्या रानातून जनावरे शेतात चरत असल्याचे आढळल्यास ती गोष्ट अरण्याचे रक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याचे नजरेस प्रथम आणावी. आणि जनावरास इजा अगर दुखापत न करता शेतांतून हाकून द्यावे. उनाड गुरे शेतांत चरत असल्यास त्यांना चाबकाने अगर दोरांनी मारून हाकून द्यावे. जनावरास कोणत्याही प्रकारची दुखापत केल्यास त्याबद्दल त्यांना शिक्षा करण्यात येईल. जे लोक दुसऱ्याच्या जमिनीतील पीक चारण्याकरितां जनावरे घालतात अशा लोकांना या त्यांचे गुन्ह्याबद्दल त्यांना शिक्षा केली जाईल,
( अर्थशास्त्र पान २१९।२० )

प्रत्येक शेताचे मालकाने शेताभोवती उंटास आंत पाहतां येणार नाही इतके उंच व कुत्र्यांस अथवा डुकरांस आंत शिरता येणार नाही इतके दाट कुंपण करावे
(मनुस्मृति अ ८ श्लो. २३९ )

## गायरान

प्रत्येक ग्रामाचे भोवती १०० धनू जागा (एक धनू = ६ फूट) गुरांना चारण्याकरिता राखून ठेवण्यात यावी.

(मनु. अ. ८ पान २३७)

ग्रामातील लोकांच्या इच्छेप्रमाणे व राजाचे परवानगीने गुरे चरण्याकरिता जमीन राखून ठेवावी. गवत, यज्ञास लागणारे सर्पण, फुले ही वाटेल त्या ठिकाणाहून त्याचे स्वत:चे मालकीची असल्याप्रमाणे द्विजांस नेण्याची परवानगी आहे.

(याज्ञवल्क्य स्मृति अ. २ श्लो. २६९)

प्रत्येक ग्रामांत जी जमीन लागण करण्यात येत नसेल ती ग्रामांतील गुरांना चरण्याकरिता राखून ठेवावी.

(अर्थशास्त्र पान ५४)

## ग्रामांतील जमिनीची लागण

यज्ञ करणारे ब्राम्हण, भिक्षुक, आणि वेदाध्ययन करणारे ब्राम्हण यांना पुरेसे उत्पन्न होईल इतकी जमीन राजाने द्यावी व त्या जमिनी संबंधी कोणत्याही प्रकारचा कर राजाने त्यांचेपासून घेऊ नये.

(अर्थशास्त्र पान ५२)

देखरेख करणारे, जमाखर्च ठेवणारे लोक, स्थानिक, गुरांचे वैद्य, चाबुकस्वार, हलकारे आणि माणसांस औषध देणारे वैद्य यांना राजाने जमिनी गहाण अगर विक्री न करण्याचे शर्तीवर लागण करण्याकरिता द्याव्या.

(अर्थशास्त्र पान ५२)

जो कर देण्यास राजी असेल त्यास त्याचे हयाती पर्यंत राजाने जमिनी लागण करण्याकरिता द्याव्या.

(अर्थशास्त्र पान ५२)

जे लोक जमिनी लागण करीत नाहीत त्या त्यांचेकडून काढून घेण्यात येऊन दुसऱ्या लोकांस लागण करण्यास द्याव्या अगर त्यांची लावणी ग्रामभृजिकाकडून (मजूरीवर काम करणारे लोक) अगर वैदेहक (व्यापार करणारे) यांचेकडून करविण्यात यावी. म्हणजे जमिनीची मशागत योग्य प्रकारे होऊन राजाचे नुकसान होणार नाही.

(अर्थशास्त्र पान ५२)

लागण न केलेल्या जमिनी ज्यास देण्यात येतील ते त्यांची लागण करण्यास तयार असल्यास त्यांचे कडून काढून घेण्यात येऊ नयेत.

(अर्थशास्त्र पान ५२)

## ग्राम जमिनीबद्दल द्यावा लागणारा राजभाग

ज्याप्रमाणे जळू, गाईचे वासरु आणि मधमाशी थोडचा प्रमाणाने आपले अन्न शोषण करितात त्याप्रमाणे राजाने आपले प्रजेकडून नेमस्त प्रमाणाने वार्षिक कर घ्यावे.

(मनुस्मृति अ. ७ श्लो. १२९)

जनावरे आणि सोने यांचा व्यापार करणाऱ्यांपासून एक पन्नासाअंश हिस्सा आणि पिकाचा एक अष्टमांश, एक सष्टमांस अथवार एक बाराअंश हिस्सा राजाने प्रजेपासून घ्यावा.

क्षत्रिय राजाने आपत्तीचे काली पिकाचा चौथा हिस्सा घेतल्यास त्यास दोष लागत नाही. मात्र त्याने प्रजेचे संरक्षण करण्याची शिकस्त केली पाहिजे.

(मनु अ. १० श्लो. ११८)

राजाने वेतना दाखल आपल्या प्रजेच्या उत्पन्नाचा अगर पुण्याचा ६ वा हिस्सा घेऊन तिचे रक्षण करावे.

(बोधायम प्रश्न १ अ १० कंडिका १८ श्लोक १)

शेतकऱ्याने राजास उत्पन्नाचा १० वा, ८ वा अथवा ६ वा हिस्सा द्यावा.

(गौतम स्मृति अ-१० श्लो २४)

धर्माप्रमाणे वागणाऱ्या राजाने प्रजेकडून तिचे उत्पन्नाचा ६ वा भाग घ्यावा.

(वशिष्ट स्मृति अ-१ श्लोक ४२)

राजाने प्रजेकडून दरसाल धान्याचा ६ वा हिस्सा कर म्हणून घ्यावा.

(विष्णू स्मृ. अ-३३ श्लो. २२)

महाभारताचे शांतीपर्वाच्या ६७ व्या अध्यायामध्ये प्रजेकडून राजाने घ्यावयाच्या करासंबंधी खालील प्रकारचा उल्लेख आढळतो.

मनूने सर्व प्रजाबरोबर राज्य करण्याचा करार खालील शर्तीवर केल्याचा उल्लेख महाभारतांत आहे.

"तुला आम्ही पशूंचा एक पन्नाशांस हिस्सा, सुवर्णाचा एक पन्नाशांस व धान्याचा एक दशांस हिस्सा अर्पण करू"

या नियमामध्ये बदल झाला असावा असे शांतीपर्वातील ६९ वे अध्यायातील खालील श्लोकावरून दिसून येते.

आददीत बलिंचापि प्रजाभ्यः कुरू नंदन ।
स षड भाग मपि प्राज्ञस्ता सामेनाभि गुप्तये ।

शहाण्या राजाने प्रजेपासून तिच्याच रक्षणासाठी एक षष्ठआंश कर घ्यावा सभापर्वात नारदाने हाच भाग सांगितला आहे व या पेक्षा जास्त घेत नाहींसना ! असा धर्मराजास प्रश्न केला आहे.

पिकाचा ६ वा हिस्सा राजास २१ वा हिस्सा ब्राह्मणास आणि ३० वा हिस्सा देवास दिल्याने शेतकरी सर्व पापांपासून मुक्त होतो

(पाराशर स्मृति अ–२ श्लो. १४)

जमिनीची लागण करणाऱ्या शेतकऱ्याकडून त्यास झालेल्या उत्पन्नाचा कितवा भाग राजाने घ्यावा याबद्दल अर्थशास्त्रांत उल्लेख कोठे आढळत नाही. पण कोष्टागाराच्या मुख्य अधिकाऱ्याबद्दल जे विवेचन दुसरे खंडाचे १० वे अध्यायांत आले आहे त्यात खालील उल्लेख आढळतो.

ठराविक कर, उत्पन्नाच्या एक सष्ठआंश भागाच्या रुपाचे कर इत्यादिचा राष्ट्र या संज्ञेत समावेश होतो.

या वाक्यावर टीका करणारानें खालील प्रकारची टीका केली आहे.

ठराविक कर, म्हणजे सर्व ग्रामांकडून घेतला जाणारा कर. जमिनीच्या उत्पन्नाचा षड्भाग यांत उत्पन्नाच्या तिसऱ्या अगर चौथ्या भागाचाही समावेश होतो.

ग्रामातील जमिनी लागण करणाराकडून वरील प्रकारचे कर घेण्यात येत असत असे वरील उल्लेखावरून स्पष्ट होत आहे.

अर्थशास्त्राच्या पांचव्या खंडाच्या दुसऱ्या अध्यायामध्ये राजाने कोशाची भरती कशा प्रकारे करावयाची याबद्दलचे विवेचन केलेले आहे. त्या विवेचनात प्रस्तुत प्रश्नाबद्दल खालील माहिती आढळून येते. सबब ती येथे नमूद करणे जरूर आहे,

राज्यांपैकी जो प्रदेश सर्वस्वी पावसावर अवलंबून असून ज्यांत धान्य विपुल पिकते त्या प्रदेशातील जमिनीचे मालकाकडून राजाने जमिनीचे उत्पन्न होणाऱ्या पिकाचा एक तृतियांश अगर एक चतुर्थास हिस्सा जमिनीचे मालकाचे मगदुराप्रमाणे घ्यावा.

(अर्थशास्त्र पान ३०२)

जमीन करणाराचे पोटास व बीजाकरितां लागणारे धान्यखेरीज करुन बाकी जे धान्य राहील त्याचा ४ था हिस्सा राजाने सोने देऊन शेतकऱ्यांकडून विकत घ्यावा.

(अर्थशास्त्र पान ३०२)

सारा वसुल करणारे अधिकाऱ्यांचे हाताखालील लोकांनी खजिन्यांत पुरा पैसा नसल्यास उन्हाळी पिके तयार करण्याबद्दल शेतकऱ्यांचे मन वळवावे या प्रमाणें पीक तयार करण्याचे जे शेतकरी नाकारतील त्यास उत्पन्न होणारे पिकाचे दुप्पट दंड करावा.

(अर्थशास्त्र पान ३०२)

जमिनीची लागण करणाऱ्यापासून धान्याचा चौथा भाग वन्य पदार्थ कापूस, मेण झाडाच्या साली, ताग, लोकर, रेशीम औषधी, चंदन, फुले, फळे, भाज्या, जळाऊ लाकडे, कळक, मांस आणि सुके मासे इत्यादीकांचा ६ वा भाग राजाचे अधिकाराने घ्यावा. हस्तिदंत आणि जनावरांची कातडी यांचा अर्धाभाग मागावा. राजाचे परवानगीशिवाय वरील कोणत्याही पदार्थाची विक्री शेतकऱ्यांनी केल्यास तो पहिल्या

प्रतीच्या दंडास पात्र होईल. वरील प्रमाणे कर शेतकऱ्यापासून घेण्यांत यावेत.
(अर्थशास्त्र पान ३०२।८३)

## ग्रामांतील जमिनीसंबंधी वाद

ग्रामांतील जमिनीसंबंधी वादाचा निकाल ग्रामांतील आसपासच्या अगर खुद्द ग्रामांत राहणाऱ्या वृद्ध पुरुषांनी करावा. अशा वृद्ध पुरूषामध्ये मतभेद झाल्यास त्या वादाचा निकाल शुचिर्भूत आणि सभ्य अशा लोकांनी करावा. अथवा ज्या जमिनी-बद्दल वाद असेल ती उभयतांनी आपआपसात सारखी वाटून घ्यावी. वरील प्रमाणे वादाचा निकाल न लागल्यास वादाच्या जमिनीचा ताबा राजाने करावा. ज्या जमि-नीवर कोणीही मालकी सांगण्यास येत नसेल त्या जमिनीचा ताबा वरील प्रमाणेच राजाने करावा, अगर ती जमीन ग्रामांतील लोकांस सारखी वाटून द्यावी. एखाद्या जमिनीचा ताबा कोणीही बळजबरीने केल्यास त्यास चोराप्रमाणे शिक्षा करावी.
(कौ. अ. स. ३ अ ९. १६९)

एखाद्या जमिनीचा ताबा एखाद्या इसमाने योग्य कारणाकरिता केल्यास जमिनीचे मालकांस जमिनीचा ताबा करणाऱ्याकडून योग्य भाडे देववावे.
(कौ. अ. स. ३ अ. ९. १६९)

दोन जमिनीचे हद्दीपलीकडे अतिक्रमण करणाऱ्यास पहिल्या प्रतीचा दंड करावा, जमिनीच्या हद्दी दाखविणाऱ्या खुणा नाहिशा करणाऱ्यास २४ पण दंड करावा, अर-ण्यांतील पर्णकुटिका, गुरे चरण्याच्या जमिनी, मोठे रस्ते, स्मशाने, देवळे, यज्ञ कर-ण्याच्या जागा आणि यात्रा भरण्याच्या जागा यांचे संबंधी वाद उपस्थित झाल्यास त्या वादांचा निकाल वरील प्रमाणेच करावा. (कौ. अ. खं. ३ अ. ९.१६९)

## ग्रामजमिनी इत्यादिकांचा सीमावाद निर्णय

शेते, विहिरी, तलाव, बागा आणि घरे यांच्या हद्दीच्या वादांचा निकाल आस-पास राहणाऱ्या लोकांच्या पुराव्यावर अवलंबून असतो
(मनुस्मृति अध्याय ८ श्लोक २६२)

दोन शेतांतील सीमा पुराव्याने निश्चित करिता न आल्यास राजाने वादग्रस्त जमीन उभयता वाद्यामध्ये सारखी वाटून द्यावी.
(मनुस्मृती अध्याय ८ श्लोक २६५)

जर एखाद्या इसमाने पूल बांधण्याकरिता दुसऱ्याचे जमिनीवर अतिक्रमण केले तर पूल बांधण्याचे कामात त्यांस हरकत करू नये; कारण पुलामुळे जमिनीवर अतिक्रमण

झाले तरी त्यापासून पुष्कळांचा फायदा होतो. त्याचप्रमाणे विहिरीसंबंधीही नियम समजावा. कारण विहिर जरी लहान जागेत असते तरी तीमध्ये पाणी विपूल असते.
(याज्ञवल्क्य स्मृति अ. २ श्लोक १५९)

जर एखाद्याने दुसऱ्याचे जमिनीवर तिचे मालकास नकळत त्याचे परवानगी वाचून पुल बांधिला तर त्या पुलापासुन होणारे सर्व उत्पन्न जमिनीचे मालकास अगर तो हयात नसल्यास पूल बांधणारास मिळेल.
(याज्ञवल्क्य स्मृति अ. २ श्लोक १६०)

जो मनुष्य जमीन नांगरुन तींत स्वत: अगर दुसऱ्याकडून पीक पेरीत नाही त्याने त्या जमिनीत जितके धान्य उत्पन्न झाले असते तितके जमिनीचे मालकास द्यावे आणि मालकाने वाटल्यास तीं जमीन दुसऱ्यास (खेडण्यास) द्यावी
(याज्ञवलक्य स्मृर्ती अ. २ श्लो. १६१)

नारदस्मृति अध्याय ११ श्लोक १७ व १८

पाटबंधारे दोन प्रकारचे असतात, एकास 'खेय' अशी संज्ञा आहे म्हणजे जो जमिनींत खणतात तो दुसऱ्यास 'बांध्य' अशी संज्ञा आहे म्हणजे ज्याचे योगाने पाण्यांस अटकाव होतो तो. १७

दुसऱ्याचे शेताचे मध्यभागी बांध घातला असतां त्यापासून फायदा पुष्कळ होऊन तोटा क्षुल्लक होण्यासारखा असल्यास अशा प्रकारचा बांध घालण्यास कोणासही मनाई नाही.
(नारद अध्याय २१ श्लोक १८)

जर एखाद्या माणसांने फार दिवसापूर्वी केलेला परंतु मोडकळीस आलेला पाट-बंधारा मालकाचे परवानगीवाचून दुरुस्त केला तर त्यास त्याचा उपयोग आणि त्या-पासून होणारा नफा त्यास मिळणार नाही. (नारद स्मृ. अ. ११ श्लो. १९)

परंतु मोडकळीस आलेल्या पाटबंधाऱ्याचे मालकाचे अथवा त्याचे वारसाचे मरणानंतर त्या बंधाऱ्याची दुरुस्ती कोणीही राजाचे परवानगीने करावी. परंतु राजाचे परवानगीशिवाय त्याने दुरूस्ती केल्यास त्याचे नुकसान होईल. एकाने मारलेल्या हर-णास दुसऱ्याने वरचेवर बाण मारिले तरी जसे ते निरूपयोगी होतात त्याप्रमाणे हे त्यांचे कृत्य निरूपयोगी होते.
(ना. स्मृ. अ. ११ श्लोक २१ व २२)

## ग्रामांतील लोकांचे हक्क व जबाबदाऱ्या

खेड्यातील पोक्त लोकांनी जे अज्ञान व निराश्रित असतील ते वयात येई पावेतो त्यांची मालमत्ता जतन करावी, त्याचप्रमाणे देवाच्या मालमत्तेचेही रक्षण त्यांनी करावे

ग्रामकार्यांकरिता ग्रामाचा प्रमुख म्हणजे पाटील यास बाहेर प्रवासास जावे लाग-ल्यास ग्रामांतील लोकांनी आळीपाळीने त्याचे बरोबर जावे. जे लोक पाटलाबरोबर

याप्रमाणे जाणार नाहीत, त्या प्रत्येकास एक योजन अंतरास १॥ पण याप्रमाणे दंड केला जाईल.

एखादा व्यापारी प्रवासात असता त्याने रात्रीच्या वेळी आपला माल ग्रामांत ठेविला असता तो माल नाहीसा झाल्यास अगर चोरीस गेल्यास त्या व्यापाऱ्याचे झालेले नुकसान ग्रामाच्या पाटलाने भरुन द्यावे.

व्यापारी प्रवासात असतां दोनखेड्यामधील प्रदेशात त्याचा माल चोरीस गेल्यास गुरास चरावयास राखलेल्या जमिनीवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्याने त्या व्यापाऱ्याचे झालेले नुकसान भरुन द्यावे. अशा प्रकारच्या जमिनी त्या दोन ग्रामांच्या दरम्यान नसल्यास त्या व्यापाऱ्याचे नुकसान चोररज्जुक या नावांच्या अधिकाऱ्याने भरपाई करून द्यावे, ज्या प्रदेशांत चोररज्जुक या नांवाचे अधिकारी नेमिले नसतील अशा प्रदेशात व्यापाऱ्याच्या मालाची चोरी झाल्यास ज्या ठिकाणी चोरी झाली असेल त्या ठिकाणच्या आसपासच्या लोकांनी व्यापाऱ्याचे झालेले नुकसान भरुन द्यावे अशा प्रकारच्या ठिकाणाच्या आसपास लोकवस्ती नसल्यास चोरी झालेल्या ठिकाणाच्या जवळच्या ५ अगर १० ग्रामांतील लोकांनी व्यापाऱ्याचे झालेले नुकसान भरून द्यावे.

(खं. ४ अ. १३–२३२)

मोडकळीस आलेल्या धर्मादाय इमारतींची दुरुस्ती ग्रामांतील लोकांनी करावी.

शेतकरी आणि सरकारी नोकर यांस ते आपले काम करीत असतां कर्जाकरितां कैद केले जाणार नाहीत.

(खं. ३ अ. भ. ११ - १९५)

उन्हाळ्यांत ग्रामांतील लोकांनी स्वयंपाक घराचेबाहेर करावा अगर आग लागली असतां ती विझविण्याकरिता ज्या १० साधनांचा उपयोग करण्यांत येतो ती साधने जवळ ठेवावी (आग विझविण्यांची १० साधने म्हटली म्हणजे- पाणी भरलेली भांडी, शिड्या, कुऱ्हाडी, सुपे, आकडे, पखाली इ.)

(खं. ४ अ. ३-२०५)

नदीकाठचे खेड्यातील लोकांनी पावसाळ्याचे सुरवातीस उंच प्रदेशांत रहावयास जावे. फळ्या, कळक आणि नावा यांचा अशा खेड्यातील लोकांनी संग्रह करावा पुरामध्ये सांपडलेल्या लोकांचा बचाव भोपळे, डोंगे झाडाचे बुडखे, अथवा नावा इत्यादि वस्तूंचे साह्याने करावा ज्याचे जवळ नावा नाहींत अशा लोकांखेरीज इतर लोकांनी पुरांत सापडलेल्या माणसास वाचविले नाही तर प्रत्येक इसम १२ पण दंड देण्यास पात्र होईल, पौर्णिमा आणि अमावास्येचे दिवशी फार पाऊस पडल्यास वेदाध्ययन करणाऱ्याकडून मंत्रतंत्र करवून त्यांचे साह्याने ग्रामातील लोकांनी पाऊस बंद करावा.

पाऊस पडत नसल्यास इंद्र, गंगा, पर्वत इत्यादिकांची पुजा करावी.

(खं. ४ अ. ३-२०६)

## ग्रामातील जमिनीच्या खेडूसंबंधी राजाचीं कर्तव्यें

ग्रामांतील जमिनी वहती करणारे लोक विशेष आयास न करितां कर देतील तर राजाने त्यांना धान्य, गुरे व पैसे सवलतीचे शर्तीवर पुरवावे (खं. २ अ,१ श्लो४७)

ज्या योगाने राजाच्या खजिन्यांत तूट येणार नाही अशा रितीने राजाने ग्रामांतील जमिनी सवलत व सुट जमिनी खेडणारास द्यावी. (खं. २ अ. १ ४७)

जुलमी कर फुकट बेगार यांचे पासून राजाने शेतकऱ्यांचे रक्षण करावे. त्याच प्रमाणे चोर, वाघ, विषारी प्राणी आणि गुरांचे रोग यांचे पासून जनावरांचे रक्षण करावे. (खं २ अ १ - ४८)

सर्वत्रास उपयुक्त अशा सेतुबंध इत्यादि कामे समाईक श्रमानें जे करितात व व ग्रामे शोभिवंत करून व पहारा करून त्यांचे रक्षण करितात त्यास राजाने सवलती द्याव्या. (खं. ३ अ. १० - १७३)

ज्या जमिनी बीनहद्दीच्या असतील अगर ज्यांचा उपभोग कोणी घेणारा नसल्याकारणाने ज्या पडीत पडल्या असतील त्या राजाने फायदा होईल अशा रीतीने ग्रामांतील लोकांस वाटून द्याव्या (खं ३ अ.९ १६९)

कोणत्याही ग्रामांत वानप्रस्थाखेरीज इतर संन्याशास अगर सजात दानीय संघास अगर स्थानिक परस्पर साहचकारी संघाखेरीज इतर संघास प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. त्याच प्रमाणे ग्रामांत खेळ अगर तमाशे करण्याकरिता इमारती बांधण्यात येऊ नये. पैसा, फुकट मजुरी, धान्य, पेय पदार्थ अगर इतर वस्तु मिळविण्याचे इराद्याने नाटकवाले, नाचणारे, गाणारे, तमाशेवाले, ढोळकेवाले, विदूषक, लावण्या पवाडे गाणारे यांना खेड्यांतील लोकांचे कामास व्यत्यय करु देऊ नये कारण ग्रामांतील लोक हे सर्वस्वी त्यांचे जमिनीतील उत्पन्नावर अवलंबून असतात. (खं. २ अ. १. ४८)

जे लोक पडित जमिनी वहितीस आणतील त्यास राजाने धान्य आणि गुरे यांचा पुरवठा करावा. (पान ३०२)

## ग्रामांतील जमिनी वहिती करण्याच्या शर्ती

पुरेशी माणसे काम करण्यास नसल्याकारणानें ज्या जमिनी नापेर राहतील त्या जमिनी, जमिनींत होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा देण्याच्या शर्तीवर, वहती करण्याकरितां द्याव्या. अथवा जे लोक जातीने मेहनत करणारे आहेत त्या लोकांना एके चतुर्थांश अगर एक पंचमांश जमिनीचे उत्पन्न देण्याचे शर्तीवर वहिती करण्याकरितां द्याव्या, अथवा ज्यांच्या स्वतःच्या जमिनी वहती करणें कठीण आहे, अशा लोकांना

विशेष त्रास न होईल, अशा बेताने राजास जेवढे उत्पन्न देता येणे शक्य आहे, तितके उत्पन्न देण्याच्या शर्तीवर द्याव्या. (खं. २ अ. २४-११७)

जे लोक हाताने पाणी भरून जमिनीत पीक काढितात, त्या लोकांकडून जमिनीचे उत्पन्नाचा एक पंचमांश हिस्सा उदकभाग म्हणून घ्यावा. जे लोक डोक्यावर पाणी घेऊन जमिनीत पीक उत्पन्न करितात, त्यांचे कडून एक चतुर्थांश पिकाचा भाग घ्यावा. मोटेने पाणी ओढून त्यावर पीक उत्पन्न करणाराकडून उत्पन्नाचा एक तृतियांस हिस्सा घ्यावा, आणि नद्या, तळी, तलाव आणि विहिरी यांचे पाण्यावर जमिनीत पीक उत्पन्न करणाराकडून एक तृतियांश अगर एक चतुर्थांश पिकाचा हिस्सा घ्यावा.

(खं २ अ. २४-११७)

## गुराख्यांची रखवालीस दिलेल्या जनावरांसंबंधी जबाबदारी

मनुस्मृति अध्याय ८ श्लोक २३० ते २३६

दिवसा जनावरें रक्षण करण्यासंबंधी सर्व जबाबदारी गुरख्यावर आहे, त्याच प्रमाणे रात्री देखील जनावरे, गुराख्याचे त्याब्यांत असल्यास, त्यांच्या रक्षणाची जबाबदारी त्याचेवर आहे, जनावरें रात्री त्यांचे मालकाचे घरी असल्यास त्यांच्या रक्षणाची जबाबदारी मालकावर आहे (२३०)

फक्त गुरांचे दुधाचे वेतन देण्याच्या शर्तीवर ज्या गुराख्यास जनावरे रक्षण करण्याकरितां ठेविले असेल त्यानें गाईच्या मालकाच्या संमतीने दहा गाई मागे एका उत्तम गाईचे दुध घ्यावे. (२३१)

हरवलेल्या विषारी कृमीमुळे मेलेल्या अगर श्वापदानी मारिलेल्या, अथवा खड्यांत पडून मेलेल्या जनावरामुळे मालकाचे झालेले नुकसान गुराख्याने नुकसान टाळण्याचे योग्य प्रयत्न केले नाहींत, असे ठरल्यास तें नुकसान गुराख्याने भरुन द्यावे. (२३२)

परंतु जनावरें चोरीस गेल्यास गुराख्यानें ओरड केली तरी देखील, तो नुकसान देण्यास जाबाबदार धरला जाणार नाही. मात्र जनावराचे मालकास त्यानें योग्य वेळी व स्थळी चोरीबद्दल माहिती दिली पाहिजे.

जनावर मेल्यास गुराख्याने जनावराच्या मालकाकडे त्याचे कान, कातडे, शेप इ. नेऊन त्या जनावराच्या विशिष्ट खुणा त्यास दाखवून द्याव्या. (२३४)

शेळ्याचे अगर मेंढ्याचे कळपास लांडग्यांनी वेढा घातला असतां जर राखणारा त्यांना सोडविण्याकरितां धावला नाही तर लांडग्याने मारलेल्या जनावराचे नुकसान त्यानें मालकास भरुन दिले पाहिजे. (२३५)

परंतु वरील जनावरांचे कळप रानांत एकत्र ठिकाणी चरत असतां जर एकाद्या लांडग्याने एकदम एकाद्या जनावरावर झडप घालून त्यास ठार मारिले, तर ते

जनावर मेल्यामुळे मालकाचें झालेले नुकसान भरुन देण्याची जबाबदारी गुराख्यावर पडणार नाही. (२३६)

## ग्रामसंबंधी गुन्हे

मनुस्मृति अध्याय ८ श्लो. २३८ ते २४३

कुपण न घातलेल्या शेतांतील पिकांचे नुकसान जर जनावरांनी केलें तर राजानें त्या गुरांचे मालकास दंड करु नये. (२३८)

ग्राम अगर मोठ्या रस्त्याशेजारील कुंपण घातलेल्या शेतांतील पिकांचे नुकसान जनावरांनी केल्यास ती जनावरे ज्या गुराख्य चे ताब्यांत असतील, तो शंभर पण दंडास पात्र होईल. परंतु ती जनावरें गुराख्याचे ताब्यांतील नसल्यास शेताची राखण करणाराने त्यांस हांकून द्यावे. (२४०)

वरील शेताखेरीज इतर शेतातील पिकाचे नुकसान गुरांनी केल्यास प्रत्येक गुराचे मागे सवा पण दंड घ्यावा आणि पिकाचे जितके नुकसान झाले असेल, तेवढे शेताच्या मालकास भरपाई करुन देववावे. (२४१)

ज्या गाईस विकून दहा दिवस झाले नाहींत, त्या गाईने अगर देवास वाहिलेल्या वृषभांनी अगर जनावरांनी पिकांचे नुकसान केल्यास त्याबद्दल दंड घेऊ नये. (२४२)

पिकांचे नुकसान शेतकऱ्यांचे चुकीमुळे झाल्यास, राजास त्या जमिनीबद्दल जितका कर द्यावा लागतो, त्याच्या दसपट दंड राजाने त्याच्या कडून घ्यावा, परंतु शेताच्या मालकाच्या नोकराच्या चुकीने व मालकास न कळतां पिकांचे नुकसान झाले, तर वरील दंडापैकी निमा दंड मालकाकडून घ्यावा (२४३)

ग्रामसीमेच्या वादांत सीमेबद्दलचे साक्षीदार, सींमा योग्य रीतीने निश्चीत न करितील, तर ते दोनशे पण दंड देण्यास पात्र होतील. (मनू. अ. ८ श्लो २५७)

शेतें, विहिरी, तलाव, बागा आणि घरें यांच्या हद्दीच्या वादांत शेजाऱ्याने खोटा पुरावा दिल्यास त्यास राजानें मध्यम दंड करावा. (अ. ८ - २६३)

जो बळजबरीने घर, तळे बाग, जमीन यांचा कबजा करितो, तो पांचशे पण दंड देण्यास पात्र होतो. जो अज्ञानाने असले कृत्य करितो तो दोनशे पण दंड देण्यास पात्र होतो. (म. अ. ८ श्लोक २६४)

नारदस्मृति अध्याय २१ श्लोक २९ ते ३९

जेव्हां पिकाचे नुकसान जनावरे मुळासकट करितात, तेव्हा शेताच्या मालकाने जितके पिकाचे नुकसान झाले असेल, तितके धान्य नुकसान म्हणून द्यावे, शिवाय गुराख्यास शिक्षा करावी, आणि मालकास दंड करावा.

विकून दहा दिवस पुरे झाले नाहीत अशी गाय, जवान बैल, घोडा आणि हत्ती

यांना पिक पेरलेल्या शेतापासून मोठ्या काळजीने दूर ठेवावे, ह्या जनावरांकडून पिकाचे नुकसान झाल्यास त्याचे मालक शिक्षेस पात्र होणार नाहीत. (३०)

गाईने पिकाचे नुकसान केल्यास एक माष दंड म्हशीने केल्यास दोन माष दंड, बकऱ्याने अगर बकरीने नुकसान केल्यास आठ दंड द्यावा. (३१)

हत्तीचे आणि घोड्याचे मालक दंडास पात्र समजले जाणार नाहींत, कारण हे प्राणी प्रेजेचे रक्षण करणारे आहेत, त्याचप्रमाणे चुकलेल्या गाईचे मालकाकडून दंड घेऊ नये. (३२)

त्याचप्रमाणे चुकलेल्या उठवणीस आलेल्या, चिखलांत रुतलेल्या गाईचे मालकाकडून अगर नुकत्या व्यायलेल्या अगर ओढाळ अगर ज्या बैलावर केलेल्या खुणावरून तो देवास वाहिलेला आहे, असे दिसून येते. बैलाच्या मालकाकडून दंड घेण्यांत येऊ नये. (३३)

गुरे चरल्यानंतर शेतात राहिल्यास दुप्पट, सर्व रात्रभर शेतांत राहिल्यास चौपट दंड होईल, गुराख्याच्या समक्ष गुरें दुसऱ्याच्या शेतात चरत असल्यास गुराख्यास चोरासारखा दड करावा (३४)

गुराख्याच्या ताब्यातील गाई दुसऱ्याच्या शेतांत शिरल्यास गाईच्या मालकास शिक्षा होणार नाही, परंतु गुराखी मात्र शिक्षेस पात्र होईल. (३५)

राजाने गुराख्यास धरुन नेल्यास अगर गुराख्यास सुसरीने खाल्यास अगर वीज पडून अगर साप चावून अगर झाड पडून तो मेल्यास अगर त्यास वाघाने अगर दुसऱ्या श्वापदाने खाल्ल्यास अगर तो एखाद्या रोगाने मेल्यास गुराख्यास अगर गुरांच्या मालकास जबाबदार धरलें जाणार नाही (३६, ३७)

जेव्हा शेताचा मालक शेतातील धान्याचा गुरांनी नाश केल्याबद्दल नुकसान मागतो तेव्हां आसपासच्या जमिनीच्या मालकांचे मताप्रमाणे जितक्या धान्याचा नाश झाला असेल, तितके धान्य गुरांच्या मालकाने भरुन द्यावे व गाई मालकाच्या स्वाधीन करुन धान्य शेताच्या मालकास द्यावे. गाईंनीं पीक तुडवून नाश केल्यास गुराखी दंडास पात्र होईल. (३९)

बृहस्पतिस्मृति अध्याय १९ श्लोक १९

दोन ग्रामांतील सीमा दर्शविणाऱ्या नदीचा प्रवाह कोणी मुद्दाम बदलल्यास प्रवाह बदलणारा इसम शिक्षेस पात्र होईल. (१९)

(याज्ञवल्क्यस्मृति अध्याय २ श्लोक १६२-१६८)

म्हशीने अगर रेड्याने दुसऱ्याच्या धान्याचा नाश केला तर त्या म्हशीचे अगर रेड्याचे मालकास आठ माष दंड करावा, गाईने धान्याचा नाश केल्यास ४ माष आणि बकऱ्याने अगर मेंढराने केल्यास २ माष दंड, त्या त्या जनावरांचे मालकास करावा. (१६२)

शेतातील पीक खाऊन टाकून जनावरें जर त्याच शेतांत बसली तर दुप्पट दंड करावा. गवत उगवलेल्या जमिनीचा नाश जनावरांनीं केल्यास, तितकाच दंड घ्यावा. गाढवानें अगर उंटानें धान्याचे नुकसान केल्यास म्हशी प्रमाणे दंड घ्यावा. (१६३)

नाश झालेले धान्य मालकास भरून द्यावे गुराख्यास शिक्षा करावी. (१६४)

गुराख्याच्या हलगर्जीपणामुळे जनावर मेल्यास तो तेरा पण दंडास पात्र होईल. आणि शिवाय मालकाचे नुकसान त्याने भरून द्यावे. (१६८)

कौटिल्य अर्थशास्त्र

शेतीचे उत्पन्नावर १ आणि १॥ पण ह्याप्रमाणे कायमचा दंड घ्यावा.

(खड २ अध्याय २२)

(ह्या वाक्यावरील टीकेंत ह्या वाक्याचा स्पष्ट अर्थ खाली लिहिल्याप्रमाणे केला आहे. शेतींत उत्पन्न होणाऱ्या मालाची विक्री केली असतां १ पण दंड, माल खरेदी घेणाराकडून आणि १॥ पण दंड, माल विक्री करणाराकडून घेण्यात येत असे.)

दोन ग्रामांतील सीमेच्या वादांत खोटचा खुणा सांगणारा एक हजार पण दंड देण्यास पात्र होईल.

(अ. ९-१६८ पा. २१४)

हद्दीपलीकडे अतिक्रमण केल्यास पहिल्या प्रतीच्या दंडास पात्र होईल.

( अ. ९-२१५ )

हद्द दर्शविणाऱ्या खुणा नाहीशा केल्यास खुणा नाहीशा करणारास २४ पण दंड होईल. (अ. ९ पान २१५)

जर एखादा शेतकरी शेजारच्या शेतांतील जमिनीवर पेरणींचे दिवसांत अतिक्रमण करील, तर तो १२ पण दंडास पात्र होईल. परंतु हे अतिक्रमण संकटामुळे अगर इतर कांहीं कारणामुळे झालें असल्यास तो दंडास पात्र होणार नाही,

( अ. १० पान २१८ )

तळीं, नद्या अगर शेते यास लागून असलेल्या पायवाटेने वापर करीत असतां, दुसऱ्याच्या जमिनींत पेरलेल्या पिकांचे कोणी नुकसान केल्यास, ज्याचे जितके नुकसान झाले असेल, तितका दंड देण्यास तो इसम पात्र होईल. (अ. ९ पा. २१५)

बागाईत जमिनीच्या मालकांपैकी जर एखादा हिस्सेदार त्याच्या शेजारील हिस्सेदाराच्या भागाचे नुकसान करील, तर जितके नुकसान झाले असेल, त्याच्या दुप्पट दंड देण्यास तो पात्र होईल. (अ. ९ पा. २१६)

जमिनीवर कर देणाऱ्या लोकांनी त्याच्या जमिनी, जमिनीवर कर देणारासच गहाण अगर विक्री कराव्या. ब्राह्मणांस दिलेल्या ब्रम्हादाद्य जमीनी अगर त्यास दिलेल्या बक्षीस जमिनी, त्यांनी ज्यांना अशा प्रकारच्या जमिनी दिल्या असतील, त्यांच्याकडेसच गाहाण ठेवाव्या, अगर त्यासच विक्री कराव्या. ह्या नियमांचे उल्लंघन

करणारा पहिल्या प्रतीच्या दंडास पात्र होईल. जमिनीवर कर देणारे ज्या ग्रामांत राहात नाहींत, अशा ग्रामांत कर देणारा राहिल्यास तो पहिल्या प्रतीच्या दंडास पात्र होईल. ग्रामांतील एक कर देणाराच्या जागी दुसरा कर देणारा आल्यास, पहिल्या कर देणाऱ्याच्या घराखेरीज बाकी सर्व जमीनीचा त्याचे जाग्यावर आलेला कर देणारा उपभोग घेईल. नवीन कर देणारास वाटल्यास पूर्वीच्या कर देणाराचे घर देखील द्यावे.

जी जमीन दुसऱ्यास देता येत नाही अशी जमीन एखाद्याने खेडल्यास ती जमीन पाच वर्षांचे भोगवटचानंतर जमीन खेडणाराने ज्या सुधारणा केल्या असतील, त्याच्या किंमतीइतका मोबदला घेऊन मूळ मालकांस परत द्याव्या. जे लोक स्वतः जमीन करीत नाहींत व ग्रामाबाहेर राहतात, त्यांचा जमिनीवर मालकी हक्क कायम राहील.

(अ. १० प्यारा १७१ पान २१८)

ग्रामाचे मुख्य (पाटील)बरोबर तो परगांवी जात असतां ग्रामांतला रहिवाशी न गेल्यास तो प्रत्येक योजन अंतरास दीड पण दंड देण्यास पात्र होईल.

ग्रामांचा मुख्य (पाटील) चोर अगर शिंदळ माणसाखेरीज ग्रामांतील दुसऱ्या माणसास ग्रामांबाहेर हाकून देईल तर तो २४ पण दंड देण्यास पात्र होईल. आणि ग्रामांतील जे लोक त्यास सामील असतील ते पहिल्या प्रतीचा दंड देण्यास पात्र होतील.

(अ. १० पान २१८)

उंट, म्हशी कुरणांत चारल्यानंतर फिरुन कुरणांत भटकतांना सापडल्यास एक चतुर्थांश पण दंड देण्यास त्याचा मालक पात्र होईल, गाई, घोडी, गाढवे यांचे बद्दल एक अष्टमांश पण आणि त्यांचे खेरीज बाकीच्या चतुष्पाद जनावरास एक सोळाअंश पण दंड पडेल चरल्यानंतर जनावरे कुरणांत बसलेली आढळल्यास, वरील दंडाच्या दुप्पट दंड पडेल, कुरणाचा आसपास जो जनावरें नेंहमी आढळतात, त्यांच्या-बद्दल वरील दंडापेक्षा चौपट दंड पडेल.

ग्रामदेवतेस वाहिलेले बैल, व्यायल्यानंतर दहा दिवस गोठ्यांत न राहिलेल्या गाई आणि वळू बैल ह्यांच्याबद्दल दंड घेतला जाणार नाही, शेतांतील पीक जना-वराने खाल्ल्यास त्या जनावराचे एक अगर अनेक मालकास ते दोषी ठरल्यास जितके नुकसान झाले असेल, त्याच्या दुप्पट दंड होईल दुसऱ्याच्या शेतांतून त्या शेताच्या मालकाच्या परवानगीवांचून जनावरें नेल्यास जनावराचा मालक १२ पण दंड देण्यास पात्र होईल. जो कोणी आपली जनावरें भडकून देतो तो २४ पण दंड देण्यास पात्र होईल. गुराखी पाच अपराधाबद्दल निमा दंड देण्यास पात्र होईल. फुलाच्या बागेंत जनावरे भडकून दिल्यास जनावराच्या मालकास वरील प्रमाणे दंड होईल. शेताचें कुंपण मोडून आंत शिरणाऱ्या जनावराच्या मालकास वर सांगितलेल्या दंडाच्या दुप्पट दंड होईल घरात, खळ्यांत अगर घराच्या अंगणांत ठेविलेले धान्य दुसऱ्याची जना-

वरें येऊन खाऊन गेल्यास जनावराच्या मालकानें झालेले नुकसान भरुन द्यावे. जे लोक दुसऱ्याच्या शेतांत मुद्दाम चारण्यास जनावरे घालतात. अगर असे कृत्य करीत असतां जो आढळतो त्यास कडक शासन केले जाईल. (पान २१९)

ग्रामांत काम करण्यास आला असून काम न केल्या कारणाने ज्या शेतकऱ्यास दंड होतो तो त्या ग्रामाने (ग्रामांतील लोकांनी) द्यावा. काम करण्याचे कबूल करुन शेतकऱ्यानें मजुरीची जी रकम घेतली असेल, त्याचे दुप्पट रक्कम त्या शेतकऱ्यानें परत करावी, इतकेंच नाहीं परंतु त्याला जें खाद्य आणि पेय पदार्थ देण्यास आले असतील त्या पदार्थाच्या किंमतीची दुप्पट रक्कम त्यांच्याकडून घ्यावी. ज्या कामा-करितां शेतकऱ्यास ठेविले असेल, ते काम यज्ञसंबंधी असल्यास त्याच्याकडून जेवढी मजुरी ठरली असेल, त्याच्या दुप्पट दंड घेण्यात यावा सार्वजनिक उत्साहाच्या कामीं ग्रामांतील रहिवाशाने मदत न केल्यास त्या इसमाच्या कुटुंबासुद्धा उत्साहात सामील होण्याचे त्यास मना केले जाईल. एकादा सार्वजनिक उत्सव तमाशा अगर नाटक करण्याच्या कामांत ग्रामांतील एखाद्या रहिवाशानें मदत न करितां तो जर लपून तमाशा अगर नाटक पाहील, तर तो अगर सार्वजनिक उपयुक्ततेच्या कामी मदत करण्याचें जो नाकारील, तो त्याचेंकडून मिळावयाच्या मदतीच्या किंमतीची दुप्पट रकम घेतली जाईल. जो सार्वजनिक उपयुक्ततचें काम करील, त्याची आज्ञा सर्वांनीं पाळिली पाहिजे. अशी आज्ञा अमान्य करणारास बारा पण दंड केला जाईल. जे कोणी लोक अशा प्रकारचें काम करण्यास एकत्र होऊन मारतात, अगर दुखापत करितात, त्यास असल्याप्रकारच्या गुन्ह्यास सांगितलेल्या शिक्षेच्या दुप्पट शिक्षा होईल. अशा प्रकारचा गुन्हा करणाऱ्यामध्ये प्रमुख ब्राह्मण, अगर ब्राह्मणाहून वरीष्ठ असा इसम असेल, तरी त्यास प्रथम शिक्षा केली जाईल. ग्रामांत यज्ञ झाल्यास, त्यांत ग्रामातील एखादा ब्राह्मण सामील न झाल्यास त्यास सामील होण्याबद्दल बलात्कार केला जाणार नाहीं, परंतु ,यज्ञास होणाऱ्या खर्चांचा त्याच्या वाट्यास येणारा हिस्सा देण्यांविषयी त्याचे मन वळविण्यांत यावे हे नियम देश, जातीं कुटुंबे आणि सभ्य अथवा सभा यांनी ठरविलेंल्या नियमांचे उल्लंघनास लागू आहेत: (२२०)

जें तळे पाण्याने पूर्ण भरलेले आहे त्या तळ्याचा बंधारा फोडणारास त्यातळ्यांत बुडवावें, बिन पाण्याचा तळ्याचा बंधारा फोडणारास कडक शासन व पडक्या तळ्याचा बंधारा फोडणारास मध्यम प्रकारचा दंड करावा. (२८७)

जो कोणी इसम कुरणास, शेतास, वाडग्यास, खळ्यास, घरास, इमारतीच्या लाकडाचे अगर हत्तीच्या अरण्यास आग लावतो त्यास त्या आगीत टाकून मारावा,

खेड्या भोवतालचीं भागांची अगर शेतांची कुंपणे नाश करणारांस मध्यम प्रतीचा दंड होईल. पान (२९३)

ज्या पाटाच्या पाण्याचा उपयोग पिकास केला जातो त्या पाण्यास अडथळा

केल्यास, अगर त्या पाटाच्या पाण्याचें नुकसास केल्यान, अडथळा अगर नुकसान करणारा पहिल्या प्रतीचा दंड देण्यास पात्र होईल. (२१७)

मोडकळीस आलेल्या धर्मादाय इमारतीचा कोणी मालक नसल्यास ग्रामांतील अगर धर्मशील लोकांनीं जीर्णोद्धार करावा. २१७

दुसऱ्याच्या मालकीच्या जागेंत यात्रेकरुचे सोयीकरितां इमारत अगर चैत्य अगर देवळे बांधिल्यास, अगर पुरातन धर्मादाय इमारत गाहाण टाकिल्यास अगर विक्री केल्यास, इमारत बांधणारा अगर गहाण अगर विक्री करणारा मध्यम प्रतीचा दंड देण्यास पात्र होईल.

जे लोक अशा प्रकारच्या व्यवहारास साक्षी राहातील ते श्रेष्ठप्रतीचा दंड देण्यास पात्र होतील.

ज्या इमारतीची कोणी काळजी घेत नाहींत, व ज्या इमारती पडल्या आहेत, अशा प्रकारच्या धर्मादाय इमारतीच्या गाहाण अगर विक्रीचे व्यवहारास साक्षीदार होणारे लोक दंडास पात्र होणार नाहींत.

जो कोणी एकाद्या खेड्यास जाणाऱ्या रस्त्यास अडथळा करील, तो २०० पण दंडास पात्र होईल. गुरांना चारण्याचे कुरणाच्या रस्त्यास अडथळा करणारास एक हजार पण दंड देण्यास पात्र होईल. २-७-२१८

जो कोणी रस्त्यावर नांगर चालवून तो नांगर चालवून खोल नांगरून टाकील, तो वरील दंड देण्यास पात्र होईल, रस्त्यावर वरवर नांगर चालवून तो नांगरून टाकील, तर वरील दंडाचा चवथा हिस्सा देण्यास पात्र होईल. (२१८)

जो शेतकरी त्याचेपाशी असलेले धान्य लपवितो तो लपविलेल्या धान्याच्या आठ पट धान्य दंड देण्यास पात्र होईल. (३०२)

जो शेतकरी दुसऱ्याच्या शेतकऱ्यांचे पीक चोरितो, तो चोरलेल्या धान्याच्या ५० पट धान्याचा दंड देण्यास पात्र होईल, धान्य चोरणारा परदेशांतील असल्यास त्यास ठार मारण्यात येईल (३०२)

## ग्रामांतील व्यवहारनिर्णय करणाऱ्या संस्था–

नारदस्मृति अध्याय १ श्लोक ७

कुल, श्रेणी, गण, राजानें नेमिलेला अधिकारी आणि राजा यांनीं व्यवहाराचा निर्णय करावा, कुलापेक्षां श्रेणी, श्रेणीपेक्षां गण, आणि गणापेक्षां राजाने नेमिलेला अधिकारी हे एक एकापेक्षां श्रेष्ठ समजावें, आणि ह्या सर्वांहून राजा श्रेष्ठ समजावा. (नारदस्मृति अध्याय १ श्लोक १५१)

ग्रामांत जो व्यवहार झाला असेल त्या संबंधी ग्रामांत राहणारे लोक साक्ष देण्यास

योग्य आहेत. (बृहस्पतिस्मृति अध्याय १ श्लोक १)

व्यवहार निर्णय करणाऱ्या संस्था ४ प्रकारच्या आहेत. एक स्थायिक (अचल) चल, फिरती, राजमुद्रांकित. (खुद्द राजा जीमध्यें आहे अशी) (२)

ग्रामांतील अगर शहरांतील व्यवहार निर्णय करणाऱ्या संस्थांचा समावेश स्थायिक (अचल) या संस्थेंत होतो. (३)

शेतकरी, कारू, सुतार, लोहार इत्यादि कारागीर, व्याजाने पैसे देणारे व्यापारी, नृत्य करणारे, धार्मिक पथाचे अनुयायी (पाशुपत इत्यादि) आणि चोर त्यांना त्यांचे मध्ये उत्पन्न होणाऱ्या व्यवहाराचा निर्णय त्यांचे धंद्यांचे नियमास अनुसरून करावा. २६

कुळ, गोत (एका ग्रामांत रोहणारे लोक), श्रेणी (कारु लोकांची सभा), आणि राजानें नेमिलेला अधिकारी यांनीं साहसासारख्या भयंकर गुन्हयाखेरीज बाकीच्या व्यवहाराचा निर्णय करावा. (२८)

कुळ, गोत, श्रेणी आणि मुख्य न्यायाधीश हे अनुक्रमें पूर्वी नमूद केलेल्याहून श्रेष्ठ प्रतीचे आहेत. व ज्यास वरीलपैकी कोणीही शिक्षा केली असेल, तेव्हां त्यानें कनिष्ठानें दिलेल्या शिक्षेवर वरिष्ठाकडे दाद मागावी. (२९)

जेव्हां कोणत्याही व्यवहाराचा निर्णय कुलाने योग्य प्रकारें केला नसेल तेव्हां त्याच व्यवहाराचा निर्णय गोताने, गोताने केलेल्या व्यवहाराचा निर्णय श्रेणीनें, व श्रेणीनें केलेल्या व्यवहाराचा निर्णय राजानें नेमिलेल्या अधिकाऱ्याने करावा. (३०)

राजाने नेमिलेला न्यायाधीश, कुल, गोत, श्रेणी इत्यादिहून श्रेष्ठ आहे मुख्य न्यायाधीश यांच्या पेक्षां श्रेष्ठ आहे आणि राजा ह्या सर्वांहून श्रेष्ठ आहे (३१)

याज्ञवल्क्यसंहिता अध्याय २ श्लोक १ ते ४

विद्वान ब्राम्हणासमवेत राजाने राग लोभ इत्यादिकांचा त्याग करुन धर्मशास्त्रास अनुसरून व्यवहार पाहावा. (१)

वेद आणि निती जाणणारे व शत्रु आणि स्नेही यांच्याशी समतेनें वागणारे लोक, राजानें व्यवहार पाहाण्याच्या कामीं मदतीस घ्यावे. (२)

अपरिहार्य कारणाकरितां राजा व्यवहार पाहण्यास असमर्थ असल्यास त्याने वरील लोकांच्या समवेत व्यवहार पाहण्याकरितां धर्मशास्त्रज्ञ ब्राम्हणांस नेमावे. ३

युग, श्रेणी आणि कुल ह्या व्यवहार निर्णय करणाऱ्या संस्था परस्पराहून श्रेष्ठ आहेत. (३१)

## शेतीस लागणाऱ्या औते व बैलासंबंधी नियम

पाराशरस्मृती अध्याय २ श्लोक ३, ४, ५, व ९

एक नांगरास आठ बैल जोडणें योग्य आहे, चार बैल जोडणें ह्यांत पुण्यही नाहीं

व पापही नाहीं. जे क्रूर असतात ते चार बैलाकडून नांगर ओढवितात, दोन बैलाकडून जे नांगर ओढवितात त्यांना बैलाची हत्या करणारे समजावे. (३)

उपाशी, तान्हेलेला आणि दमलेला बैल नांगरास जोडू नये, ब्राह्मणाने लंगडा, रोगी अथवा खच्ची केलेला बैल ओझें वाहण्यास लावू नये. (४)

निरोगी, सशक्त आणि चपळ बैल नांगरास मध्यान्ह कालपर्यन्त जोडावा. (५)

मासे मारणारा कोळी एक वर्षांत मासे धरून जितके पाप करितो, तितके पाप लोखंडाचें टोक ज्या नांगरास आहे. नांगरानें जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्यास एका दिवसांत लागते. (९)

एथपावेतो ग्रामांतील व्यवस्था व कारभार या विषयीची स्मृति वचनें दिल्यावर या स्मृतिवचनांत दर्शविल्या प्रों ख्रिस्ती शक ३०० वर्षापासून शके १२०० पावेतो खेडेगांवांतील कारभारात व व्यवस्थेत म्हणण्यासारखी स्थित्यंतरे अगर फेरफार झाल्याचे आढळून येत नाहीं. भरतखंडाच्या निरनिराळ्या प्रांतातील लोक समाजाची मनोरचना इतिहासावरुन अशी दृष्टोत्पत्तीस येते की, जी पूर्वापार पद्धत निरनिराळ्या व्यवहारासंबंधी खेडेगांवांतील लोक समाजांत अस्तित्वांत असते ती पद्धत पिढीन्‌पिढी दर पिढीस अनेक शतकें कांहीं एक फेरफार न होता त्याच स्वरुपात चालत आल्याचे आढळते. ही गोष्ट लक्षांत घेतां १२ वे शतकापासून तो इ. स. १८१८ सालापर्यन्त स्मृतीवचनांत ज्या अनेक बाबींचा उल्लेख करण्यांत आला आहे त्यापैकी कोणकोणत्या बांबीसंबंधीं महाराष्ट्र प्रदेशाच्या खेडेगांवांत कोणकोणत्या गोष्टी केल्या जात असत यांचे स्थूल दिग्दर्शन करणें अगत्यांचें आहे.

यादव कालीन कांहीं शिलालेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांत यादव घराण्याच्या राजसत्तेखालील प्रदेशाचे जे मोठमोठे विभाग करण्यात आले होते त्याविभागास 'देश' ही संज्ञा आहे. या विभागाच्या संज्ञेवरुनच देशमुख, देशपांडे या वतनदाराच्या नावाचा उगम झाल्याचें दिसते. राज्याच्या मुख्य विभागांतील म्हणजे देशांत शेंकडो खेडीं असत. या खेड्यावर राजाने नेमलेला अधिकारी असे या अधिकाऱ्याकडे देशांतील खेडे गांवाच्या जमिनींचा सरकारी महसूल वसूल करण्याचा अधिकार या देशाच्या मुख्य अधिकाऱ्याकडे असे. यामुळे 'देशाचा मुख्य' हा दर्जा स्वाभाविकपणें त्याचेकडे असे यास्तव त्याला देशाचा मुख्य अथवा देशमुख म्हणण्याचा प्रघात अस्तित्वांत आला असावा. देशांतील जमिनीच्या सरकारी साऱ्याचा हिशेब ठेवण्याकरितां एक स्वतंत्र अधिकारी असे. खेडे गांवांतील कुळकर्ण्यांकडे खेडे गांवांतील जमीन महसुलाचा वसुलाचा हिशेब ठेवणे हे काम ज्या प्रकारचे असे त्याच प्रकारचे देशांतील सर्व खेड्याच्या जमिनीच्या महसुलाचा हिशेब ठेवण्याचें काम देशाचा कुळकर्णी अथवा पांड्या याचेकडे असे म्हणून त्यास देशपांडे ही संज्ञा प्राप्त झाली. मुसलमानांचा अंमल महाराष्ट्रात स्थापन झाल्यापासूनची जी इतिहास साधने उपलब्ध झाली आहेत त्यांत देशमुख,

देशपांडे या अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो. यादव काळी देशमुख देशपांडे अधिकाऱ्यांनी करावयाच्या कामाबद्दल मोबदला म्हणून सरकार साऱ्याची माफी असलेल्या अनेक जमिनी देण्यांत येत असत, व हे अधिकारीं त्या जमिनीचें उत्पन्न घेत असत, देशमुख, देशपांडे यांचा अधिकार वंशपरंपरा त्यांच्या घराण्यांतील पुरुषवंशाकडे चालत असे. या कारणामुळे त्यांना वतनदार ही संज्ञा लावण्याचा प्रघात पडला. यादव काळीं वतन हा शब्द ज्यास लावतात त्यास वृत्ति हा शब्द लावीत असत. मुसलमानांचा प्रवेश महाराष्ट्रांत झाल्यावर वतन हा अरबी शब्द प्रचारांत आला व मुसलमानी राजवटीपासून देशमुख देशपांडे वतनदार हा शब्दप्रयोग आजतागायत भाषेंत रूढ आहे.

स्मृतिग्रंथात देशाचे ४ मुख्यभाग करावे असे वचन आढळते. यादव काळीं यादव राजकर्त्यांनीं देशाचे किती भाग केले होते हे नमूद केलेले आढळत नाहीं परंतु तदनंतर महाराष्ट्रांत स्थापन झालेल्या मुसलमान बहामनी राज्याचे चार मुख्य भाग असल्याचे व महंमद गवान या बहामनी राज्याच्या पेशव्यानें या ४ मुख्य भागाचे ८ भाग केल्याचे नमूद आहे. दहाव्या शतकाच्या सुमाराच्या प्रसिद्ध झालेल्या अन्य ताम्रपटांत व शिलालेखांत विषय म्हणजे जिल्ह्याएवढा " देशाचा भाग " हा शब्द वापरलेला आढळतो. यादवकाळीं देशमुख व देशपांडे वतनदाराशिवाय राज्य कारभार अन्य कोणकोणते अधिकारी असत याचा उल्लेख आढळत नाहीं. महाराष्ट्र प्रदेशाच्या निरनिराळ्या खेडें गांवांत अस्तित्वांत असलेले १२ बलुतेदार व १२ अलुते वतनदार यादवकाळीं असल्याचे आढळत नाहीं. मुसलमानी राजवटींत बहामनी व अन्य मुसलमान राजघराण्याविषयीची जीं इतिहास साधनें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत या वतनदारांचा उल्लेख आढळतो.

खेडें गांवातील बलुते वतनदारांनी गांवांतील लोकांच्या उपयोगी कोणकोणतीं कामें करावयाची याविषयीचे उल्लेख यादव कालीन साधनांत आढळत नाहीं. गावच्या लोकांत उत्पन्न होणाऱ्या वादांचा निवाडा गावचा पाटील, कुळकर्णी बलुतेवतनदार गावांतील शेती करणारें शेतकरी याशिवाय वाणी उदमी ज्यांना बकाल ही संज्ञा होतीं अशा लोकांच्या सभेंत केला जात असे या सभेस गोतसभा असें म्हणत व या सभेनें केलेल्या वादाच्या निवाड्यास गोत निवाडा असे म्हणत बकाल हा शब्द अरबी भाषेंतून असून वाणी व उदमी यांना बकाल ही संज्ञा होती. उभयतां वाद्यापैकी एकादा वाद सांगणारास गोताचा निवाडा बरोबर नाहीं असे वाटल्यास परगण्याचे वतनदार व परगण्याच्या गावांतील पाटील व अन्य लोक यांच्याकडे त्या वादाचा निवाडा करण्याची मोकळीक ठेवण्यात आलेली होती या सभेस देशकसभा असे म्हणत. गोत व देशक सभा यांचा उल्लेख यादवकालीन उपलब्ध झालेल्या साधनांत आढळून येंत नाहीं.

स्मृति वचनांस अनुसरुन गावांतील कोणाची चोरी झाल्यास चोरीचा माल शोधून काढून तो मालकास गावच्या पाटलास द्यावा लागे. माल न सांपडल्यास मालकाचे झालेले नुकसान भरुन देण्याची जबाबदारी पाटलावर असे. मराठा राज्याची समाप्ति होईतोंपर्यंत याचा अंमल केला जात असे, असे मराठी राज्याची जी इतिहास साधनें प्रसिद्ध झाली आहेत त्यावरुन दिसून येते.

---

कै. भा. वा. भट

संस्थापक

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ

व 'संशोधक' त्रैमासिक

---

'संशोधक' त्रैमासिक संबंधी केन्द्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती

१) प्रकाशन स्थळ – इ. वि. का राजवाडे संशोधन मंडळ. धुळे.

२) प्रकाशनाची मुदत – त्रैमासिक.

३) मुद्रकाचे नाव व पत्ता – श्री. हिरालाल शंकर सापे
महाराष्ट्र प्रि. प्रेस, हेडपोस्ट ऑफिसजवळ, धुळे.

४) प्रकाशकाचे नांव – डॉ. प्र. न. देशपांडे, डॉ. मु. ब. शहा
राष्ट्रीयत्व व पत्ता– चिटणीस, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

५) संपादकाचे नांव – डॉ. प्र. न. देशपांडे, डॉ. मु. ब. शहा.
राष्ट्रीयत्व व पत्ता – चिटणीस, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

६) मालक व पत्ता – चिटणीस, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळे.

## प्रगती पथावरील महाराष्ट्र
## वर्षभरातील काही महत्वाचे निर्णय

* भूमिहीनांना घरे बांधण्यासाठी रकमेची मर्यादा २७०० रु. पर्यंत वाढविण्यात आली
* ८ लक्ष १४ हजार लोकांना रोजगार हमी योजनेवर काम.
* ११२९६ खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय.
* कोकण व मराठवाड्यातील अतिवृष्टी व महापुरांमुळें सहाय्य कार्यासाठी १२ कोटी २५ लक्ष रु. चे अर्थसहाय्य व १ कोटी ४ लक्ष रु. चें बी बियाणें व खते तगाई वाटप
* विभागीय असमतोलाच्या वस्तुस्थितीचा अभ्यास करून दुरगामी उपाययोजना सुचविण्यासाठी प्रा. वि. म दांडेकर समितीची नियुक्तीं.
* राज्यातील २९९ गावांची कृषी पंढरी योजनेसाठी निवड.
* पाणलोट आधारित सर्वंकक्ष विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी.
* लोक वर्गणींची अट शिथील.
* सुधारींत कृषी अवजारे खरेंदी करण्याकरिता अल्प व अत्यल्प भूधारकांना अनुक्रमे २५ टक्के व ३३ पूर्णांक एक तृतियांश टक्के अनुदान
* एकाधिकारी कापूस खरेदी योजना कार्यान्वित कापसाचे पीक कमी आल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यात हमी किंमतीत वाढ.
* नवीन सहकारी सूत गिरण्यांना शासनाच्या निधीतून १.३ या प्रमाणात भाग भांडवल
* १६ सूत गिरण्यांची निवड, भाग भांडवलाचा पहिला हप्ता म्हणून १० लाख रु. मंजूर
* शासनमान्य अनुदानिक मा शाळांतील मुलींना १० व्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण मोफत.
* अमरावती विद्यापीठाची स्थापना.
* ७०५ नवीन माध्यमिक शाळा, ५९ कला व विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये, ३४ अभियांत्रिकी महाविद्यालये व ६१ तंत्रनिकेतन यांना विना अनुदान तत्वावर मंजूरी
* अमरावती व कल्याण महानगर पालिकांची स्थापना.
* नागपूर महानगर पालिकेत रस्ते दुरुस्ती कार्यासाठी १ कोटी रुपयाचे अनुदान.
* नागरी कमाल जमीन धारण संबंधी नवीन धोरण जाहीर, आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गासाठी व सार्वजनिक गृहबांधणी कार्यक्रमाखाली जमीन वा गाळे संपादन करणे.
* नळपाणी पुरवठा योजना ३ लाख रुपये खर्चापर्यन्त मंजूरीचे अधिकार जि. परिषदांना.
* शेतमजुरांच्या किमान वेतनांचे पुनर्निर्धारण करुन वेतन विभागानुरुप प्रतिदिन ६ रुपये व १० रुपयांचे दरम्यान.